CMYK



सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ८ एप्रिल २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १३० | पाने १२+८ | किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

TATA IPL

दिल्ली वि.गुजरात

वेळ : सायं.७.३० वाजता

ठिकाण : दिल्ली

## विचारपुष्प



निश्रद्धा पाहिजे, दृढनिश्चय पाहिजे. संकटांना न जुमानता ध्येयमार्गावर चालत राहण्याचे धैर्य पाहिजे. म्हणजे मग शरीरात अपार बलाचा संचार होतो. अंगदाच्या ठायी रामाविषयी असाधारण श्रद्धा होती. म्हणूनच रावणाच्या भर सभेत त्याने जो पाय रोवला तो कोणीही उचलू, हटवू शकला नाही. संघाचे कार्य म्हणजे रामभक्त अंगदाचा पायच आहे.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# इराणवर चौफेर हल्ले

## अमेरिका-इस्रायलचा ऊर्जा प्रकल्प, रेल्वे पूल, विमानतळांवर क्षेपणास्त्रांचा मारा



**तेहरान, ७ एप्रिल**

अमेरिकेने इराणला करार करण्यासाठी ४८ तासांची मुदत संपण्यापूर्वीच आणि इराणचाही ताठरपणा कायम राहिल्याने मंगळवारी अमेरिका, इस्रायलच्या वायुदलाने ५० पेक्षा अधिक लढाऊ विमानांनी इराणवर चहुबाजूने हल्ले केले. इराणच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या खार्ग बेटावरील ऊर्जा प्रकल्पांसह रेल्वे पूल, विमानतळे आणि पायाभूत सुविधांवर क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. एका रात्रीत एका संस्कृतीचा अंत होणार असून ४७ वर्षांची दहशतवादी सत्ता संपुष्टात येणार आहे, अशी धमकी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मंगळवारी दिली.

इराणचे प्रमुख कच्च्या तेलाचे निर्यात केंद्र असलेल्या खार्ग बेटाला लक्ष्य करीत अमेरिकेच्या वायुदलाने जोरदार हल्ले चढविले. दुसरीकडे इस्रायली वायुदलाने इराणमधील रेल्वे पूल, रेल्वे स्थानके, विमानतळे आणि पायाभूत सुविधांवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. इराणमध्ये चहुबाजूने होत असल्याचे हल्ल्याने अराजकता पसरली आहे. नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण असून बहुतांश भागातील वीज पुरवठा खंडित झाला. मंगळवारी सायंकाळपासूनच मोठ्या प्रमाणात हल्ले करण्यास सुरुवात झाली. राजधानी तेहरानसह बहुतांश शहरे स्फोटाने हादरून गेली. अनेक ऊर्जा प्रकल्प, पायाभूत सुविधा आणि निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्याचे वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तात म्हटले आहे. ट्रम्प यांनी इराणमधील प्रत्येक पूल आणि वीज प्रकल्प उडवून देण्याची धमकी दिल्यानंतर हल्ले झाले आहेत. खार्ग बेटाच्या ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ल्याने तेथील पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. *(वृत्तसंस्था)*

### काही तासांत ५० ठिकाणांना केले उद्ध्वस्त

**दक्षिण इराणमधील कोम शहराजवळील आणि काशान शहरातील रेल्वे पुलाला लक्ष्य करण्यात आले. दरम्यान, इराणच्या मशहदमध्ये रेल्वे सेवा स्थगित करण्यात आली. प्रांतीय उपराज्यपाल मोर्तेझा हैदरी यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, अमेरिका आणि इस्रायलने मंगळवारी इराणच्या कोम शहराजवळील एका रेल्वे पुलावर हल्ला केला. यामुळे रेल्वे वाहतूक ठप्प आहे. दुसरीकडे काही तासातच इराणच्या ५० पेक्षा अधिक ठिकाणांवर हल्ले करीत ते उद्ध्वस्त करण्यात आले.**

### चीन-रशियाचा अमेरिकेला झटका

**जिनिव्हा :** होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्याच्या बहरीनच्या ठरावावर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत रशिया, चीनने नकाराधिकार (व्हिटो पॉवर) वापरत अमेरिकेला जोरदार धक्का दिला. मतदानावेळी ठरावाच्या विरोधात दोन मते पडली, ज्यात चीन, रशियाचा समावेश होता. ठरावाच्या बाजूने अकरा मते पडली आणि कोलंबिया, पाकिस्तान तटस्थ राहिले. आक्रमक कारवाईचे सर्व संदर्भ काढून टाकण्यात आल्यानंतरही रशिया, चीनने विरोधात मतदान केले.

# आदर्श राष्ट्र उभारण्यासाठी निकोप समाजाची गरज

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन



**वृंदावन (मथुरा), ७ एप्रिल**

एखादी चांगली व्यक्ती व्यवस्थेच्या सर्वोच्च पदावर पोहोचण्यापूर्वी, सामान्य लोकांनी चांगले असणे आवश्यक आहे. एक मजबूत आणि आदर्श राष्ट्र उभारण्यासाठी एक चांगला समाज ही प्राथमिक अट आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

संत श्रीमलुकदासजी महाराज यांच्या ४५२ व्या जयंतीनिमित्त आयोजित संत संमेलनात ते बोलत होते. सरसंघचालकांनी धर्म, लोकशाही, गोरक्षण आणि भारताच्या जागतिक भूमिकेवर विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, संतांचा स्वभाव पर्वतासारखा असतो. ते इतरांच्या लहानातल्या लहान सद्गुणांनाही मोठे करून दाखवतात.

लोकशाही आणि समाजव्यवस्थेवर ते म्हणाले की, देशाच्या लोकशाही व्यवस्थेत चांगल्या लोकांचा उदय होणे अत्यंत आवश्यक आहे. ही आपली लोकशाही आहे, त्यामुळे यात चांगले लोक आले पाहिजेत. जेव्हा मी 'चांगले लोक' म्हणतो, तेव्हा माझा उल्लेख कोणत्याही विशिष्ट पक्षाबद्दल किंवा व्यक्तीबद्दल नसतो; उलट, मी खऱ्या अर्थाने चांगल्या असलेल्या लोकांबद्दल बोलत असतो, कारण जे चांगले असतात ते नेहमीच चांगले काम करतात.

ही प्रातिनिधिक लोकशाही असल्यामुळे, आपण आपले प्रतिनिधी स्वतः निवडतो. त्यामुळे, जर आपण स्वतः वाईट राहिलो, तर आपले प्रतिनिधीसुद्धा वाईटच असतील. आपण जितके चांगले बनू, तितकेच चांगल्या लोकांना सर्वोच्च पदावर पोहोचण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही.

**गोरक्षण आणि जनजागृती**

समाजात गोरक्षण आणि जनजागृतीच्या गरजेवर सरसंघचालक म्हणाले की, केवळ एखादी व्यवस्था किंवा कायदा तयार केल्याने समस्या सुटत नाहीत. उदाहरणार्थ, लाल दिवा तेव्हाच काम करतो जेव्हा लोक त्याचे पालन करतात. खरी शक्ती व्यवस्थेत नाही, तर समाजात आहे. सत्ताधाऱ्यांची गाईंचे संरक्षण करण्याची इच्छा आहे, परंतु कोणतेही धाडसी पाऊल उचलण्यापूर्वी समाजात याबद्दल व्यापक जागरूकता निर्माण झाली पाहिजे. खरे कार्य जनजागृती करणे हे आहे. जर लोकांची भावना प्रबळ असेल, तर व्यवस्थेने ते स्वीकारलेच पाहिजे. समाजाला गोपूजक बनवा म्हणजे गोहत्या आपोआप थांबतील. सध्याच्या वैज्ञानिक युगातील गाईबद्दलच्या दृष्टिकोनाबाबत सरसंघचालक म्हणाले, आपण गाय आपली माता आहे या श्रद्धेपुरते स्वतःला मर्यादित ठेवू नये, तर विज्ञानाच्या आधारावर तिचे महत्त्व प्रस्थापित केले पाहिजे. *(वृत्तसंस्था)*

### धर्म आणि करुणा

**धर्माच्या मार्गाचे अनुसरण करण्यासाठी, सर्वप्रथम स्वतःमधील अहंकाराचा नाश केला पाहिजे. धर्माला चार आधारस्तंभ आहेत : सत्य, करुणा, पवित्रता आणि वैराग्य. यापैकी करुणा सर्वांत आवश्यक आहे. कारण करुणेविना धर्माची कल्पनाच करता येत नाही. हे विश्व निरंतर अस्तित्वात राहिले पाहिजे, या कल्पनेतून धर्माचा उगम झाला. विश्वाचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी, आपण सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे. हेच धर्माचे मूळ स्वरूप आहे, असेही सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.**

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात सलग चौथ्या दिवशी तेजी

**मुंबई :** शेअर बाजारात मंगळवारी पुन्हा एकदा चढ-उतार पाहायला मिळाले. मात्र सलग चौथ्या सत्रात बाजाराने आपली तेजी कायम राखली. आयटी, मीडिया, मेटल आणि रिअल्टी क्षेत्रातील जोरदार खरेदीमुळे निफ्टीने २३,१०० चा टप्पा ओलांडला.



दिवसभराच्या व्यवहाराअंती सेन्सेक्स ५०९.७३ अंकांच्या (०.६९ टक्के) वाढीसह ७४,६१६.५८ वर स्थिरावला. तसेच निफ्टीमध्ये १५५.४० अंकांची (०.६८ टक्के) वाढ होऊन तो २३,१२३.६५ वर बंद झाला. मुख्य निर्देशांकांच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्ये काहीशी संथ गती दिसून आली. निफ्टी मिडकॅप निर्देशांक ०.२ टक्क्यांनी वाढला, तर स्मॉलकॅप निर्देशांक स्थिर राहिला. निफ्टीमध्ये विप्रो, हिंदाल्को इंडस्ट्रीज, एचसीएल टेक्नॉलॉजीज, टीसीएस आणि इन्फोसिस हे शेअर्स सर्वाधिक नफ्यात राहिले.

### एअर इंडियाचे सीईओ विल्सन यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** एअर इंडियाचे सीईओ कॅम्पबेल विल्सन यांनी पदाचा राजीनामा दिला. उत्तराधिकारी मिळेपर्यंत ते आपल्या पदावर कायम राहतील. कामकाजातील अडचणी, वाढता खर्च आणि यावर्षी संभाव्य विक्रमी तोट्याचा कंपनीला सामना करावा लागत आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत विल्सन यांचा राजीनामा स्वीकारण्यात आला होता. कॅम्पबेल यांचा कार्यकाळ पुढील वर्षी सप्टेंबरमध्ये संपणार होता. एअर इंडियाने सध्या या प्रकरणावर भाष्य करण्यास नकार दिला आहे. विल्सन यांनी आपला करार संपल्यानंतर यापुढे काम न करण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्याचा शोध जानेवारीमध्ये सुरू झाला होता. ते सप्टेंबर २०२२ मध्ये एअर इंडियामध्ये रुजू झाले होते.

### वादग्रस्त पीएसआय सुनील गिरी निलंबित

**वाशीम :** वाशीम : शहर पोलिस ठाण्यात कार्यरत असलेले पीएसआय सुनील गिरी यांच्याविरोधातील गंभीर तक्रारींची दखल घेत जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. या कारवाईळे वाशीम पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे. वाशीम शहर पोलिस ठाण्यात रुजू झाल्यापासून पीएसआय गिरी हे सतत वादात होते. त्यांच्या कामाच्या पद्धतीबद्दल सर्वसाम न्य नागरिकांनी अनेक वेळा नाराजी व्यक्त केली.

# श्रद्धेच्या बाबींमध्ये हस्तक्षेप नको



### शबरीमाला मंदिर प्रकरण सुनावणीत सरकारची भूमिका

**नवी दिल्ली, ७ एप्रिल**


मासिक पाळीच्या वयातील महिलांच्या प्रवेशावरील बंदी कायम राहायला हवी; न्यायालयाने धार्मिक श्रद्धेच्या बाबींमध्ये हस्तक्षेप करू नये. धर्माचा अविभाज्य भाग काय आहे, हे प्रामुख्याने त्या धर्माच्या तत्त्वांच्या आधारावर ठरवले पाहिजे, अशी भूमिका केंद्र सरकारच्या वतीने महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी शबरीमला मंदिर प्रकरणावर सुनावणीवेळी मांडली.

केरळमधील शबरीमला मंदिरात महिलांना प्रवेश देणारा २०१८ मध्ये दिलेला आदेश कायम ठेवावा की नाही, यावर सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेत सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या घटनापीठासमोर मंगळवारपासून सुनावणी सुरू झाली. पहिल्या दिवशी केंद्र सरकारच्या वतीने महान्यायाभिकर्ता मेहता यांनी संविधानिक तरतुदी आणि धार्मिक प्रथा, परंपरा यातील फरक स्पष्ट करीत भूमिका मांडली. मंदिरात प्रवेशास निर्बंध घालण्यामागे महिलांना कमी लेखणे हा मुद्दा नाही. भारतात लिंगावर आधारित भेदभावाला थारा नाही. संविधानानुसार महिलांना सम ान हक्क आहेत आणि इतकेच नव्हे तर, भारतीय परंपरेत त्यांना उच्च दर्जा देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हा केवळ चार दिवसांचा प्रश्न नाही, तर तो एका विशिष्ट वयोगटाशी संबंधित आहे, असेही मेहता यांनी युक्तिवादात म्हटले आहे.

### पितृसत्ताक व्यवस्था पाश्चात्त्य संकल्पना

पितृसत्ताक व्यवस्था पाश्चात्य संकल्पना असून ती भारतात जशीच्या तशी लागू केली जाऊ शकत नाही. भारतातील महिला केवळ समानच नाहीत, तर त्यांचा दर्जाही उच्च आहे. पितृसत्ताक समाजावर चर्चा करणारे आणि लिंग-आधारित रूढीवादी कल्पना दर्शवणारे अनेक न्यायालयीन निर्णय आहेत. तथापि, भारताचे प्रकरण वेगळे आहे.

# नागपुरात स्थापन होणार कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग




**मुंबई, ७ एप्रिल**

राज्यात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला असून, नागपूर येथे नव्या आयुक्तालयाची स्थापना होणार आहे. विकसित महाराष्ट्राच्या दिशेने वाटचाल करताना राज्य शासनाने माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला स्वतंत्र बळ देण्याचा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाची स्थापना करण्यात येणार असून, नागपूर येथे नव्या आयुक्तालयाचे मुख्यालय असणार आहे. या निर्णयामुळे मंत्रालय, आयुक्त कार्यालय तसेच जिल्हा स्तरावर माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित कामकाजासाठी स्वतंत्र कायमस्वरूपी पदांचा समावेश असलेला नवा माहिती तंत्रज्ञान संवर्ग निर्माण केला जाणार आहे. एकूण ४२७ पदे या संवर्गासाठी तयार करण्यात येणार असून प्रशासनातील डिजिटल कामकाजाला गती मिळणार आहे. तसेच विद्यमान माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे रूपांतर करून नव्या आयुक्तालयाची स्थापना करण्यात येणार असून, त्यासाठी ७७ पदांना मंजुरी देण्यात आली आहे.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## संस्कारांची जडणघडण हेच खऱ्या शिक्षणाचे वैशिष्ट्य : मुनीश्री वीरसागरजी महाराज

**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

शिक्षण आणि संस्कार यांचा संगम साधणारी ही भूमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आदर्श ठरत आबे. केवळ पदवी नव्हे, तर संस्कारांची जडणघडण हेच खऱ्या शिक्षणाचे वैशिष्ट्य आहे, असा मर्मस्पर्शी संदेश देत परम पूज्य मुनीश्री वीरसागरजी महाराज यांनी वालचंद शिक्षण समूहाच्या नूतन परिसरात विद्यार्थ्यांना जीवनमूल्यांचा दीप दिला.

डब्ल्यू.आय.टी. कॅम्पस परिसरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. परमपूज्य मुनीश्री वीरसागरजी महाराज संघ यांचे आगमन वाद्यांच्या निनादात आणि जयघोषांच्या गजरात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाले. या मुनिसंघात मुनीश्री विशालसागरजी महाराज, धवलसागरजी महाराज, मंथनसागरजी महाराज, मननसागरजी महाराज, विरलसागरजी महाराज तसेच क्षुल्लकश्री विजितजी महाराज यांचा सम ावेश होता. या प्रसंगी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, पत्नी माया गांधी यांच्यासह पंचरंगी ध्वज फडकावून मुनीश्रींना अर्घ्य अर्पण केले. योगायोगाने डॉ. गांधी यांचा वाढदिवस असल्याने त्यांचा सत्कार करून शुभेच्छाही देण्यात आल्या.

### उद्या भव्य सामूहिक जप

वालचंद शिक्षण समूह यांच्या सहकार्याने आणि सकल जैन समाज यांच्या वतीने जैन धर्मातील सर्वाधिक पवित्र, सार्वत्रिक आणि सर्वसम ावेशक मानल्या जाणाऱ्या नवकार महामंत्राच्या दिव्य शक्तीचा अनुभव देणारा 'विश्व नवकार महामंत्र दिवस' अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात गुरुवार, ९ एप्रिल रोजी सकाळी ७.३० वाजता वालचंद नूतन परिसर (डब्ल्यू.आय.टी. सोलापूर समोर) येथे भव्य सामूहिक जपाचे आयोजन केले आहे.

# तीन दिवसाआड पाणीपुरवठा वेळापत्रकाचे काटेकोर पालन करा

## पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी महापौर कोंड्याल यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

वीजपुरवठा खंडित होणे, यंत्रणेमधील त्रुटी किंवा नियोजनाचा अभाव यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होणे अजिबात सहन केले जाणार नाही. स्काडा प्रणालीचा पूर्ण क्षमतेने वापर करून पाणी वितरण अधिक पारदर्शक आणि नियंत्रित पद्धतीने करावे. शहरातील पाणीपुरवठ्याचे प्रभावी नियोजन करण्यावर भर देत तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याच्या वेळापत्रकाचे काटेकोर पालन करावे. प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रात नियमित पाहणी करून समस्या तात्काळ सोडवाव्यात, असे सक्त आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

शहरातील पाणीपुरवठा नियोजित व सुरळीत करण्याच्या दृष्टीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह येथे आज महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली.या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे, सिद्धेश्वर उस्तुर्गे आणि विभागीय अधिकारी, कनिष्ठ अभियंते, चावीवाले संबंधित कर्मचारी तसेच म हावितरण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



### पाणी वितरण व्यवस्था मजबूत करण्यावर चर्चा

या बैठकीत पाण्याचे टप्पे (रोटेशन) निश्चित करणे, गळती रोखणे, जलसाठ्याचे योग्य व्यवस्थापन करणे तसेच नागरिकांना कमी त्रास होईल अशा पद्धतीने वितरण व्यवस्था मजबूत करण्याबाबतही सखोल चर्चा करण्यात आली. सोलापूर शहरातील पाणीपुरवठा अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने चर्चा झाली.

बैठकीत स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या स्काडा ("SCD' - Supervisory Control and Data cquisition) प्रणालीबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले. या आधुनिक प्रणालीच्या माध्यमातून पाणीपुरवठा यंत्रणेवर रिअल-टाईम नियंत्रण ठेवणे, गळती शोधणे, दाब व्यवस्थापन आणि पाण्याचे योग्य वितरण सुनिश्चित करणे शक्य होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

शहरातील पाणीपुरवठा वारंवार विस्कळीत होण्यामागील प्रमुख कारणांवरही बैठकीत चर्चा करण्यात आली. विशेषतः महावितरणकडून होणाऱ्या अनियमित वीजपुरवठ्यामुळे पाणी उचल केंद्रे (पंपिंग स्टेशन) प्रभावित होत असून त्याचा थेट परिणाम नागरिकांना मिळणाऱ्या पाण्यावर होत असल्याचे निदर्शनास आले. यावर उपाययोजना म्हणून महावितरण अधिकाऱ्यांनी आवश्यक त्या समन्वयातून अखंड वीजपुरवठा देण्याची जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश देण्यात आले. यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या. पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असून त्यात कोणतीही तडजोड होणार नाही. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात पाणी मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे स्पष्ट केले.

# महाराष्ट्रात कन्नड भाषेतून 'टीईटी' घेण्याची मागणी

### कर्नाटकच्या मुख्य सचिवांचे महाराष्ट्र सरकारला पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ एप्रिल-**

महाराष्ट्रातील कन्नड माध्यमाच्या शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा टीईटी कन्नड भाषेतून घेण्याची मागणी पुढे आली आहे. कर्नाटक सरकारच्या मुख्य सचिव डॉ. शालिनी रजनीश यांनी महाराष्ट्राचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना पत्र पाठवून ही विनंती केली. सीमाभागातील कन्नड भाषिकांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आणून देत 'आदर्श कन्नड-बळगा, महाराष्ट्र' या संघटनेनेही यासाठी पाठपुरावा केला होता.

महाराष्ट्रातील जत, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर आदी भागांत सुमारे ३७७ कन्नड माध्यमाच्या शाळा असून, त्यात ४४ हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेतात. संविधानाच्या कलम ३५०(अ) नुसार भाषिक अल्पसंख्याकांना मातृभाषेत परीक्षा देण्याचा अधिकार आहे, याकडे पत्रात लक्ष वेधण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार २०२७ पर्यंत शिक्षकांना ढएढ उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सध्या अर्जाची अंतिम मुदत १६ एप्रिल असल्याने तातडीने कन्नड माध्यमाचा पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. कर्नाटक राज्य मराठी भाषिकांसाठी मराठीतून टीईटी घेत असल्याने, महाराष्ट्रानेही कन्नड भाषिकांसाठी तशीच सुविधा द्यावी, अशी भूमिका मांडण्यात आली. तसेच भविष्यात कन्नड माध्यम अनिवार्य करणे आणि रिक्त शिक्षक पदे भरण्याची मागणी करण्यात आली आहे.



# न्यू गांधी कॉलनीतील अतिक्रमित बांधकाम केले जमीनदोस्त

### अतिक्रमणाविरुद्ध महापालिकेची धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

शहरातील साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे चौक परिसरात सोलापूर महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने मंगळवारी मोठी कारवाई करत एन.जी. मिल कंपाऊंडमधील न्यू गांधी कॉलनीतील अतिक्रमित बांधकाम जमीनदोस्त केले. कारवाईदरम्यान अतिक्रमणधारक व अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली. विरोध झुगारून अखेर ही कारवाई पूर्ण केली.

डॉ. कोटणीस यांचे स्मारक उभारणीपूर्वी या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या ३४ कुटुंबांचे शासनाकडून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकातील न्यू गांधी कॉलनी एनजी मिल कंपाऊंड येथे पुनर्वसन करण्यात आले होते. मात्र, याच शासनाच्या जागेवर एका व्यक्तीने पुन्हा अतिक्रमण करून मजबूत घर आणि पत्रा शेड उभारले होते. या प्रकरणी भूमी व मालमत्ता विभागाने अतिक्रमण प्रतिबंधक विभागाला कारवाईचे पत्र दिल्यानंतर आज अतिक्रमण विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस बंदोबस्तात ही पाडकाम मोहीम राबविण्यात आली.

कारवाई सुरू असताना संबंधित अतिक्रमणधारकाने बनसोडे यांचा हात पकडत विरोध करण्याचा प्रयत्न केला. यावर बनसोडे यांनी संताप व्यक्त करत हात धरायचा काय अधिकार? असा सवाल करत त्यास दूर केले. यावेळी त्या व्यक्तीच्या कुटुंबातील महिलांनी आक्रोश करत कारवाईला विरोध दर्शविला. दरम्यान, परिसरातील इतर महिलांनी मात्र या अतिक्रमणामुळे त्रास होत असल्याचे सांगत ते तात्काळ हटवण्याची मागणी केली. अखेरीस महापालिकेच्या पथकाने संबंधित अतिक्रमण पूर्णतः पाडून टाकत जागा मोकळी केली.

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. सतीश वळसंगकर यांना सोलापुरात भावपूर्ण श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

समाजातील प्रत्येक घटकाशी जिव्हाळ्याचे नाते जपणारे आणि आपल्या कार्यातून अनेकांचे जीवन समृद्ध करणारे ज्येष्ठ व्यक्तिमत्व डॉ. सतीश वळसंगकर यांना सोलापूरकरांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

१२ मार्च २०२६ रोजी वयाच्या ७३व्या वर्षी पुण्यात त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी मंगळवारी ७ एप्रिल रोजी हॉटेल सूर्या एक्झिक्युटिव्ह येथे मित्र परिवाराच्या वतीने शोकसभेचे आयोजन केले होते. यावेळी उपस्थित विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी डॉ. वळसंगकर यांच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या निधनाने सोलापूरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना व्यक्त केली आहे.




शोकसभेत डॉ. वळसंगकर यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू उलगडले:

वंदना कुलकर्णी व शुभदा देशपांडे: त्यांनी डॉ. वळसंगकर यांच्यातील संवेदनशीलता आणि कौटुंबिक जिव्हाळ्याच्या आठवणी सांगताना त्यांचे जाणे मनाला चटका लावून जाणारे असल्याचे सांगितले.

**अरविंद जोशी व सुनील इंगळे:** ''डॉक्टरांनी मैत्रीचे नाते नेहमीच निस्पृहपणे जपले. त्यांच्याकडे पाहिल्यावर एक सकारात्मक ऊर्जा मिळत असे,'' अशा शब्दांत त्यांनी भावना व्यक्त केल्या.

**डॉ. श्रीकांत येळेगावकर :** वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल बोलताना त्यांनी डॉक्टरांच्या शिस्तप्रिय आणि अभ्यासू वृत्तीचे कौतुक केले.

**प्राचार्य गजानन धरणे :** वळसंगकर सरांच्या वैचारिक बैठकीवर प्रकाश टाकला आणि ते मार्गदर्शक कसे होते हे स्पष्ट केले.

**चेतन नरोटे व किरण फडके :** राजकीय आणि सामाजिक स्तरावर वावरताना डॉक्टरांनी जपलेला समतोल आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची त्यांची वृत्ती आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

**जे. जे. कुलकर्णी :** डॉ. वळसंगकर यांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या स्मृती चिरंतन राहतील असा विश्वास व्यक्त केला.

**मित्र परिवाराचा शोकाकुल निरोप**

हॉटेल सूर्या एक्झिक्युटिव्ह येथे पार पडलेल्या या सभेला सोलापुरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, डॉक्टर, प्राध्यापक आणि मोठा मित्र परिवार उपस्थित होता. सभेच्या शेवटी सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत डॉ. सतीश वळसंगकर यांना श्रद्धांजली वाहिली.

एका बहुआयामी आणि सुसंस्कृत व्यक्तिमत्वाचा अस्त झाल्याची भावना सर्वांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे जाणवत होती. डॉ. राजीव प्रधान, डॉ. क्षमा वळसंगकर, डॉ. उमा वळसंगकर, राजा गांधी, रोहिणी तडवळकर ज्येष्ठ विधीज्ञ धनंजय माने, पुष्पा आगरकर, सुलभा पिशवीकर, सविता लळित, पद्माकर कुलकर्णी डॉ. श्रुती वडगबाळकर, डॉ नरेंद्र काटीकर, रवींद्र नाशिककर, अमोल चाफळकर यांच्यासह मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता

# विश्व हिंदू परिषदेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी डॉ.विष्णू मोंढे

### उपाध्यक्षपदी ॲड.केदार पाटील, जयदेव सुरवसे जिल्हा सहमंत्रीपदी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल -**

सोलापूर जिल्हा विश्व हिंदू परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. विष्णू मोंढे, जिल्हा उपाध्यक्षपदी ॲड. केदार पाटील-शेळगीकर तर जिल्हा मंत्रीपदी जयदेव सुरवसे यांच्या निवडीची अधिकृत घोषणा विश्व हिंदू परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांनी केली.

पुणे येथील भावे प्राथमिक प्रशालेच्या सभागृहात रविवारी विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताची बैठक विश्व हिंदू परिषदेचे प्रांताध्यक्ष प्रा. गजानन धरणे यांच्या अध्यक्षतेखाली व आंतरराष्ट्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे, क्षेत्र संघटनमंत्री अनिरुध्द पंडीत, उपाध्यक्षा माधवी, सहमंत्री ॲड. सतीश गोरडे व नितीन वाटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

जिल्हा विश्व हिंदू परिषदेच्या नूतन जिल्हा पदाधिकाऱ्यांची बैठक बुधवारी शिवस्मारक येथे नूतन जिल्हाध्यक्ष डॉ. विष्णू मोंढे यांच्या अध्यक्षतेखाली बोलाविण्यात आली आहे. शहर व जिल्ह्यातील प्रत्येक प्रखंडात नव्याने विश्व हिंदू परिषदेच्या संघटनेची संघटनात्मक बांधणी करुन, नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याा करण्यात येणार आहेत.

श्रीराम जन्मभूमीच्या यशस्वी आंदोलनाचे प्रणेते तथा विश्व हिंदू परिषदेचे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष कारसेवक स्व.अशोक सिंघल यांच्या शताब्दीचे औचित्य साधून शहराच्या खंड-वस्त्या व प्रखंडातील ग्रामस्तरावर विश्व हिंदू परिषदेच्या समिती गठीत करून 'शत् प्रतिशत् विश्व हिंदू परिषदेच्या शाखा विश्व हिंदू परिषदेचे प्रांताध्यक्ष प्रा. गजानन धरणे, विभाग मंत्री विजयकुमार पिसे व सहविभाग मंत्री संजयकुमार जमादार यांच्या उपस्थितीत उघडण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा मंत्री जयदेव सुरवसे यांनी दिली.


# एसबीआय लाइफ इन्शुरन्सची नवीन ब्रँड मोहीम

***वेगाने बदलणाऱ्या भारतात प्रत्येक वयोगटातील आणि विविध भागांतील लोकांच्या आकांक्षा झपाट्याने वाढत आहेत. मात्र त्याचवेळी कुटुंबाप्रती असलेली आर्थिक जबाबदारी ही जीवनातील निर्णयांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असते. एसबीआय लाइफच्या नव्या ब्रँड मोहिमेचा गाभा याच विचारावर आधारित आहे, तो म्हणजे आपल्या प्रियजनांना दिलेली आश्वासने सुरक्षित असतात, तेव्हाच व्यक्ती आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी खऱ्या अर्थाने आत्मविश्वासाने पाऊल उचलु शकते.***

नवीन टीव्हीसीमध्ये हा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. आर्थिक संरक्षण असल्यास व्यक्ती तडजोड न करता मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि ती पूर्ण करण्याचे धाडस मिळते, हे या मोहिमेतून दाखवण्यात आले आहे. नवीन करिअरची निवड असो, मुलांच्या स्वप्नांना पाठबळ देणे असो किंवा स्वतःचा नवा उपक्रम सुरू करणे असो ही मोहीम संदेश देते की सुरक्षेची खात्री असते, तेव्हा व्यक्ती त्यांच्या इराद्यांवर अधिक ठामपणे आणि धैर्याने कृती करू शकतात.

हा विचार एसबीआय लाइफच्या 'अपने लिये, अपनों के लिये' या मूळ तत्त्वाशी सुसंगत आहे. जीवन विमा हे केवळ आर्थिक उत्पादन नसून जीवनातील महत्त्वाच्या निर्णयांना बळ देणारे साधन आहे, असा कंपनीचा विश्वास आहे. आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करून व्यक्तीला स्वप्ने आणि जबाबदाऱ्या यांचा समतोल साधता येतो आणि मन:शांतीसह पुढे जाता येते. भावनिक आणि वास्तववादी कहाण्यांद्वारे ही मोहीम जीवनाचा स्वाभाविक भाग म्हणून मांडण्याची आहे. जीवन विम्यामुळे व्यक्तीला सुरक्षिततेची भावना मिळते आणि त्यामुळे सकारात्मकता व प्रगतीचा मार्ग सुकर होतो, हा संदेश यातून दिला जातो.

ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवड का करण्यात आली? जॉली आणि पॉली कोणाचे प्रतिनिधीत्व करतात? आजचा ग्राहक महत्त्वाकांक्षी आहे, आत्मविश्वासू आहे आणि आयुष्यात अर्थपूर्ण ध्येये गाठण्याची जिद्द असणारा आहे. पण त्याचवेळी तो कुटुंबाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांबाबतही तितकाच जागरूक असतो. निर्णय केवळ भावनेच्या भरात घेतले जात नाही, तर स्वप्ने आणि जबाबदारी यांचा समतोल साधत घेतले जातात. या बदलत्या विचारसरणीनुसार ब्रँड ॲम्बेसेडरची निवड आधारलेली आहे. ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा हे दोघेही आयुष्यातील या दोन परस्परपूरक दृष्टिकोनांचे सहज प्रतिनिधीत्व करतात. त्यांना 'जॉली' आणि 'पॉली' म्हणून सादर करण्यात आले आहे. ते केवळ पारंपारिक सेलिब्रिटी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून समोर येत नाहीत, तर जीवनातील महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या दोन भिन्न मानवी प्रवृत्तींचे प्रतीक आहेत.

'जॉली आणि पॉली' ही संकल्पना भारतातील कुटुंबांमध्ये घडणाऱ्या अंतर्गत संवादाचे प्रतीक आहे, जेथे प्रगती करण्याची ओढ आणि आपल्या प्रियजनांची काळजी घेण्याची जबाबदारी यांचा समतोल साधला जातो. त्यांची भूमिका विम्याचे नाट्यमय सादरीकरण करण्याची नाही, तर विम्याला दैनंदिन जीवनाचा स्वाभाविक भाग म्हणून मांडण्याची आहे. जीवन विम्यामुळे व्यक्तीला सुरक्षिततेची भावना मिळते आणि त्यामुळे सकारात्मकता व प्रगतीचा मार्ग सुकर होतो, हा संदेश यातून दिला जातो. ऋषभ पंतने साकारलेली 'जॉली' ही स्वभावप्रवृत्ती, आशावाद आणि भरभरून जगण्याच्या ध्येयाचे प्रतीक आहे. नियोजन करणे म्हणजे स्वातंत्र्य गमावणे नसून, आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे आणि त्याची पूर्तता करणे, हे तो पटवून देतो. याउलट, रवींद्र जडेजाने साकारलेली 'पॉली' ही व्यक्तिरेखा संयम, विश्वासार्हता आणि दीर्घकालीन विचारांचे प्रतिनिधीत्व करते. तो अत्यंत शांतपणे आणि स्पष्टतेने संदेश देतो की, पूर्वतयारी किंवा नियोजन ही केवळ एक जबाबदारी नसून, ती वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि कौटुंबिक सुरक्षा या दोघांनाही बळ देणारी कृती आहे.

**ही मोहीम तरुण प्रेक्षकांशी कशी जोडली जाते?**

आजची तरुण पिढी महत्त्वाकांक्षी, सुजाण आणि स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास उत्सुक आहे. पण, त्याच वेळी ते कुटुंब, आर्थिक स्थैर्य आणि दीर्घकालीन सुरक्षितता याप्रती असलेल्या आपल्या जबाबदाऱ्यांबाबत देखील अधिकाधिक जागरूक होत आहेत. ही पिढी कौटुंबिक जबाबदाऱ्या टाळत नाही आहे; उलट, त्या जबाबदाऱ्या आणि स्वतःच्या छंदांचा किंवा आवडीचा पाठलाग यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करत आहे.

ही मोहीम भारतातील घराघरांत सर्रास आढळणाऱ्या प्रसंगांचे चित्रण करून आजच्या पिढीच्या विचारसरणीशी संलग्न होते. यामध्ये करिअरमधील बदल, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि जीवनातील अशा निवडी दाखवल्या आहेत ज्यामध्ये 'धाडस आणि 'सावधगिरी' या दोघांचा मेळ आहे. ही मोहीम कोणत्याही क्लिष्ट आर्थिक संज्ञा किंवा तांत्रिक शब्दांचा वापर न करता, आर्थिक संरक्षण कशा प्रकारे शांतपणे आत्मविश्वास वाढवते हे दर्शवते. एकदा का कुटुंबाप्रती असलेल्या जबाबदाऱ्या सुरक्षित झाल्या की, तरुण पिढीला आपल्या आवडीच्या क्षेत्रांत पूर्ण ताकदीने आणि प्रगतीशील पाऊल उचलणे कसे शक्य होते, हे या कथानकातून प्रभावीपणे मांडले आहे.

तरुण ग्राहक, विशेषतः पहिल्यांदाच विमा पॉलिसी घेणाऱ्यांसाठी, हा संदेश अगदी स्पष्ट आहे: लवकर नियोजन करणे म्हणजे निवडींवर मर्यादा आणणे नसून स्वतःला सक्षम बनवणे आहे. आपल्या प्रियजनांच्या गरजा सुरक्षित करून, तरुणांना त्यांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी एक प्रकारची स्पष्टता, आत्मविश्वास आणि मनःशांती मिळते, जी त्यांना मुक्तपणे प्रगती करण्यास वाव देते.

**आगामी काळात एसबीआय लाइफचा ब्रँडचा भर कशावर असेल?**

पुढील काळात एसबीआय लाइफचा ब्रँड भर लोकांच्या स्वप्नांना बळ देणाऱ्या सक्षम भागीदाराची भूमिका अधिक मजबूत करण्यावर राहील. आर्थिक सुरक्षितता व्यक्तीला आत्मविश्वासाने आयुष्य जगण्याची ताकद देते, हा विचार अधिक ठळकपणे मांडला जाईल. महत्त्वाकांक्षा आणि जबाबदारी यांचा समतोल साधणे हीच खरी प्रगती आहे, या भूमिकेला ब्रँड पुढेही अधोरेखित करेल. जीवन विमा हा केवळ गरजेपोटी घेतला जाणारा उत्पादन नसून, स्वातंत्र्य आणि नव्या शक्यता उघडणारा सजग निर्णय आहे, अशी भूमिका कंपनी मांडणार आहे. 'अपने लिये, अपनों के लिये' या तत्त्वाचा विस्तार करत एसबीआय लाइफ सांस्कृतिकदृष्ट्या सुसंगत कथानक तयार करण्यावर, ग्राहकांसोबत भावनिक नाते अधिक दृढ करण्यावर आणि आर्थिक संरक्षण अधिक सोपे व सुलभ बनवण्यावर भर देईल. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर, तसेच विविध भागांमध्ये आर्थिक संरक्षण अधिक सोपे आणि सहज उपलब्ध करून देणे, यावर विशेष लक्ष राहील. त्याचबरोबर नवकल्पना, डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर आणि ग्राहकांकेंद्रित उपाययोजना यांवर भर देत नव्या, महत्त्वाकांक्षी भारताच्या गरजांशी सुसंगत सेवा विकसित केल्या जातील. संरक्षणाची गती आणि लोकांच्या स्वप्नांची गती यांत ताळमेळ राखणे, हेच उद्दिष्ट असेल. थोडक्यात सांगायचे तर, देशातील प्रत्येक व्यक्ती आणि प्रत्येक कुटुंबाच्या प्रगतीला चालना देणारे प्रेरणास्थान बनणे, हीच एसबीआय लाइफची भावी दिशा आहे.

**- रवींद्र शर्मा,**
**प्रवक्ता ब्रँड, कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स आणि सीएसआर प्रमुख**



पार्थ पवार काँग्रेसच्या बाबतीत चुकले. असा कोणताही पक्ष संपत नसतो. या प्रकरणी नेहमी जमिनीवर राहणे महत्त्वाचे आहे. पार्थ पवारांचे काँग्रेसचे विषयीचे विधान चुकले आहे.
**- रोहित पवार**, आमदार (श. प. गट)


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

बुधवार, ८ एप्रिल २०२६ ३




लोकशाहीवर बोलण्याचा अधिकार संजय राऊत यांना नाही. त्यांचा पक्ष लोकशाहीवर नाही तर घराणेशाहीवर चालतो, हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. राऊतांना कुठेच मान्यता नाही.
**- नवनाथ बन**, भाजपा प्रवक्ते

# क्षेपणास्त्र हल्ल्यात अल्बोर्झ प्रांतात विध्वंस

## इराणचे विमानतळ, रेल्वे स्थानके, निवासी भाग लक्ष्य, ३८ नागरिकांचा मृत्यू



**◆ तेहरान/तेल अवीव, ७ एप्रिल**

युद्ध समाप्तीसाठी इराणने सर्व अटी फेटाळून लावल्यानंतर अमेरिका-इस्रायलने हल्ल्यांची तीव्रता वाढवली आहे. मंगळवारी अल्बोर्झ प्रांतातील विमानतळ, रेल्वे स्थानके आणि निवासी भागांना लक्ष्य करीत ड्रोन आणि क्षेपणात्रांचा मारा केला. हल्ल्यात बहुतांश निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या. आतापर्यंत ३८ नागरिकांचा मृत्यू झाला असून, शेकडो जखमी असल्याची माहिती इराणच्या सरकारी प्रवक्त्याने दिली.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी करार न झाल्यास मोठ्या हल्ल्याचा इशारा ट्रम्प यांनी सोमवारी पत्रपरिषदेतून दिला होता. त्यांनी २४ तासात इराणमध्ये विध्वंस घडविण्याचे सांगितले होते. दुसरीकडे इराणने हल्ले थांबविल्यावरच वाटाघाटी सुरू करणार असल्याचे स्पष्ट केले होते. अशातच दबाव वाढविण्यासाठी मंगळवारी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ल्याची तीव्रता आणखी वाढवली. अल्बोर्झ प्रांतातील खोरमाबाद विमानतळावर क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला. यात धावपट्टी आणि विमानतळाची इमारत उद्ध्वस्त झाली. दुसरीकडे या भागातील रेल्वे स्थानके आणि निवासी इमारतींवर जोरदार हल्ले करण्यात आले. यात ३८ नागरिकांचा मृत्यू आणि शंभरपेक्षा अधिक जण जखमी असल्याचे इराणच्या सरकारी प्रवक्त्याने म्हटले आहे. अमेरिका आणि इस्रायलने इराणमधील १७ निवासी भागांवर बॉम्बहल्ला केला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार संघटनेने निवासी भागांवरील हल्ल्याचा निषेध केला आणि म्हटले की, आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्यानुसार निःशस्त्र नागरिकांवर हल्ला करणे हा युद्ध गुन्हा आहे. ◂(वृत्तसंस्था)

### दीड कोटी नागरिक बलिदानास तयार : पेझेश्कियन

**ट्रम्प यांच्या धमकीला प्रत्युत्तर देताना इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियन म्हणाले की, दीड कोटी इराणी नागरिक स्वेच्छेने बलिदान देण्यास तयार आहेत. काहीही झाले तरी आम्ही अमेरिकेच्या दबावापुढे झुकणार नाही. तरुण, कलाकार आणि इतरांना इराणी ऊर्जा केंद्रांवर मानवी साखळी तयार करण्याचे आवाहन त्यांनी केले**

### सौदीला बहरीनशी जोडणारा पूल पुन्हा सुरू

**सौदी अरबला बहरीनशी जोडणारा महत्त्वाचा पूल, किंग फहद कॉजवे, इराणी हल्ल्यांच्या धोक्यामुळे बंद करण्यात आला होता. तथापि, तो आता पुन्हा सुरू झाला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून वाहनांची वाहतूक या पुलावरून बंद करण्यात आली होती. २५ किलोमीटर (१५.५ मैल) लांबीचा हा पूल, अमेरिकन नौदलाच्या पाचव्या ताफ्याचे मुख्यालय असलेल्या बहरीनला अरबी द्वीपकल्पाशी जोडणारा एकमेव रस्ता आहे.**

### शिराझ पेट्रोकेमिकल प्रकल्प उद्ध्वस्त

इस्रायली लष्कराने नैऋत्य इराणमधील शिराझ येथील एका पेट्रोकेमिकल प्रकल्पावर क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात संपूर्ण प्रकल्प उद्ध्वस्त झाला. इस्रायलच्या संरक्षण विभागाने म्हटले की, हा पेट्रोकेमिकल प्रकल्प इराणी राजवटीच्या सशस्त्र दलांसाठी नायट्रिक ॲसिडचे उत्पादन करत होता. स्फोटकांसाठी महत्त्वाचे रासायनिक घटक आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या विकासासाठी लागणारे साहित्य या प्रकल्पात तयार करण्यात येत असल्याचे यावर हल्ला करण्यात आले.



## इराणची रेल्वे सेवा आमचे लक्ष्य


### इस्रायलचा नागरिकांना दूर राहण्याचा इशारा

**◆ तेल अवीव, ७ एप्रिल**

इस्रायली संरक्षण दलाने इराणच्या रेल्वे सुविधाला लक्ष्य करण्याची थेट धमकी दिली. तेहरानमधील रेल्वे स्थानकांवर आणि प्रमुख परिवहन केंद्रांपासून नागरिकांनी दूर राहावे. कोणत्याही क्षणी तेथे क्षेपणास्त्रांचा मारा होऊ शकतो असा इशारा त्यांनी दिला.

इस्रायलने इराणच्या रेल्वे स्थानकांना किंवा रुळांना लक्ष्य केले, तर देशाची संपूर्ण रसद आणि दळणवळण व्यवस्था कोलमडून पडण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. रेल्वे हे इराणमधील लांब पल्ल्याच्या प्रवासाचे मुख्य साधन असल्याने, या हल्ल्याचा मोठा फटका सर्वसामान्य नागरिकांना आणि लष्करी वाहतुकीला बसू शकतो. सध्या संपूर्ण इराणमध्ये अराजकतेसारखी स्थिती निर्माण झाली असून प्रशासन परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. इस्रालच्या धमकीला प्रत्युत्तर देताना इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीने म्हटले की, लष्करी अपयशांना झाकण्यासाठी अशा पोकळ धमक्या दिल्या जात आहे. इस्रायल-अमेरिकेने गैर-लष्करी ठिकाणांना लक्ष्य केले, तर इराणचा पलटवार हा आधीपेक्षा अधिक भीषण आणि मोठ्या स्तरावर असेल. ◂(वृत्तसंस्था)

### वाटाघाटी नाजूक वळणावर : मोगद्दम



**अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचला असतानाच, कूटनीतिक पातळीवर युद्धाला पूर्णविराम देण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. पाकिस्तानमधील इराणचे राजदूत रझा अमिरी मोगद्दम यांनी सांगितले की, युद्ध रोखण्यासाठी सुरू असलेल्या चर्चा आता अत्यंत नाजूक आणि महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचल्या आहेत.**

## बॉम्बहल्ल्यात दोन मुलांचा मृत्यू; आई जखमी

### घटनेच्या निषेधार्थ निदर्शने; तोडफोड व जाळपोळ



**◆ इंफाळ, ७ एप्रिल**

मणिपूरच्या बिष्णुपूर जिल्ह्यातील मोइरांग ट्रोंगलाओबी परिसरात सोमवारी मध्यरात्री अतिरेक्यांनी एका घरावर बॉम्ब फेकला. यात पाच वर्षांच्या मुलासह सहा महिन्यांच्या मुलीचा मृत्यू झाला तर आई जखमी झाली. या हल्ल्यामुळे स्थानिक लोकांमध्ये संतापाची लाट उसळली असून घटनेच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले. तसेच संतप्त जमावाने पोलिस चौकीत तोडफोड करुन टँकर व ट्रकला आग लावली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा घरावर बॉम्ब फेकण्यात आला तेव्हा दोन मुले आणि त्यांची आई बेडरूममध्ये झोपले होते. या बॉम्ब स्फोटात दोन्ही मुलांचा मृत्यू तर आई गंभीर जखमी झाली आहे. या घटनेनंतर स्थानिक लोकांनी मंगळवारी सकाळी जोरदार आंदोलन केले. परिसरात एका पेट्रोल पंपाजवळ दोन ऑइल टँकर आणि एका ट्रकला आग लावली. तसेच मोइरांग पोलिस ठाण्यासमोर टायर जाळले आणि एका पोलिस चौकीत तोडफोड केली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी परिसरात सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे. बिष्णुपूर जिल्ह्यात संशयित कुकी दहशतवाद्यांच्या हल्ल्याच्या निषेधार्थ संतप्त स्थानिक नागरिकांनी रस्त्यावर उतरुन आंदोलन केले. परिसरात वाढत्या तणावासह कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेता मणिपूर सरकारने एका सरकारी आदेशानुसार इम्फाळ पश्चिम, इम्फाळ पूर्व, थौबल, काकचिंग आणि बिष्णुपूर जिल्ह्यांमध्ये इंटरनेट आणि मोबाईल डेटा सेवा तात्काळ प्रभावाने तीन दिवसांसाठी तात्पुरती बंद करण्याचे आदेश दिले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### शांतता भंग करण्याचा कट

**या घटनेवर मुख्यमंत्री वाय. खेमचंद सिंग म्हणाले, हा मानवतेवरील थेट हल्ला आणि मणिपूरमधील कष्टाने मिळवलेली शांतता भंग करण्याचा व सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न आहे. मी याचा तीव्र शब्दांत निषेध करतो. हल्लेखोरांची ओळख पटवून त्यांचा शोध घेत त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. अशी दहशतवादी कृत्ये कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.**

## अशोक खरात प्रकरणाचा ‘एसआयटी’कडून सखोल तपास

**तेजस्वी सातपुते : खरातला गुन्ह्यांसाठी मदत करणाऱ्यांवर कारवाई होणार**

**नाशिक** : राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाचा तपास आता अंतिम टप्प्याकडे सरकत आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) व्याप्ती वाढवण्यात आली असून, एकूण २४ अनुभवी पोलीस अधिकारी आणि अंमलदारांचे पथक अहोरात्र काम करत असल्याची माहिती एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. यावेळी त्यांनी खरातच्या अघोरी कृत्यांचा पाढा वाचतानाच, पीडित महिलांच्या गोपनीयतेबाबत अत्यंत महत्त्वाचे आवाहन केले. तसेच जसे तपासात पुरावे समोर येतील, तसे अशोक खरातला गुन्ह्यांसाठी मदत करणाऱ्यांवर कारवाई होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



तेजस्वी सातपुते यांनी दिलेल्या माहितीनुसार, या विशेष तपास पथकामध्ये २ पोलीस उपअधीक्षक, ३ पोलीस निरीक्षक, ३ सहाय्यक पोलीस निरीक्षक, १० पोलीस उपनिरीक्षक आणि ६ पोलीस अंमलदार अशा एकूण २४ जणांचा समावेश आहे. हे पथक तांत्रिक पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे खरातच्या गुन्ह्यांचे जाळे उलगडत आहे. अशोक खरात याच्यावर नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत मिळून एकूण १२ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी ११ गुन्ह्यांचा तपास थेट एसआयटीमार्फत केला जात आहे. यामध्ये ८ गुन्हे हे महिलांवरील लैंगिक अत्याचाराचे असून उर्वरित ३ गुन्हे आर्थिक फसवणूक, जादूटोणा विरोधी कायदा आणि अवैध सावकारी अधिनियमांतर्गत नोंदवण्यात आले आहेत. इतर तीन गुन्ह्यांचा तपास स्थानिक पोलीस करत आहेत. तपासादरम्यान आतापर्यंत ३० पेक्षा अधिक साक्षीदारांची चौकशी करण्यात आली आहे. खरात हा स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचे भासवून भाविकांच्या आणि पीडितांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत असे. कुटुंबातील सदस्यांचा मृत्यू होईल अशी भीती दाखवून, तसेच खडे, चिंचोके आणि रुद्राक्षाच्या माध्यमातून तो लोकांकडून पैसे उकळत होता.

ईशान्येश्वर मंदिर परिसरात अंधाराचा फायदा घेत हातचालाखीने चमत्कार दाखवणे आणि महिलांना बदनामीची धमकी देऊन त्यांचे लैंगिक शोषण करणे, असा त्याचा भयानक 'मोडस ऑपरेंडी' असल्याचे निष्पन्न झाले आहे. पत्रकार परिषदेत तेजस्वी सातपुते यांनी समाजाला एक महत्त्वाचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, महिला अत्याचाराच्यासंदर्भाने दाखल आठही गुन्ह्यांमध्ये पीडिता आणि त्यांचे कुटुंबीय अतिशय धाडसाने समोर आलेले आहेत. त्यांनी फिर्याद दाखल केल्यामुळे आपण कायदेशीर कारवाई करू शकत आहोत. या महिलांनी लोक काय म्हणतील? या भीतीने अन्याय सहन केलेला आहे. आता अतिशय धाडसाने कुटुंबाला विश्वासात घेऊन गुन्हे दाखल केलेले आहेत. त्यामुळे त्यांची ओळख उघड न करणे, सोशल मीडियावर त्यांचे व्हिडिओज न पसरवणे, आपल्या मोबाईल्स मध्ये असे व्हिडिओ न बाळगणे हे आपल्या सगळ्यांचे नैतिक कर्तव्य तर आहेच, त्याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाचे देखील तसे कठोर निर्देश आहेत. त्यांची ओळख गोपनीय राहणे आणि त्यांच्या खासगी बाबींची सार्वजनिक चर्चा न होणे हे त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी आणि त्यांचे धैर्य टिकून राहण्यासाठी अतिशय गरजेचे आहे, असे आवाहन तेजस्वी सातपुते यांनी केले.

**पीडितांची गोपनीयता आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश**

पीडित महिलांनी अत्यंत धाडसाने पुढे येऊन तक्रारी दिल्या आहेत, त्यामुळे त्यांची प्रतिष्ठा राखणे हे समाजाचे कर्तव्य असल्याचे सातपुते यांनी अधोरेखित केले. भारतीय संविधानाचे अनुच्छेद २१ आणि बीएनएस कलम ७२ नुसार लैंगिक अत्याचार पीडितांची ओळख उघड करणे हा गंभीर गुन्हा आहे. पीडितांच्या वैयक्तिक आयुष्यावर चर्चा करणे किंवा त्यांचे व्हिडिओ प्रसारित करणे हे केवळ अनैतिकच नाही तर बेकायदेशीर आहे. अशा कृत्यांमुळे पीडितांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होतो, त्यामुळे प्रसारमाध्यमांनी आणि नागरिकांनी 'मीडिया ट्रायल' टाळावी, असे आवाहन त्यांनी केले.

**अधिकाऱ्यांच्या चौकशीचे संकेत**

या प्रकरणात काही बडे पदाधिकारी किंवा अधिकारी सहभागी आहेत का? या प्रश्नावर बोलताना तेजस्वी सातपुते यांनी स्पष्ट केले की, तपास हा पूर्णपणे पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबावर आधारित आहे. खरातच्या या गुन्ह्यांची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी किंवा त्याला मदत करण्यासाठी इतर कुणी कारणीभूत ठरले आहे का, याचा शोध घेतला जात आहे. तपासादरम्यान ज्यांचे नाव पुराव्यानिशी समोर येईल, त्यांच्यावर निश्चितपणे कायदेशीर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या विधानामुळे येत्या काळात काही बड्या व्यक्तींची चौकशी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## आदिवासींच्या आंदोलनाला हिंसक वळण; ५० जखमी

### ओडिशातील घटना, बॉक्साईट खाणीकडे जाणाऱ्या रस्ते बांधकामाला विरोध



**◆ रायगड, ७ एप्रिल**

ओडिशाच्या रायगड जिल्ह्यातील शागबारी गावात बॉक्साईट खाणीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बांधकामाला विरोध करीत स्थानिक आदिवासी नागरिकांनी केलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले. पोलिस आणि नागरिकांमध्ये झालेल्या संघर्षात ५० जण जखमी झाले. यात ४० पोलिसांचा समावेश आहे.

सिजिमाली बॉक्साईट खाणीकडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम सुरू करण्यात आले. याला स्थानिक आदिवासींनी विरोध केला. बांधकामाच्याविरोधात मंगळवारी तीव्र आंदोलन करण्यात आले. नागरिकांनी बांधकाम बंद पाडले, यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप केला असता, त्यांच्यावर दगडफेक, धारदार शस्त्रांनी हल्ला करण्यात आला. हिंसक संघर्षात ४० पोलिस कर्मचाऱ्यांसह एकूण ५० जण जखमी झाले. अतिरिक्त पोलिस महासंचालक संजय कुमार यांनी सांगितले की, जिल्ह्यातील काशीपूर ब्लॉकमधील शागबारी गावात स्थानिक आदिवासींनी रस्त्याच्या बांधकामाला विरोध केला. रस्त्याचे बांधकाम थांबवण्याच्या प्रयत्नात आंदोलकांनी दगडफेक केली आणि तलवारी, कुऱ्हाडी व इतर धारदार शस्त्रांनी पोलिस आणि जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर हल्ला केला. या घटनेत जखमी झालेल्यांना रायगड येथील जिल्हा मुख्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. परिस्थिती नियंत्रणासाठी अतिरिक्त पोलिस पथक तैनात करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

### शागबारी गावात संचारबंदी लागू

**ओडिशा सरकारने सिजिमाली बॉक्साईट खाण एका खाजगी कंपनीला दिली आहे. तेव्हापासून लोक या प्रकल्पाला विरोध करत आहेत. प्रशासन सिजिमाली बॉक्साईट खाणीपर्यंत रस्ता बांधण्यासाठी कंपनीला मदत करत होते. एका अधिकाऱ्याने सांगितले की, रायगडाचे जिल्हाधिकारी कुलकर्णी आशुतोष सी घटनास्थळी पोहोचले आणि आंदोलन करणाऱ्या आदिवासींशी वाटाघाटी सुरू केल्या. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने शागबारी गावात संचारबंदी लागू केली आहे.**

### भिलाई स्टील प्लांटमध्ये आग; ९ कामगार जखमी

**◆ भिलाई, ७ एप्रिल**

भिलाई स्टील प्लांटच्या पीबीएस-२ सुविधेतील २५-मेगावॅट टर्बाईन विभागात मंगळवारी सकाळी भीषण आग लागली. आगीच्या ज्वाळा बघून कर्मचाऱ्यांमध्ये भीती पसरली. जीव वाचवण्यासाठी काही कर्मचाऱ्यांनी इमारतीवरून उड्या मारल्या. यात अनेक कर्मचाऱ्यांच्या हाता-पायाला दुखापत झाली तर दोन कर्मचारी किरकोळ होरपळले.

घटनेच्या वेळी अनेक कर्मचारी मशीन हॉलमध्ये काम करीत होते. जखमी कर्मचाऱ्यांना तत्काळ प्लांटमधील मुख्य वैद्यकीय केंद्रात नेण्यात आले. प्रथमोपचारानंतर दोन कर्मचाऱ्यांना रुग्णालयात पाठविण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

### ओडिशात गो-तस्करांवर छापे

**◆ रायरांगपूर, ७ एप्रिल**

गो-तस्कर, जनावरांची चोरी आणि अवैध वाहतूक यांविरुद्धच्या मोठ्या कारवाई अंतर्गत पोलिसांनी मंगळवारी कथित गोमाफिया नेटवर्कला लक्ष्य करून एक मोठी मोहीम सुरू केली. डीआयजींच्या नेतृत्वाखाली पूर्व विभाग पोलिस मयूरभंज, बालासोर आणि भद्रक जिल्ह्यांमध्ये सातत्याने छापे टाकत आहेत. या मोहिमेचा एक भाग म्हणून, मयूरभंज जिल्ह्यातील बारीपाडा टाऊन, भंजपूर, झारपोखरिया, शुलियापाडा, बांगिरीपोसी, बैसिंगा आणि बदामपहाड यासह सात पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील १५ ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. छाप्यादरम्यान पोलिसांनी मोठ्या प्रमाणात रोकड, सोन्या-चांदीचे दागिने, बँक पासबुक, मालमत्तेची कागदपत्रे आणि अवैध जनावरांच्या वाहतुकीसाठी वापरली जाणारी वाहने जप्त केली. ◂(वृत्तसंस्था)

## पवन खेडांच्या घरावर छापा

**◆ नवी दिल्ली, ७ एप्रिल**

काँग्रेस नेते आणि राष्ट्रीय प्रवक्ते पवन खेडा यांच्या अडचणी वाढू शकतात. मंगळवारी आसाम आणि दिल्ली पोलिसांनी त्यांच्या निजामुद्दीन पूर्व येथील निवासस्थानावर छापा टाकला. खेडा यांच्यावरील ही कारवाई आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नीच्या पासपोर्टबाबत केलेल्या आरोपांवरून आणि मुख्यमंत्री सरमा यांनी दाखल केलेल्या एफआयआरवरून करण्यात आली आहे.

खेडा यांच्या घरावर टाकलेल्या छाप्यावरून आता राजकारण तीव्र झाले आहे. काँग्रेसच्या प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत म्हणाल्या, पवन खेडा यांनी हिमंता बिस्वा सरमा आणि त्यांच्या कुटुंबावर पुराव्यांसह गंभीर आरोप केले आहेत. त्यावर त्यांनी प्रत्युत्तर द्यायला हवे. दिल्ली व आसाममध्ये भाजपा सत्तेत आहे. त्यामुळे ते पोलिसांचा वापर करुन विरोधकांना घाबरवण्याचा प्रयत्न करत आहे. तुम्ही आसामच्या लोकांना कसे लुटले, हे सर्वांनाच माहीत आहे. तुम्ही ज्या प्रकारची भाषा वापरत आहात आणि पोलिस पाठवत आहात,



त्यावरून तुम्ही घाबरला आहात हे सिद्ध होत आहे, असेही त्या म्हणाल्या.

खेडा यांच्यावरील कारवाईबाबत मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा म्हणाले, आरोप करण्यापूर्वी त्यांनी परराष्ट्र मंत्र्यांना विचारायला हवे होते. आसाम पोलिस गुन्हेगार लोकांना पाताळातूनही शोधून काढतात. मला संशय आहे की, राहुल गांधींनीच त्यांना ही कागदपत्रे दिली आहेत. त्यामुळे हे प्रकरण राहुल गांधींपर्यंत पोहोचेल. आम्हाला घाबरवण्याचा प्रयत्न करू नका. हा आसाम आहे आणि आम्ही १७ वेळा इस्लामी हल्ल्यांविरुद्ध लढलो आहोत, असेही ते म्हणाले.□ ◂(वृत्तसंस्था)


### नवी मुंबईत टेस्लाचे पहिले चार्जिंग स्टेशन सुरू

**◆ मुंबई, ७ एप्रिल**

इलेक्ट्रिक वाहनांच्या लोकप्रियतेला चालना देत टेस्लाने नवी मुंबईतील नेक्सस सीवूड्स मॉलमध्ये आपले पहिले चार्जिंग स्टेशन सुरू केले आहे. या केंद्रावर टेस्ला वाहनांसाठी एकूण आठ चार्जिंग पॉईंट्स आहेत. यामध्ये चार सुपरचार्जर आणि चार डेस्टिनेशन चार्जर बसवले गेले आहेत.

कंपनीने भारतातील आपले फास्ट चार्जिंग नेटवर्क वाढविण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. नवीन स्टेशन मॉलच्या बी१ पार्किंग लॉटमध्ये आहे. चार सुपरचार्जर २५० किलोवॅटपर्यंतचा डीसी फास्ट-चार्जिंग वेग देतात, तर चार एसी डेस्टिनेशन चार्जर ११ किलोवॅट आऊटपुट देतात. यामुळे ग्राहक त्यांच्या गरजेनुसार आणि वेळापत्रकानुसार चार्जिंग पद्धत निवडू शकतात. ◂(वृत्तसंस्था)

## फक्त एका आठवड्याची ध्यानसाधनाही फायद्याची...




**◆ सॅन डिएगो, ७ एप्रिल**

फक्त एका आठवड्याची सघन ध्यानसाधना आणि मनोशारीरिक अभ्यासांमुळे मेंदू आणि शरीरात लक्षणीय बदल घडू शकतात, असे अमेरिकेतील एका संशोधनातून लक्षात आले आहे. या प्रयोगात सहभागी झालेल्या व्यक्तिंची मेंदू कार्यक्षमता वाढली, रोगप्रतिकारक शक्ती वाढली आणि नैसर्गिक वेदनाशामक रसायनांमध्ये वाढ दिसून आली. कोणत्याही मादक पदार्थांचा वापर न करता हा प्रयोग करण्यात आला. मात्र, त्याचे परिणाम विशिष्ट रसायनांचा वापर केल्यागत जाणविले.

सॅन डिएगो विद्यापीठातील संशोधकांनी अहवाल दिला आहे की, ध्यानसाधना आणि इतर मनोशारीरिक तंत्रांचा समावेश असलेला एक आठवड्याचा ध्यानसाधना कार्यक्रम मेंदूची क्रिया आणि रक्ताची जैविक रचना या दोन्हींमध्ये महत्त्वाचे सकारात्मक बदल घडवून आणू शकतो. या अभ्यासात असे आढळून आले की, या पद्धतींनी मेंदूची लवचिकता, चयापचय, रोगप्रतिकारक शक्ती आणि वेदनामुक्तीच्या प्रक्रियेत आवश्यक असलेला नैसर्गिक समतोल साध्य झाला. कम्युनिकेशन्स बायोलॉजीमध्ये हे संशोधन प्रकाशित झाले आहे.

भारतात आरोग्य सुधारण्यासाठी ध्यान आणि तत्सम पद्धतींचा वापर हजारो वर्षांपासून केला जात आहे. परंतु त्यांचा शरीरावर नेमका कसा परिणाम होतो हे स्पष्ट करण्यासाठी शास्त्रज्ञांना बरेच संशोधन करावे लागले. या अभ्यासाच्या सुरुवातीला व नंतर संशोधकांनी मेंदूच्या कार्यावर लक्ष ठेवण्यासाठी ‘फंक्शनल मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग’ (एफएमआरआय) चा वापर केला. चयापचय, रोगप्रतिकारशक्ती आणि इतर जैविक लक्षणांमधील बदलांचा मागोवा घेण्यासाठी रक्ताच्या नमुन्यांचे विश्लेषण देखील करण्यात आले.

संशोधक म्हणतात- ‘‘हा अभ्यास दाखवतो की आपले मन आणि शरीर एकमेकांशी जोडलेले आहे. आपण काय मानतो, आपले लक्ष कसे केंद्रित करतो आणि आपण कोणत्या कृतींमध्ये भाग घेतो, त्या आपल्या जैविक रचनेवर परिणाम करू शकतात.’’ ◂(वृत्तसंस्था)

### भारतीय ध्यानसाधनेच्या परंपरेची छाप

**भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून ध्यानसाधनेला महत्त्व देण्यात आले आहे. ध्यानसाधनेची परंपरा संपूर्ण ब्रह्मांडाशी सखोल संबंध प्रस्थापित करण्यासाठी, अहंकाराचा त्याग करण्यासाठी आणि मन शांत करण्यासाठी मौन आणि ध्यानावर भर देणारी आहे. आजकाल मनःशांती, तणावमुक्ती इत्यादींसाठी माइंडफुलनेस इत्यादी नावाने जे काही केले किंवा शिकविले जाते, त्यावर भारतीय ध्यानसाधनेच्या परंपरेची छाप आहे. पाश्चात्य वैज्ञानिक संशोधनाने माइंडफुलनेस इत्यादी प्रकारांना मान्यता मिळवून दिली असली तरी ध्यानसाधनेची मुळे भारतीय संस्कृतीत खोलवर रुजलेली आहेत.**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# महाविकासचा कलगीतुरा

गेल्या काही वर्षांत राज्याच्या राजकारणात झपाट्याने बदल घडत आहेत. विचार बाजूला सारून स्वार्थासाठी युती आणि आघाड्यांचे राजकारण रात्रीतून उदयाला येताना आपण पाहत आहोत. सत्तेसाठी विचारधारांच्या भिंती ओलांडून कोलांटउड्या मारण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. २०१९ मध्ये सुरू झालेला महाविकास आघाडीचा प्रयोगही त्याचेच उदाहरण. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) या भिन्न विचारसरणीच्या पक्षांनी तेव्हा एकत्र येऊन सत्ता स्थापन केली; मात्र या आघाडीच्या पायाभरणीतच मोठी विसंगती होती, हे सतत सिद्ध होत गेले आणि बारामती पोटनिवडणुकीच्या निमित्ताने तेच वास्तव पुन्हा एकवार अधोरेखित झाले आहे.

बारामती म्हणजे पवार कुटुंबीयांचा बालेकिल्ला. शरद पवारांनी या मतदारसंघाला, शहराला राष्ट्रीय पातळीवर वेगळी ओळख दिली. त्यानंतर अजित पवारांनी ही परंपरा पुढे नेत बारामतीचा विकास साधला. अजित पवार यांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या रिक्त जागेसाठी आता सुनेत्रा पवार मैदानात उतरल्या आहेत. त्यामुळे ही निवडणूक भावनिक, राजकीय आणि प्रतीकात्मक अशा तिन्ही पातळ्यांवर महत्त्वाची ठरणार आहे. अशा वेळी महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेनुसार, विशेषतः एखाद्या प्रभावी नेत्याच्या निधनानंतर होणारी पोटनिवडणूक ही बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा असते. सहानुभूतीची लाट लक्षात घेऊन विरोधक अनेकदा निवडणूक लढविणे टाळतात. मात्र बारामतीत असे घडले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे महाविकास आघाडीतील अंतर्गत विसंवाद. एकीकडे महाविकास आघाडीचे जन्मदाते असलेले शरद पवार आणि उद्धव ठाकरे वेगळी भूमिका घेतात, तर दुसरीकडे काँग्रेस वेगळ्या दिशेने धावते. याचा अर्थ अतिशय स्पष्ट आहे आणि तो असा की, येणाऱ्या काळात हे तिन्ही पक्ष एकमेकांसोबत नसतील किंवा असलेच तर ते केवळ सत्तेचे गणित जुळवण्यासाठी असतील.

काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवार देत महाविकास आघाडीत वेगळी चूल मांडली. बारामतीत उमेदवार उभा करण्यामागे काँग्रेसची अनेक राजकीय गणिते असू शकतात. पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व टिकवणे, स्थानिक नेतृत्वाला संधी देणे किंवा आगामी निवडणुकांसाठी संघटन मजबूत करणे यातले काहीही असू शकते. मात्र, बारामतीत सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेसने उमेदवार दिल्यामुळे महाविकास आघाडीतील समन्वयाचा अभाव अधोरेखित झाला आहे हे मात्र खरे. खऱ्या अर्थाने एकसंध महाविकास आघाडी अस्तित्वात असती, तर असा निर्णय एकमताने घेतला गेला असता. काँग्रेसचाच उमेदवार द्यायचा असे ठरले असते तर आघाडीतील अन्य घटक पक्षांनी त्याला पाठिंबा दिला असता. काँग्रेसच्या निर्णयाला रोखण्यात किंवा समन्वय साधण्यात या दोन्ही घटक पक्षांना म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि उद्धव सेनेला अपयश आले. त्यामुळे 'महाविकास आघाडी' ही केवळ नावापुरती राहिली आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे.

बारामती पोटनिवडणुकीत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी सुनेत्रा पवारांविरुद्ध उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला. या मुद्यावर महाविकास आघाडी एकसंध राहील, अशी अपेक्षा होती. कारण परंपरेनुसार ही जागा राष्ट्रवादीच्या वाट्याची मानली जाते. मात्र काँग्रेसने अचानक उमेदवार देत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. पहिला प्रश्न म्हणजे राष्ट्रवादीने कुठल्याही प्रकारचा संवाद न साधता बारामतीची जागा काँग्रेसला दिली कशी? आणि दुसरा प्रश्न म्हणजे, जर खरोखरच अजित पवारांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या वातावरणात शरद पवारांना ही निवडणूक बिनविरोध करायची होती, तर स्वतःची भूमिका काँग्रेसला समजावून सांगण्यात ते कमी पडले का? यातील तिसरा आणि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, अजित पवारांबद्दल सहानुभूती असताना आणि आघाडीतील घटक पक्ष थेट सोबत नसताना काँग्रेस मैदानात कशासाठी उतरली? या प्रश्नांची उत्तरे येणारा काळ देईल. सध्या मिळालेले उत्तर एवढेच की, महाविकास आघाडीत एकवाक्यता नाही आणि आपसात समन्वय देखील नाही.

बारामती पोटनिवडणूक अजून निकालापर्यंत पोहोचलेली नसली, तरी निवडणुकीआधीच महाविकास आघाडीची 'फजिती' सुरू झाली आहे. यात सर्वाधिक अडचण झाली आहे ती काँग्रेसची. बारामतीत काँग्रेसच्या संघटनाला पूर्वीपासूनच मर्यादा आहेत. त्यात आता महाविकास आघाडीतील घटक पक्ष सोबत नाहीत. त्यामुळे ही निवडणूक काँग्रेसची परीक्षा घेणारी ठरणार आहे. अजित पवारांच्या निधनामुळे सुनेत्रा पवारांबद्दल सहानुभूतीची लाट कायम असताना हा निर्णय घेण्यास काँग्रेसला कोणी बाध्य केले, हाही प्रश्न आहे. राजकारणात कोणत्याही कृतीचा कायम दूरगामी परिणाम होत असतो. तसाच बारामतीच्या या निर्णयाचाही होणार आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला राज्यात चांगल्या जागा मिळाल्या होत्या. मात्र त्यानंतर अशाप्रकारचे विसंवाद वेळोवेळी समोर आल्याने लोकसभेचा प्रभाव त्यांना कायम ठेवता आला नाही. मतदारांचा विश्वास गमावल्यामुळे विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. त्याचे प्रमुख कारण म्हणजे मतदारांना गृहीत धरून आकड्यांची गोळाबेरीज करणे. आजचा मतदार केवळ आघाडी पाहत नाही, तर त्या आघाडीचा हेतू आणि विचारही पाहतो. कोणत्याही राजकीय पक्षाची खरी शिदोरी त्यांचा दीर्घकालीन विचार आणि विश्वास हीच असते. या शिदोरीशीच खेळण्याचे काम महाविकास आघाडीकडून घडले आहे. काँग्रेसने निवडणूक लढवण्यात काहीही गैर नाही; पण महाविकास आघाडी म्हणून राज्यसभेला एकत्र निर्णय घ्यायचे आणि त्यानंतरच्या पोटनिवडणुकीत स्वतंत्र भूमिका घेत मैदानात उतरायचे, हा दुटप्पीपणा आहे. काल-परवापर्यंत शरद पवारांच्या राज्यसभेवर एकत्र बसून निर्णय घेणारा महाविकास आघाडीतील प्रत्येक घटक पक्ष बारामतीच्या पोटनिवडणुकीत स्वतंत्र कसा झाला, याची उत्तरे आघाडीतील तिन्ही घटक पक्षांना येणाऱ्या काळात द्यावी लागतील. घटक पक्षांच्या अशा भूमिकांमुळे महाविकास आघाडीतील कार्यकर्तेही सैरभैर झाले आहेत. कधी सोबत, कधी विभक्त अशा स्वरूपाचे महाविकास आघाडीचे संधिसाधू राजकारण सध्या महाराष्ट्र अनुभवत आहे. बारामतीसारख्या घटना केवळ स्थानिक पातळीपुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या संपूर्ण राज्याच्या राजकीय चित्रावर दूरगामी परिणाम करतात. मतदारांच्या दृष्टीने आघाडीतील पक्षांमध्येच एकमत नसेल, तर त्याबद्दलचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच, जर एकत्र नांदायचे असेल, तर आगामी काळात महाविकास आघाडीसमोरचे सर्वांत मोठे आव्हान म्हणजे राजकीय विश्वास पुन्हा निर्माण करणे हेच असेल. अंतर्गत मतभेद दूर करून एकसंध आणि ठोस वैचारिक भूमिका मांडणे गरजेचे आहे. केवळ सत्तेसाठी एकत्र येणे पुरेसे नसते; तर कार्यकर्त्यांनाही स्पष्ट विचार, दिशा आणि कृती कार्यक्रम देणे आवश्यक असते. कारण राजकारणात कार्यकर्ता आणि मतदार हेच खरे केंद्रबिंदू असतात. यातले काहीही लक्षात न घेता महाविकास आघाडीचा कलगीतुरा रंगलाय्. तो भविष्यात आघाडीला महाग पडू शकतो. आधीच काँग्रेसची स्थिती चांगली नाही. एकूण महाविकास आघाडीतही फार दम नाही. तरीही तिला राजकीय अस्तित्व टिकवायचे असेल, तर केवळ नेत्यांपुरते मर्यादित न राहता तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत स्पष्ट आणि ठोस संदेश पोहोचवणे आवश्यक आहे. आघाडी म्हणजे केवळ तात्पुरते गणित नसते. ती समान उद्दिष्टांसाठीची बांधिलकी आहे, हे कृतीतून दाखवून द्यावे लागेल. अन्यथा, मतदारांना पर्याय शोधण्यास वेळ लागणार नाही. महाविकास आघाडीने या इशाऱ्याचा गांभीर्याने विचार करून परस्परांतील समन्वय वाढवला, तरच ती पुन्हा सक्षम पर्याय म्हणून उभी राहू शकते. विसंवादाची ही मालिका यापुढेही सुरू राहिली तर त्याची राजकीय किंमत महाविकास आघाडीतील सर्वच घटक पक्षांना मोजावी लागू शकते. त्यामुळेच बारामती पोटनिवडणूक ही केवळ एका मतदारसंघाची निवडणूक नसून महाविकास आघाडीच्या भवितव्याची दिशा ठरवणारी निवडणूक ठरणार आहे. ही आघाडी स्वतःला सावरते की अंतर्गत विसंवादामुळे आणखी कमकुवत होते, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

## प्रासंगिक

# मिशन कर्मयोगी

डॉ. जितेंद्र सिंह

राजस्थानमधील एका दुर्गम भागातील एखाद्या अशा जिल्हाधिकाऱ्याची कल्पना करा ज्यांच्याकडे नुकताच एका महत्त्वाकांक्षी कल्याणकारी योजनेचा कार्यभार सोपवण्यात आला आहे, ज्याबद्दल त्यांना फारशी माहिती नाही. सुमारे दशकभरापूर्वी त्यांच्याकडे कदाचित असलेला मर्यादित स्रोत म्हणजे कडा दुमडलेले जीर्ण सरकारी नियमावली पुस्तक, तीन चार बैठका आणि दुपारचे भोजन झाल्यावर कदाचित काही वेळ काढू शकणारे असे एखादे वरिष्ठ सहकारी किंवा एखादा प्रशिक्षण कार्यक्रम वर्ष-दोन वर्षांनी - आणि तोही झालाच तर - उपलब्ध होईल, हे दूरचे आश्वासन. आज ते जिल्हाधिकारी आपला फोन उचलतात, एकीकृत शासकीय ऑनलाईन प्रशिक्षण मंच म्हणजे आय गॉट वर लॉग इन करतात आणि क्षणार्धात त्यांच्या समोर येतो एक संरचित, क्षमता आधारित अभ्यासक्रम जो खास त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे विकसित केला आहे. संध्याकाळपर्यंत माहितीने परिपूर्ण आणि अधिक आत्मविश्वास असलेले हे जिल्हाधिकारी लाभार्थींच्या पहिल्याच सभेचे अध्यक्षपद भूषवतात. हा बदल वरकरणी छोटासा वाटू शकतो, मात्र खऱ्या अर्थाने तो आमूलाग्र आहे.

ही एक शांत क्रांती आहे जिचा आरंभ पाच वर्षांपूर्वी मिशन कर्मयोगीच्या आरंभापासून सुरू झाला आहे- कोणत्याही गाजावाजासह नव्हे तर अत्यंत संयमाने आणि विशिष्ट उद्दिष्टासह नवीन भारताच्या उभारणीसाठी एका नव्या प्रकारच्या लोकसेवकांच्या नवीन जडणघडणीला आकार देणारी क्रांती. याला इतके महत्त्व का आहे हे समजण्यासाठी आपल्याला सर्वप्रथम त्याचा संदर्भ विचारात घेणे आवश्यक आहे. २०४७ मधील भारत - विकसित भारत, आपल्या पंतप्रधानांच्या संकल्पनेतील भारत - हे काही केवळ एखादे ठिकाण नाही जिथे आपण सहजपणे पोहोचू. हे एक असे स्थान आहे जे आपल्याला बांधायचे आहे, प्रजासत्ताकाचा कारभार चालवणाऱ्या संस्था आणि व्यक्तींच्या माध्यमातून- अतिशय काळजीपूर्वक, एकेक वीट रचून ते उभारायचे आहे. आणि या सूत्रातील सर्वांत मोठा घटक हा भांडवल, तंत्रज्ञान किंवा योजना नव्हे, तर ही एक क्षमता आहे - प्रशिक्षित, प्रोत्साहनाने प्रेरित, नागरिक केंद्रित क्षमता असलेले अंदाजे साडेतीन कोटी लोकसेवक जे रोज सकाळी एका ध्येयासह आपल्या दिवसाची सुरुवात करतात आणि भारतीय राज्यव्यवस्थेला कार्यरत ठेवतात, त्यांची क्षमता.

स्वतंत्र भारताच्या इतिहासातील बहुतांश काळात, ती क्षमता उभारण्याचे जे प्रारूप होते त्याला खंडित प्रारूप म्हणता येईल. नव्यानेच नोकरीवर रुजू होणाऱ्या तरुण अधिकाऱ्याला सुरुवातीच्या काळात औपचारिक प्रशिक्षण मिळत असे, कारकीर्दीच्या मध्यावधी कालखंडात एखाददुसरा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी मिळत असे आणि त्या व्यतिरिक्त प्रत्यक्ष काम करता करता आणि इतरांचे निरीक्षण करून त्याने शिकत जावे ही अपेक्षा केली जात असे. एका स्थिर, मंदगतीने प्रवास करणाऱ्या जगात हे एवढे पुरेसे होते. कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान बदल, लोकसांख्यिक ताण आणि वेगाने होत जाणारे तांत्रिक बदल यांच्या या युगात, हे खरोखरच अपुरे आहे. ज्या वेगाने प्रशासकीय आव्हानांमध्ये बदल होत आहेत त्या वेगाच्या तुलनेत जुन्या पद्धतीच्या प्रशिक्षण व्यवस्थांचा प्रतिसाद देण्याचा वेग अगदीच कुचकामी आहे.

या विसंगतीवर उपाय म्हणून मिशन कर्मयोगीची संकल्पना मांडण्यात आली. २०२१ मध्ये सुरू झालेल्या आणि त्याच वर्षी एप्रिलमध्ये स्थापन झालेल्या क्षमता उभारणी आयोगाने संस्थात्मकरीत्या आधार दिलेल्या या उपक्रमाचा उद्देश अत्यंत महत्त्वाकांक्षी होता, तो म्हणजे भारतीय नागरी सेवांच्या अध्ययन संस्कृतीमध्ये विशिष्ट कालमर्यादित पूर्ण करायच्या अनुपालन प्रक्रियेपासून, विकासाच्या निरंतर तसेच भूमिकेवर आधारित आणि स्वयं-प्रेरित प्रवास असा कायापालट घडवून आणण्याचे ते ध्येय होते. आयोगाच्या मते या बदलाचे वर्णन 'कर्मचारी' म्हणजे नियमांचे पालन करणारा एक कार्यकर्ता यापासून 'कर्मयोगी' म्हणजे उद्देश, सेवा आणि उत्कृष्टतेने प्रेरित सार्वजनिक सेवक होण्याकडे जाणारा हा प्रवास आहे, असे केले जाते.

पाच वर्षांनंतर, ही आकडेवारी बोधप्रद आहे. १.५ कोटींहून अधिक शासकीय अधिकारी आता आय गॉट मंचावर सक्रिय शिकणारे म्हणून सहभागी झाले आहेत. ही संख्या सुरुवातीला कल्पनातीत वाटली असती. या अधिकाऱ्यांनी ४,६०० पेक्षा अधिक कौशल्याधारित अभ्यासक्रमांमध्ये, एकूण ८.३ कोटींहून अधिक अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. केवळ गेल्या राष्ट्रीय शिक्षण सप्ताहामध्येच, सहभागामुळे ४५ लाख तासांची अभ्यासक्रम नोंदणी आणि ३८ लाख तासांचे प्रत्यक्ष शिक्षण साध्य झाले. ही केवळ काल्पनिक आकडेवारी नाही. नोंदवला गेलेला प्रत्येक तास हा भारतातील कुठल्यातरी एका लोकसेवकाचे प्रतिनिधित्व करतो. मग तो छत्तीसगडमधील महसूल निरीक्षक असो, पुण्यातील नागरी स्थानिक संस्थेचा अधिकारी असो किंवा मणिपूरमधील आरोग्य कर्मचारी असो आपल्या सहनागरिकांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्यासाठी स्वतःच्या क्षमता विकासात गुंतवणूक करत आहे.

आय गॉट मंचाला खरोखरीच परिवर्तनकारी बनवण्यामध्ये केवळ त्याचा आवाका हा एकच घटक कारणीभूत नाही तर त्याची प्रवेश-रचना ही तितकीच महत्त्वाची आहे. हा कुठेही आणि कधीही उपलब्ध आहे, स्मार्टफोनवर किंवा डेस्कटॉपवर, विविध भाषांमध्ये आणि अध्ययन करणाऱ्याच्या व्यक्तिगत व्यावसायिक प्रोफाईल नुसार. यावरील अभ्यासक्रम दर सहा महिन्यांनी अद्ययावत केले जातात, ज्यामुळे प्रशासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता उपकरणांचा वापर करणे किंवा नवीन आर्थिक नियमांचे पालन कसे करावे यावरील सामग्री अद्ययावत राहील. वेगळ्या शब्दात सांगायचे तर हा मंच म्हणजे धूळ खात पडलेले एक डिजिटल ग्रंथालय नाही - तर ती अध्ययनाची एक जिवंत आणि परिस्थितीशी जुळवून घेणारी गतिशील परिसंस्था आहे. एखाद्या आदिवासीबहुल जिल्ह्यातील कनिष्ठ अंगणवाडी कार्यकर्तीला जिला तिच्या स्वतःच्या भाषेतून बालकांच्या पोषण मूल्यांकनासंबंधीचे अद्ययावत नियम सांगणारे मॉड्यूल मिळाले आहे अशा एखाद्या सेविकेच्या भूमिकेतून याकडे पाहा. तिला आता प्रशिक्षक तिच्या ब्लॉकपर्यंत येण्याची वाट पाहण्याची गरज नाही. ती शिकते आणि ती कृती करते. हाच या मिशनमधून भारताच्या लोकशाहीला दिला जाणारा मोठा लाभ आहे.

क्षमता निर्माण आयोग हा या परिसंस्थेचा धोरणात्मक संरक्षक असून एकाच वेळी वास्तुविशारद आणि सूत्रसंचालक अशी दुहेरी भूमिका बजावतो. राष्ट्रीय कृषी धोरण आखणाऱ्या सचिवांपासून ते ग्राम पातळीवर त्याची अंमलबजावणी करणाऱ्या पंचायतींमधील कर्मचाऱ्यापर्यंत सार्वजनिक भूमिकांच्या विशाल पटलावर कोणत्या क्षमतांची आवश्यकता आहे, हे निश्चित करते. हा आयोग एनएससीएसटीआय २.० अर्थात राष्ट्रीय सेवा प्रशिक्षण संस्था आराखड्याच्या माध्यमातून देशातील प्रशिक्षण संस्थांसाठी गुणवत्ता मानके निश्चित करतो. याअंतर्गत देशभरातील २०० हून अधिक प्रशिक्षण संस्थांना यापूर्वीच अधिमान्यता देण्यात आली आहे. हे राज्यांसोबत काम करते. आता सर्व ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी औपचारिक सामंजस्य करारांद्वारे यात सहभाग घेतला आहे.

प्रशासकीय विचारसरणीला वसाहतवादी विचारांमधून मुक्ती देऊन भारतीय लोकसेवकांना आधुनिक आव्हानांचा सामना करत असतानाच आधुनिक प्रशासकीय कौशल्यांचा भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाशी पुन्हा एकदा आत्मविश्वासाने मेळ घालण्यास प्रोत्साहित केले जात आहे, ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख महत्त्वाकांक्षांपैकी एक आहे; आणि मिशन कर्मयोगीच्या माध्यमातून हीच संकल्पना प्रत्यक्षात आणली जात आहे.

**साधना सप्ताह** : देशात २ ते ८ एप्रिल दरम्यान राष्ट्रीय अध्ययन सप्ताह साजरा केला जात असून तो या प्रवासाच्या पंचवर्षपूर्तीचा उत्सव आणि अपूर्ण कामाविषयीच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. साधना हा शब्द अतिशय समर्पक आहे. याचा अर्थ होतो - समर्पित सराव, केवळ एखाद्या अलौकिक कृतीद्वारे नव्हे, तर आपल्या कलेप्रति दाखवलेल्या सातत्यपूर्ण निष्ठेद्वारे नैपुण्य प्राप्त करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने केलेले शिस्तबद्ध आणि दैनंदिन प्रयत्न.

**विकसित भारत २०४७ चे उद्दिष्ट** : सार्वत्रिक आरोग्य संरक्षणापासून ते निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनापर्यंत, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपासून ते उत्पादकतेतील जागतिक नेतृत्वापर्यंत केवळ धोरणांच्या माध्यमातून पूर्ण करता येणार नाही. ते उद्दिष्ट लोकांच्या सहभागातून, अत्यंत अचूकपणे योजना राबवण्याची जाण असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून, अशा नगर नियोजकाकडून, जो स्थानिक माहिती साधने प्रभावीपणे वापरू शकतो; आणि अशा आघाडीवरील आरोग्य सेविकेकडून, जी सार्वजनिक आरोग्याशी संबंधित सूचना आपल्या समुदायापर्यंत अशा पद्धतीने पोहोचवते, ज्यावर त्या समुदायाचा पूर्ण विश्वास असतो.

(लेखक केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच भूविज्ञान (स्वतंत्र प्रभार); पंतप्रधान कार्यालय, अणुऊर्जा विभाग, अंतराळ विभाग आणि कार्मिक, सार्वजनिक तक्रार निवारण आणि निवृत्तिवेतन मंत्रालय यांचे राज्यमंत्री आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# निर्जनस्थळाचा एकांत प्रेमीयुगुलांसाठी धोका

एकांतवास मिळावा म्हणून प्रेमीयुगुलांचे निर्जनस्थळी फिरण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. काहीवेळा त्यांचे फिरणे अगदी सहजतेने होते तर बहुतांशवेळा त्यात अडचणी येतात. त्यातली काही प्रकरणे सहज निकाली निघतात तर काही जीवावर बेतणारी किंवा आयुष्याच्या वाटचालीला गालबोट लावणारी ठरतात. राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात असे प्रकार राजरोसपणे सुरू आहेत. राज्यभरात होणाऱ्या एकूण घटनांपैकी अंगावर बेतणाऱ्या गंभीर घटनांचीच बातमी फक्त होते म्हणून ते चव्हाट्यावर येतात. उर्वरित ९५ टक्के घटना तर बदनामीच्या भीतिपोटी समोरच येत नाही. दोन सज्ञान व्यक्ती परस्पर संमतीने एकत्र जाऊ-येऊ शकतात. बसून बोलूसुद्धा शकतात. यात सांगायचा मुद्दा इतकाच की, अनेक युगुलांना सुरक्षित व असुरक्षित ठिकाण कोणते, हेच समजत नाही. शहराला लागून असलेले जंगल क्षेत्र, छोट्या टेकड्या, तलाव हेच त्यांना एकांतवासाची चांगली ठिकाणे वाटतात. पण, दुसऱ्या बाजूने लूटमार, चोऱ्याचपाट्या आणि अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांची पण ठिकाणे हीच असतात. हे भामटे कायम शिकार शोधत असतात. आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी उपरोक्त ठिकाणी जाणारे युगुल त्यांच्या जाळ्यात सहज अडकतात. त्यांच्या मागण्या अमर्याद असतात आणि यांना बदनामीची भीती असल्याने ते पूर्ततेला तयार होतात.

अमरावती शहराला लागून असलेल्या भानखेडा जंगल परिसरात अशीच एक घटना नुकतीच रात्रीच्यावेळी घडली. अतिशय संतापजनक ही घटना असून प्रेमात आंधळे झालेले युगुल किती बिनधास्त असते याचे ते उदाहरण आहे. ज्या भानखेडा जंगल भागात हे युगुल गेले होते, तो भाग कायम निर्जन असतो आणि युगुलांसाठी तर फारच धोकादायक आहे. त्यातही रात्रीची वेळ असेल तर सांगायचीच गरज नाही. येथे वन्यप्राण्यांचाही वावर असतो. इतकी भयानक स्थिती असताना युगुलांनी तेथे रात्रीच काय दिवसा तरी जावे का? याचे उत्तर नाही असेच आहे. प्रेम आंधळे असले तरी ते कुठेही जाऊन व्यक्त करायचे नसते आणि केले तर काय होते, हे अमरावतचीच्या घटनेतून स्पष्ट झाले आहे. यातले युगुल जेमतेम सज्ञान झाले. पण, ते हिंमतबाज आहे ही जमेची बाजू ठरली. इतका कठीण प्रसंग त्यांच्यावर ओढवल्यानंतर ते खंबीरपणे कुटुंबीयांपर्यंत पोहोचले. पुढे दवाखाना आणि पोलिसांकडे गेले. त्यामुळे पुढच्या आवश्यक त्या सर्व प्रक्रिया तातडीने करणे दोन्ही यंत्रणांना लगेच शक्य झाले. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून रात्रीचा दिवस करत घटनेत सहभागी पाचही आरोपींना अटक केली. कायद्यातल्या तरतुदीनुसार आरोपींची ओळख परेड झाली आहे. पीडितेने न्यायाधीशांसमोर आरोपींना ओळखले आहे. तपास पूर्ण करून हे प्रकरण जलदगती न्यायालयात ठेवण्याचा पोलिसांचा प्रयत्न आहे. आरोपींना लवकरच कठोरातील कठोर शिक्षा होईल, असा विश्वास व्यक्त करणाऱ्या पोलिसांचे अभिनंदन!

सामूहिक अत्याचाराच्या अशा घटना कोणत्याही शहरासाठी भूषणावह नाहीत. आपले शहर म्हणा किंवा जिल्हा कायम सुरक्षित राहावा, याची जबाबदारी पोलिसांचीच आहे. पण, कुठे जावे आणि कुठे जाऊ नये हे जाणाऱ्यांनी विचारपूर्वक ठरविणे सुद्धा अत्यावश्यक आहे. अमरावतीच्या घटनेतले आरोपी पोलिसांनी ज्या खबरी नेटवर्कमधून ताब्यात घेतले, ते नेटवर्क जर कायमस्वरूपी वापरले तर कोणत्या भागात काय सुरू आहे आणि कुठे सामान्य माणसांना धोका आहे, हे वेळीच लक्षात येऊ शकते. पण, आपल्याकडे घटना घडल्यावरच हातपाय हलविण्याची सवय आहे. ती फक्त पोलिसांनाच नाही. सर्वच विभागात हीच स्थिती आहे. प्रत्येकच घटनेचा दोष शासकीय यंत्रणेवर टाकून जमणार नाही. समाजाची आणि त्यात वावरणाऱ्या व्यक्तींचीपण सर्तकता मोलाची असते. शहाण्या व्यक्तींनी एकमेकांच्या प्रेमात पडणे वाईट नाही आणि त्याला बंधन सुद्धा नाही. फक्त हे प्रेम समजूतदारपणे करणे आणि व्यक्त होणे महत्त्वाचे आहे. हौस म्हणून ते करण्यासारखे अजिबातच नाही. चूक येथेच होते आणि भलत्याच ठिकाणी जाऊन व्यक्त झाल्यावर संकट कोसळते. ज्यांच्यावर असे कठीण प्रसंग ओढवले आहेत, त्यांना त्या दाहकतेची कल्पना आहे. जे युगुल अशा चक्रव्यूहात अडकले असेल त्यांनी वेळीच सावध होणे गरजेचे आहे. अमरावतीच्या घटनेतून त्यांनी बोध घ्यावा. आयुष्याच्या वाटेवर निर्णय घेताना चांगल्या व वाईट परिणामांची मीमांसा पहिले करावी. करता येत नसेल तर जवळच्या जाणकार व्यक्तींचा सल्ला घ्यावा. शंभरदा विचार करून कृती करावी आणि धोके टाळावे, हीच अपेक्षा!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# तेरा अक्षरी श्रीराम मंत्राचे रहस्य!

प्रा. दिलीप जोशी

'श्रीराम जयराम जय जय राम' हा तेरा अक्षरी श्रीराम मंत्र आहे. या मंत्राचा जप सर्वत्र होत असतो. हा तारक मंत्र असून या मंत्राच्या प्रभावाने भवसागर सहज पार करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी येते, हा आपला दृढ विश्वास आहे. श्रीराम मंत्र साक्षात भगवान सदाशिव महादेव सदैव स्मरतात. हरिपाठात 'आत्मा जो शिवाचा रामजप' हे स्पष्ट सांगितले आहे. याशिवाय 'पुराण प्रसिद्ध बोलिले वाल्मीकि, नामे तिन्ही लोकं उद्धरती' हे माउलींनी सांगून रामनामाचा महिमा विशद केला आहे.


श्रीराम हा मंत्र म्हणजे अग्निबीज आहे. त्याच्या आर्त उच्चाराने शरीर तप्त होते. याची प्रचीती एकदा घेऊन पाहिली पाहिजे. एका अर्थाने रामनामाने नैसर्गिक तप होतो. हा तेरा अक्षरी मंत्र मराठीत आहे आणि तो अलिकडच्या कोणी सिद्ध पुरुषाने आपल्या सर्वांना दिला, असा अनेकांचा गैरसमज आहे. या तेरा अक्षरी मंत्राचे रहस्योद्‌घाटन आज आपण करण्याचा प्रयत्न करू.

विविध उपनिषदांमध्ये 'श्रीरामरहस्योपनिषद' नावाचे उपनिषद आहे. या उपनिषदात कथा आलेली आहे. एकदा मुद्‌गल ऋषी, शांडिल्य ऋषी, पिंगल ऋषी, सनक, सनंदन, सनातन आणि सनतकुमार एकत्रित चर्चा करीत असताना तारक ब्रह्म कोण आणि तारक मंत्र कोणता यावर संवाद सुरू झाला. त्याचे खरे उत्तर कोणाकडून मिळेल, अशी मंत्रणा सुरू झाली. या प्रश्नाचे उत्तर 'बुद्धिमतां वरिष्ठम्' असलेले भगवान हनुमंतराय देतील म्हणून ही सर्व मंडळी मारुतीरायाकडे आली. तेव्हा मारुतीरायांनी त्यांना त्वरित सांगितले की, तारक ब्रह्म म्हणजे भगवान श्रीराम.

**'एतेषु चैव सर्वेषु तत्त्वं च ब्रह्म तारकम् ।**
**राम एव परं ब्रह्म तत्त्वं श्रीरामो ब्रह्म तारकम् ॥'**

या ऋषींनी हनुमंतरायांना तारक मंत्राबाबत विचारले तेव्हा मारुतीरायांनी त्यांना विविध असे श्रीराम मंत्र सांगितले. त्यात त्यांनी एकाक्षर राममंत्र, दोन अक्षरी, तीन अक्षरी असे एकूण जवळ जवळ सत्तेचाळीस अक्षरी म्हणजे एकूण सत्तेचाळीस श्रीराम मंत्र सांगितले. सर्वसामान्यांसाठी तारक मंत्र म्हणून तेरा अक्षरी 'श्रीराम जयराम जय जय राम' हा मंत्र त्यांनी सांगितला. श्रीराम रहस्य उपनिषदात या मंत्राचा श्लोक आहे.

**'श्रीरामेति पदं चोक्त्वा, जय राम ततः परम् ।**
**जय द्वयं वदेत् प्राज्ञो, रामेति मन्त्रराजकः ॥'**



भगवान हनुमंतरायांनी हा मंत्र संस्कृत श्लोकातून विशद केला. पहिल्यांदा श्रीरामेती पदं म्हणजे श्रीराम जय राम ततः म्हणजे त्यानंतर जयराम येईल. पुढे जय द्वयं म्हणजे जय जय म्हणावे. त्यानंतर रामेती म्हणजे शेवटी राम असे सांगितले. म्हणजे 'श्रीराम जयराम जय जय राम' हा तेरा अक्षरी मंत्र तयार होतो. यावरून लक्षात येईल की, तेरा अक्षरी मंत्र प्रत्यक्ष हनुमंतरायांनी सनतकुमारादी ऋषिमुनींना सांगितला. हा मंत्र श्रीरामरहस्योपनिषदात आहे.

या उपनिषदातच हनुमंतरायांनी विविध अक्षरी मंत्रांचे विधान सनकादी ऋषींना सांगितले. त्यात तेरा अक्षरी हा सर्वाभिष्ट मंत्र असून या मंत्र जपात मंत्र, तंत्र आणि यंत्र यांचेही विश्लेषण आहे. या मंत्राचे पुरश्चरण विधानही उद्धृत केले आहे. मारुतीराय स्पष्ट करतात की, 'र' हे अक्षर निरंजन ब्रह्म आहे तर 'आ' हे मायातत्त्व तर त्यापासून बनलेले 'रा' हे प्राणतत्त्व तर 'म' हे उन्नती दर्शक आहे. राम हे निरंजन ब्रह्म जीवाची उन्नती म्हणजे मानवाचा माधव करणारे सिद्ध तत्त्व आहे. वेदाचे महावाक्य 'तत्त्वमसि' यातील 'रा' हे तत्पद, 'म' हे त्वं पद तर 'राम' हे असीपद असल्याचेही हनुमंतराय स्पष्ट करतात. असा हा सिद्ध आणि तारक मंत्र असून याचे प्रकट कर्ते ऋषी मारुतीराय आहे.

पुढे हा मंत्र श्रीरामसंप्रदायात प्रचलित झाला. श्रीरामानुजाचार्य परंपरा, रामानंदी परंपरा, समर्थ रामदासी परंपरा, सद्‌गुरू गोंदवलेकर, सद्‌गुरू प्रल्हाद महाराज यांनी या मंत्राला विशेष महत्त्व प्राप्त करून दिले. उपासनेत या मंत्राची प्रचीती सर्वांना येत गेली आणि हा मंत्र सिद्ध, अतिसिद्ध, परमसिद्ध झाला. हा मंत्र प्रचंड प्रभावी आहे. तेरा अक्षरी मंत्र जपाने-

१) कलिकाळ त्यासी न पाहे दृष्टी
२) पळे भूतबाधा येणे तेथे
३) म्हणती जे वाचा तया मोक्ष
४) पापाचे कळप पळती पुढे
५) अनंत पाप राशी, जातील लयाशी
६) पापे अनंत कोटी गेली त्याची
७) जळतील पापे जन्मांतरीची
८) पवित्रची होय देह त्याचा

-अशी संतांची अनेक प्रमाणे आहेत; ज्यातून रामनाम माहात्म्य स्पष्ट होते. म्हणून श्रीराम नाम जप रोज केला पाहिजे. 'श्रीराम जयराम जय जय राम' हा जीवनाचे कल्याण करणारा, भवसागर पार करून ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा मार्ग सोपान आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### महंत मधुसूदन भारती यांचे प्रायोपवेशन

महंत मधुसूदन भारती यांचे श्री दत्तशिखर माहूर येथे चार तप वास्तव्य होते. ते एक तप पूर्ण झाल्यानंतर मंदिराची परिक्रमा करायला बाहेर निघायचे व त्याचवेळेस भक्तांना दर्शन द्यायचे. मंदिरात त्यांची एक खोली होती त्यात ते तप करायचे. आम्ही दरवर्षी माहूरला जातो. एकदा आठ दहा वर्षांपूर्वी आम्ही गेलो तेव्हा ते त्यांच्या खोलीतून बाहेर परिक्रमा करायला निघाले होते. त्यांचे ते कठोर तप करून तेजस्वी झालेले रूप पाहून डोळे दिपून गेले. क्षणभर डोळ्यासमोर श्रीगुरुदत्ताची मूर्तीच उभी आहे की काय, असे वाटले. नकळत डोळे मिटून नतमस्तक झालो. त्यांनी आम्हाला आशीर्वाद दिला व भस्म दिले. आमचे नशीब चांगले होते की आम्हाला त्यांचा आशीर्वाद मिळाला. नुकतीच ते वैकुंठवासी झाल्याची बात मी वाचली तेव्हा डोळ्यात पाणी आले. स्वर्गात श्रीगुरुदत्त चरणी त्यांना स्थान मिळाले. भक्तिपूर्वक त्यांच्या चरणी नमन.

**राजेंद्र वाडी**/९४२३६३२२३०

### तक्रार करण्याची गरज काय?

प्रवाशांची अडवणूक थांबणार कधी? ही बातमी वाचली (तरुण भारत, पुणे) त्यात उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी अडवणूक झालेल्या प्रवाशांना तक्रारी करण्याचे आवाहन केले आहे. हे वाचून हसावे की रडावे तेच कळत नाही. या प्रश्नाला तरुण भारतने वाचा फोडल्याबद्दल अभिनंदन. यासंबंधी पूर्वीही अनेक वर्तमानपत्रांतून बातम्या आलेल्या आहेत, वाचकांच्या प्रतिक्रियाही आलेल्या आहेत. मी स्वतः सुद्धा या अनुभवातून गेलो आहे आणि विविध वर्तमानपत्रांत लिहिलेही आहे. हे प्रकार जवळपास गेले वर्षभर तरी सुरू आहेत. दहापैकी नऊ टॅक्सीवाले प्रवाशांची अशी लूटमार करत आहेत. तरीही प्रादेशिक परिवहन विभाग या संघटित लुटमारीबाबत अनभिज्ञ असावा हे आश्चर्यकारक आहे.

पूर्वीच्या काळात राजे महाराजे वेषांतर करून समाजात चाललेल्या गैरप्रकारांचा छडा लावत असत आणि त्यावर त्वरित आणि उचित कारवाई करून उपाययोजनाही करत असत. असे करणे परिवहन विभागाला अशक्य आहे का? सध्याच्या काळात एवढी जागरूक प्रसारमाध्यमे आणि मुबलक, अद्ययावत यंत्रणा असूनही सरकारी विभाग कारवाई करण्यासाठी तक्रारींची वाट बघत असतील तर प्रवाशांनी काय करावे? लोक आपापली कामे सोडून तक्रारी करत आणि खेट्या मारत बसतील का?

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### भारत-नेपाळ संबंध सुधारतील?

रामनवमीच्या मुहूर्तावर बालेंद्र शहा यांनी नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. बालेंद्र शहा यांनी नेपाळची सूत्रे हाती घेतल्यामुळे भारत आणि नेपाळ यांच्यातील संबंध पूर्वीप्रमाणे सौहार्दाचे होतील अशी आशा निर्माण झाली आहे कारण पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून त्यांनी भाराताविरुद्ध एकही वक्तव्य केले नाही. अर्थात काठमांडूचे महापौर असताना त्यांनी भारतविरोधी भूमिका घेत ग्रेटर नेपाळचे समर्थन करत भारताला दुखावले होते. आता मात्र त्यांची ती भूमिका बदलेल अशी आशा करायला हरकत नाही, कारण बालेंद्र शहा पंतप्रधान बनल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत दोन्ही देशांत मैत्रीचे संबंध निर्माण होतील अशी ग्वाही दिली. अर्थात त्यांच्याकडून तशी अपेक्षा करायला हरकत नाही. कारण बालेंद्र शहा आणि आपले खूप जवळचे संबंध आहेत. बालेंद्र शहा यांचे शिक्षण भारतातच झाले आहे. त्यांनी बंगळुरूच्या विश्वेशरय्या विद्यापीठातून स्ट्रक्चरल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतले आहे. त्यांची एक बहीण बंगळुरूमध्येच राहते. त्यामुळे भारताबाबत त्यांच्या मनात निश्चितच आदर असेल. अर्थात त्यांच्या मनात चीनबद्दल असलेले आकर्षण लपून राहिलेले नाही. असे असले तरी पंतप्रधान म्हणून ते चीनच्या मागे लागणार नाहीत अशी आशा करूया.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### लखनौमध्ये नोकरीसाठी तरुणांच्या रांगा

वरील आशयाची बातमी वाचून फारच आनंद झाला. कारण लखनौमधील अलिगंज या आयटीआय परिक्षेत्रात रोजगार मेळावा भरला होता. तेथे हजारो तरुणांच्या रांगा लागल्या होत्या. विशेष आनंद याचा वाटला की उत्तरप्रदेशमध्ये जर असे रोजगार मेळावे लागले आणि तेथे जर नोकऱ्या मिळाल्या तर तेथील तरुणांचे मुंबईला येणे थांबेल. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी रोजगार देऊन तरुणांना तेथेच थांबवले तर त्यांना मुंबईमध्ये येण्याची गरज भासणार नाही. असेच प्रकार सर्व राज्यांत घडले तर बिहार, पश्चिम बंगाल, ओडिशामधून मुंबईमध्ये येणारे तरुणांचे लोंढे थांबतील. नाहीतर मुंबईला आल्यावर कुठेही रस्त्यावर भाजीचा ठेला किंवा रस्त्यावरचे अनेक उद्योग करायला हे मोकळे असतात. म्हणूनच आज लखनौमध्ये जे घडत आहे तसं जर सर्व राज्यांमध्ये घडले तिथला तरुण मुंबईमध्ये कशाला येईल?

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

# अखिल भारतीय सफाई मजदूर युनियनच्यावतीने धरणे आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

अखिल भारतीय सफाई मजदूर युनियन, सोलापूर शहर व जिल्हा शाखेच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी पुनम गेट, जिल्हा परिषद चौक येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रीय अध्यक्ष चरणसिंह टाक यांच्या आदेशानुसार राज्यभर हे आंदोलन राबविण्यात आले. प्रारंभी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. कामगारांनी विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडत मागण्यांकडे लक्ष वेधले.

या आंदोलनात बाली मंडेपु, अशोक इंदापूरे, शंतुनू गायकवाड, शशीकांत सिरसट, दशरथ अडाकुल, अरुण स्वाके, श्रीनिवास रामगल, व्यंकटेश देवनलू, श्रीनिवास मंदोलू, तिरुपती बोनसे, अशिष धुंबड, अमित सौदे, शाहरुख शेख, कन्हैया लालबेगी, सुभाष स्वाके, बाळु केशपागा, तुकाराम पेदोलू, नारायण अडाकुल, नर्सय्या चीनाकारम, नागेद्रम बेरकोलू, पांडुरंग रातोलू, सिद्राम भंडारी, कुर्मय्या मंदोलू, नागराज रातोलू, देविदास कोमोलू, कुमार सांगे, अमजद शेख, श्याम चव्हाण, महेश परमार, राजू कावल, कृष्णा केशपागा सहभागी झाले.

खाजगीकरण बंद करा, ठेकेदार कर्मचाऱ्यांचे कायम स्वरूपीकरण, मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग बंद, वेतन आयोग लागू करणे, जुनी पेन्शन योजना, घरकुल व मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना मदत यांचा समावेश आहे. आंदोलनानंतर उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

# ज्ञानाचा उपयोग कौशल्य विकासासाठी करावा : प्रा. गंभीर

## ए.जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग येणाऱ्या काळासाठी लागणारे तंत्र कौशल्य विकासासाठी करावा आणि नवे कौशल्य सतत शिकत रहावे, असे प्रतिपादन प्रसिद्ध वैज्ञानिक प्रा. व्यंकटेश गंभीर यांनी केले.

ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा भरारी-२०२६ नुकताच पार पडला. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रसिद्ध वैज्ञानिक प्रा. व्यंकटेश गंभीर व संस्थेचे सचिव शिवानंद पाटील यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमधील शैक्षणिक, सांस्कृतिक व विविध खेळांच्या स्पर्धेमध्ये बक्षीसे मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रा. व्यंकटेश गंभीर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील प्रत्येक विभागातील उत्कृष्ट विद्यार्थी, उत्कृष्ट विभाग व कर्मचारी/शिक्षक हे पुरस्कार देण्यात आले. हिवाळी परीक्षेत विविध विषयात ७० पैकी ७० गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य व्ही. व्ही. पोतदार, उपप्राचार्य प्रा. एस. के. मोहिते व कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. राकेश मोटगी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा एल. एस. बिराजदार व बक्षीस वाचन प्रा एन बी पवार, प्रा. एस. एन. गवंडी व प्रा. मरेड्डी यांनी केले. प्रा. राकेश मोटगी यांनी आभार मानले.

### पुरस्कारांचे मानकरी

उत्कृष्ट विभाग पुरस्कार : सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग. उत्कृष्ट विद्यार्थी (विभाग) : पियुष मंडोळीकर (कॉम्प्युटर इंजिनिअरिंग), सृष्टी धाबे (सिव्हिल इंजिनिअरिंग), सलमान शेख (इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग), सत्येन्द्र कुमार ठाकूर (मेकॅनिकल इंजिनिअरिंग), सई ब्याळे (इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रॉनिकशन इंजिनिअरिंग), उत्कृष्ट शिक्षक : प्राध्यापक राकेश मोटगी (विभाग प्रमुख मेकॅनिकल इंजिनिअरिंग), शिक्षकेतर कर्मचारी : रुपेश कोकरे.



सोलापूर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने येथील राजमुद्रा सामाजिक संस्थेच्या वतीने ढोल पथकातील कलाकार ढोल वादनाचा सराव करतानाचे छायाचित्र.

## जाहीर समन्स

रे.मु.नं. ५६८/२०१९
नि. ५५

### सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

**सिध्दप्पा मरेप्पा पांगळे (मयत)** - **वादी**
**१अ) लक्ष्मीबाई बसवराज बिराजदार वगैरे ३**
विरूध्द
**आप्पासाहेब रेवण पाटील वगैरे ७** - **प्रतिवादी**

यातील अर्जदार यांनी जाहीरीकरणाचा व निरंतर ताकीदीचा व तदानुषंगिक बाबी मिळणेकरिता दावा दाखल केलेल आहे.

मिळक्तीचे वर्णन : जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी जिल्हा परिषद हद्दीतील येळेगाव ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमिन यास गट नं. ७५/अ यासी क्षेत्र १ हे. ६२ आर. व तसेच पोटखराब ० हेक्टर ०१ आर म्हणजेच एकूण क्षेत्र १ हेक्टर ६३ आर यासी आकार रक्कम रू १ रूपये १५ पैसे अशी शेतजमिन यासी चतुःसिमा :- पूर्व - गट नं. ७४, दक्षिण - मंद्रुप शिव रस्ता, पश्चिमेस - गट नं. ७६, उत्तरेस - गट नं. ७३ येणेप्रमाणे वर्णनातील जिरायत शेतजमिन.

ज्याअर्थी सामनेवाला नं. ४ व ६

**१) आनंद पिता रविंद्र तिवारी**
रा. ब-७, सप्तगिरी सोसायटी, होटगी रोड, सोलापूर

**२) हरिष पिता महाबल शेट्टी**
रा. ७, नवोदय टेरेस, होटगी रोड, सोलापूर

यांना कोर्टानी समन्स/नोटीस पाठविले असता सदर सामनेवाला नं. ४ व ६ हे दिलेल्या पत्यावर मिळून येत नसल्याने सदरहू नोटीस /समन्स बेलिफामार्फत परत आलेले आहे. त्यामुळे समन्स/नोटीसची बजावणी झाली नाही. म्हणून सदर अजर्जाचे कामी मे. कोर्टानी जाहीर समन्सचे हुकूम केलेला आहे.

त्या अर्थी वर नमूद अर्जात वर नमूद सामनेवाला नं. ४ व ६ यांनी सदर अर्जाचे कामी आपले म्हणणे मांडण्याकामी सामनेवाला नं. ४ व ६ हे स्वतः अथवा वकिलामार्फत दि. ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. कोर्टात खाली नमूद पत्यावर हजर रहावे.

हे सदर जाहीर समन्स/नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, वर नमूद सामनेवाला नं. ४ व ६ हे मे. कोर्टात हजर राहिले नाहीत तर त्यांचे गैरहजेरीत दाव्याची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

हे जाहीर समन्स दिले. ता.३०/०३/२०२६

**सही/-**
**लिपिक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दि. न्या. व. स्तर सोलापूर**




## अल्पवयीन मुलीचा विवाह करुन आत्महत्येस प्रवृत्त; पाच जणाविरुध्द गुन्हा

**मंगळवेढा दि.७ एप्रिल २६**

एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह करुन तिचा शारिरीक,मानसिक छळ केला तसेच तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी जोतीबा मारुती कुटे,संगीता जोतीबा कुटे,अर्जुन विठोबा ढगे,शितल अर्जुन ढगे,पती ज्ञानेश्वर जोतीबा कुटे (सर्व रा.निंबोणी) या पाच जणाविरुध्द पोलीस गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीस ही वयाने लहान असल्याचे माहित असताना सुध्दा वरील आरोपींनी लग्न करुन तिचा पती ज्ञानेश्वर जोतीबा कुटे (वय १९) याने जबरदस्तीने तिच्या अल्पवयीन पत्नीशी शारिरीक संबंध केले. तसेच घरातील कामे करण्याच्या कारणावरुन घालून पाडून बोलून तिला मारहाण करुन मानसिक त्रास देवून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## दिलीप कामेगांवकर यांचे निधन

**अकलूज, दि. ७ एप्रिल-**

अकलूज येथील पांचाळ सोनार समाज संघटनेचे जेष्ठ सदस्य दिलीप दगडू कामेगांवकर (वय ७०) यांचे अल्प आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन भाऊ व एक विवाहीत बहिण असा परिवार आहे.

## सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सह. घाऊक व किरकोळ ग्राहक भांडार नि., सोलापूर

**९ब, सुपर मार्केट, मुरारजी पेठ, सोलापूर फोन नंबर - (०२१७)३५५३०२८**

**विशेष सर्वसाधारण सभा**

**(फक्त सभासदाकरिता)**

संस्थेच्या सभासदांना कळविण्यात येते कि, खालील विषयाकरिता संस्थेच्या **सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा गुरुवार १६/०४/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता** संस्थेच्या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे असलेली एन.आर.डी. खात्यातील रक्कम संस्थेच्या दैनंदिन व्यवहारासाठी गुंतवणूक करणेबाबत.

**स्थळ : सोलापूर**
**दि. ०८/०४/२०२६**

**सिध्दाराम आ. जोडभावी**
चेअरमन

**टीप** : गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही.

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी नगरपरिषद हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या खरेदीपुर्व नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) मिळकतींचे वर्णन डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर नगरपरिषद हद्दीतील मिळकती **अ)** सि.स.नं. ४२२१/१ याचे एकूण क्षेत्रफळ ८२.८० चौ.मी., **ब)** सि.स.नं. ४२२१/२ याचे एकूण क्षेत्रफळ ४६.६० चौ.मी. व **क)** सि.स.नं. ४२२१/३ याचे ६१.०० चौ.मी. या तिन्ही मिळकती एकमेकांस लगत असून, याचे एकत्रीत क्षेत्रफळ १९०.४० चौ.मी. आहे, याचे एकत्रीत मोजमापे पूर्व बाजू - फुट ११०.६ इंच, दक्षिण बाजू फुट १८.०० इंच, पश्चिम बाजु- फुट ११०.०० इंच, व उत्तर बाजु-फुट १८.७ इंच. यांसी एकत्रीत चतुःसिमा :- पूर्वेस - सि.स.नं. ४२२२ व यातून सोडलेला सामाईक रस्ता, दक्षिणेस - सि.स.नं. ४२२३ व त्यातील वागणुकीचा रस्ता, पश्चिमेस - सि.स.नं. ४२२० व उत्तरेस - नगरपालिकेचा रस्ता, याची वागणुक व पाणी उत्तर बाजूचे नगरपालिकेचे रस्त्यास व सि.स.नं. ४२२२ या जागेतून सोडलेले फुट १८.७ इंच पुर्व-पश्चिम लांबीचे व रुंदी दक्षिणोत्तर फुट ३.६ इंच रुंदीचे सामाईक बोळाने पुर्वेकडील रस्त्यास जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची मिळकत, आतील सर्व बांधकाम, वगैरे तदंगभूत वस्तुंसह, वहिवाटीचे हक्कासह.

२) वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकती या श्री. गणेश बबन नान्नजकर, श्रीमती संगीता भागवत क्षिरसागर, श्री. जगदिश भागवत क्षिरसागर व श्री. भैरवनाथ सावता शिंदे, सर्व रा. बार्शी, जि. सोलापूर यांच्या खरेदी मालकीची असून, मिळकतीचे हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. वर नमुद मिळकती या मिळकत मालकांनी दि. ०१/१२/२०२३ रोजी शाहजहान अ. सत्तार चौधरी व इतर ११ यांचेकडून नोंदणीकृत खरेदी दस्त क्र. बरस ७४०९/२०२३ अन्वये खरेदी केलेल्या आहेत. वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकती मिळकत मालकांनी योग्य त्या बाजारभाव किंमतीने आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरवून तसा वर नमुद मिळकती विक्रीबाबत उभयतांमध्ये तोंडी करार ठरलेला असून, आमचे अशिलांनी मिळकत मालकांना इसारा दाखल रक्कम दिलेली आहे. सदर मिळकती या स्वतंत्र मालकी हक्काच्या व कब्जे वहिवाटीच्या, निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलांचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद सर्व मिळकतींवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतींवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहेत, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलांचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. ०८/०४/२०२६

सही/-
**ॲड. श्री. आकाश सुनिल तावडे**
बी.ए., एलएल.बी., एलएल.एम.
न्यायालयाच्या समोर, कचेरी रोड,
खेडकर बिल्डींग, बार्शी, जि. सोलापूर
मो.नं. ९६६५५५९५७२/९०११००३३१८

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

The Superintending Engineer, MSEDCL, Solapur Circle office invites online bid from reputed agency for E-tender for Preventive Maintenance of Substations in Solapur Circle under Baramati Zone against Tender No SE/SURC/T-01/2026-27 for Amount of Rs 125.00 Lakhs. Last date of Submission of bid 15.04.2026 (14.00 Hrs). For details and downloading of tender please visit our website https://etender.mahadiscom.in/eatApp. All the rights are reserved with the undersigned for acceptance / rejection & cancellation of tender without assigning any reason please note.

**PRO/BMTZ/08/2026-27**

**Superintending Engineer**
**(SURC) MSEDCL, Solapur Circle**

## CHANGE IN NAME

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **KHAJAMIYA AMINSAB BEPARI** HAS BEEN CHANGED TO **KHAJAMIYAN AMINSAHAB BEPARI** Resi. - Maindargi, Tal. Akkalkot, Dist. Solapur

**KINDLY NOTE**

THE SAME.(285/2026 Dtd.07.04.2026)

## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर-०१

**कविता अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर** - **अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणाऱ्यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १११७/२५-२६ | १,६५,६४७/- | ३ | **रमेश पांडुरंग मंदेलु** रूम नं. १, ब्लॉक नं. १५, बुधवार पेठ, मुन्सीपल कॉलनी, सोलापूर |
| २ | १११८/२५-२६ | ३४,०९२/- | ४ | **गौतम बाबूराव मोरे** रा. मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर |
| ३ | ११२०/२५-२६ | १,८९,८८५/- | ३<br>४ | **विलास नागनाथ काळे** रा.१३/२, मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर<br>**सचिन हणमंत फाटके** रा. धाकटा राजवाडा, कौंतम चौक, सोलापूर |
| ४ | ११२१/२५-२६ | २,०८,६३१/- | १ | **विलास नागनाथ काळे** रा.१३/२, मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर |
| ५ | ११२३/२५-२६ | २,०४,१०३/- | १<br>३ | **संतोष महादेव वीर** रा. मु.पो. निमगाव, ता. माढा, सोलापूर<br>**भारत यशवंत सांवत** रा. मु.पो. टेंभुर्णी, ता. माढा., सोलापूर |
| ६ | ११२४/२५-२६ | २,०५,८९६/- | २<br>३ | **संतोष महादेव वीर** रा. मु.पो. निमगाव, ता. माढा, सोलापूर<br>**भारत यशवंत सांवत** रा. मु.पो. टेंभुर्णी, ता. माढा., सोलापूर |
| ७ | ११२५/२५-२६ | २,०५,८९५/- | २ | **संतोष महादेव वीर** रा. मु.पो. निमगाव, ता. माढा, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखाल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहेत.

**उपनिर्दीष्ठ अर्जासबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - मंगळवार दि. २१/०४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अजाची सुनावणी घेण्यात येईल. त्याप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०७/०४/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिंबधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बॅंक्स को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर**

## करमाळा नगरपरिषद

**करमाळा, जि. सोलापूर ४१३००३**

जनसेवा हिच ईश सेवा

**जाहिर फेर लिलाव प्रसिध्दीकरण**

**दूरध्वनी क्रमांक (०२१८२) २२०३१५** **E-Mail : comckarmala@gmail.com**

**जावक क्रमांक : मिळकत विभाग ४४४/२०२६** **दिनांक ०७/०४/२०२६**

याद्वारे सर्व नागरिकांना कळविणेत येते की, करमाळा नगरपरिषद मालकीचे दुकान गाळ्यांचा जाहिर लिलाव वार - गुरुवार, दि. १०/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. नगरपरिषदेच्या मिळकत विभागात आयोजित करणेत आला आहे. तरी इच्छुकांनी खाली दर्शविल्याप्रमाणे बोली बयाणा रककम भरुन लिलावात भाग घ्यावा, बोली रक्कमे शिवाय लिलावामध्ये भाग घेता येणार नाही. बोली बयाणा रक्कम भरणेची मुदत दि. १५/०४/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. लिलावाच्या शर्ती व अटी मिळकत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. लिलाव मंजूर व अथवा नामंजूर करणेचा अधिकार कोणतेही कारण न देता न.प.ने राखून ठेवला आहे.

| अ. न. | शॉपिंग सेंटरचे नाव | गाळा नं. | अनामत रक्कम | लिलाव बोलीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपींग सेंटर | ५०, ५१, ५२, ५८, | ३५,०००/- | ५,०००/- |
| २ | न.प. दवाखाना शॉपींग सेंटर | ४, १३, १४, १५, १६, १७ | १०,०००/- | २,०००/- |
| ३ | भाजी मंडई व व्यापारी संकुल | ११ | १,७०,५००/- | ५,०००/- |
| ४ | कानाड गल्ली शॉपींग सेंटर | २ | ५०,०००/- | ५,०००/- |
| ५ | महात्मा फुले शॉपींग सेंटर | २४ | ४०,०००/- | ५,०००/- |
| ६ | कै. दे.ना.म. जगताप शॉपींग सेंटर | ५ | ९२,०००/- | ५,०००/- |
| ७ | कै. दे.ना.म. जगताप शॉपींग सेंटर | ४४ | १,२१,०००/- | ५,०००/- |

**सही/-**
**(सचिन तपसे)**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना तसेच सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, 2002 च्या कलम 13 (2) अन्वये सूचना**

खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांनी IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited; जी IDFC Bank Limited मध्ये विलीन झाली असून सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे (Secured Loans) घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची ही कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणाद्वारे सुरक्षित करण्यात आली आहेत. संबंधित कर्ज करारांमधील अटी व शर्तींचे पालन करण्यात ते अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या कर्जाच्या परतफेडीत अनियमितता निर्माण झाल्यामुळे, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे अनुत्पादक मालमत्ता (NPA) म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited; जी IDFC Bank Limited मध्ये विलीन झाली असून सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाते) कडे त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम, त्यांना जारी करण्यात आलेल्या संबंधित सूचनांनुसार खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आली आहे. तसेच, सदर रकमांवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि संबंधित तारखांपासून करारामध्ये नमूद केलेल्या दराप्रमाणे हे व्याज आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 145466705 | मालमत्तेवर कर्ज | 1. आशिष कुंभार<br>2. महादेव कुंभार<br>3. सिध्दाराम कुंभार | 28/02/2026 | INR 16,82,433.26/- |

**मालमत्तेचा पत्ता** : भूखंड क्रमांक 89 चा संपूर्ण तुकडा व हिस्सा; भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ 92.93 चौरस मीटर (म्हणजेच 1000 चौरस फूट); सोलापूर महानगरपालिका घर मालमत्ता क्रमांक 653698; जमीन सर्वेक्षण क्रमांक 789/2 (जुना) व नवीन सर्वेक्षण क्रमांक 49/2 पैकी; ठिकाण: कलप्पा म्हेत्रे नगर, गाव: मजरेवाडी, सोलापूर महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीत, तालुका: उत्तर सोलापूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-413003; आणि ज्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व: भूखंड क्र. 88, पश्चिम: भूखंड क्र. 90, उत्तर: रस्ता, दक्षिण: सर्वेक्षण क्र. 222.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 140416571 | मालमत्तेवर कर्ज | 1. निलेश रामचंद्र उपाध्याय<br>2. दिलीप रामलाल जोशी<br>3. निलेश रामचंद्र उपाध्याय तर्फे रामचंद्र उपाध्याय<br>४. दिपाली रामलाल जोशी तर्फे रामलाल जोशी | 27/01/2026 | INR 20,96,676.24/- |

**मालमत्तेचा पत्ता** : सोलापूर, महाराष्ट्र - 413005 येथील तेलंगी पाच्छा पेठ येथे, CTS क्रमांक 56/14B या मालमत्तेवर स्थित आर.के. हाईट्स अपार्टमेंटच्या तळमजल्यावर असलेला, दुकान क्रमांक 1 धारण करणारा मालमत्तेचा संपूर्ण भाग व हिस्सा; ज्याचे क्षेत्रफळ 15.34 चौरस मीटर असून, त्यामध्ये 2.9% व्होटींग शेअर समाविष्ट आहे आणि ज्याच्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत: उत्तर : पार्किंग, दक्षिण - समोरील मोकळी जागा पूर्व - दुकान क्रमांक २, पश्चिम - पार्किंग

आपणास याद्वारे आवाहन करण्यात येते की, IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, जी IDFC Bank Limited मध्ये विलीन झाली असून सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाते) यांना, वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसारची रक्कम- त्या त्या तारखांपासूनच्या करारित व्याजदरासह, तसेच इतर खर्च, शुल्क इत्यादींसह या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत अदा करावी. तसे करण्यात कसूर झाल्यास, IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, जी IDFC Bank Limited मध्ये विलीन झाली असून सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाते) यांना देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, अधोस्वाक्षरीकर्त्यास SRFESI कायद्याच्या कलम 13(4) आणि कलम 14 अन्वये, वर नमूद केलेल्या गहाण मालमत्तांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही सुरू करणे भाग पडेल. तसेच, सदर कायद्याच्या कलम 13(13) अन्वये, आपणास सदर सुरक्षित मालमत्तांची विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**सही/-**
**अधिकृत अधिकारी, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन होऊन सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

दिनांक : **08/04/2026**
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

## कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी

**Email ID :- am_barshi@msamb.com फोन-०२१८४-२२२९७६**

**जा.क्र. जाहीरात/०८** **दिनांक ०७/०४/२०२६**

**जाहिर निविदा प्रसिध्दीकरण**

**निविदा सूचना क्र. ०१/सन २०२६-२७**

कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी खालील कामांच्या निविदासाठी महाराष्ट्र शासनाचे मान्यताप्राप्त विभाग यांचेकडील नोंदणीकृत वर्गातील अनुभवी ठेकेदार यांचेकडून नमुन्यात द्विलिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचा तपशिल | मंजूर रक्कम | कोरी निविदा फॉर्म फी GST सह | बयाणा रक्कम | सुरक्षित ठेव | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे उपबाजार आवार वैराग येथे सार्वजनिक मुतारी बांधकाम करणे, | १,८४,२८६/- | ५९०/- | १,८५०/- | ७,३७२/- | ६ महिने |
| २ | कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे मुख्य बाजार आवारातील २,००० मे. टन क्षमतेच्या गोडावून पाठीमागील बाजूस संरक्षण भिंत बांधकाम करणे, | ६,९७,४६८/- | ५९०/- | ६,९७५/- | २७,८९९/- | ६ महिने |
| ३ | कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शीचे मुख्य बाजार आवारातील नविन १,००० मे. टन क्षमतेच्या गोडावूनच्या व धान्य चाळणी यंत्राच्या समोरील बाजूस धक्का बांधकाम करणे. | ३,७६,०९९/- | ५९०/- | ३,७६१/- | १५,०४४/- | ६ महिने |

सर्व पात्र / इच्छुक निविदा धारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी कोरे निविदा संच दि. ०८/०४/२०२६ ते १५/०४/२०२६ मध्ये कायालयीन वेळेत खरेदी करावा.
निविदा पत्रकातील सर्व अटी व शर्ती निविदाधारकास बंधनकारक राहतील.

**सही/-**
**सचिव,**
**कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी**



# सांगोल्याच्या ठोंबरे कुटुंबाचा पुण्यात तिहेरी गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.७ एप्रिल -**

पुण्यातील वानवडी येथील महात्मा फुले सभागृहात पार पडलेला युवा संकल्प महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात सांगोल्यातील संकेत ठोंबरे यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी संगीत भूषण पुरस्कार, प्रा.राजेंद्र ठोंबरे यांना समाजकार्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल समाज रत्न भूषण पुरस्कार तसेच मनीषा ठोंबरे यांना साहित्य क्षेत्रातील लेखनाबद्दल साहित्य भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. युवा प्रबोधन साहित्य मंच, संकल्प बहुद्देशीय संस्था आणि ग्रामीण युवा बहुद्देशीय संस्थेच्या वतीने त्यांना गौरविण्यात आले.






## महत्त्वाचे

### कुस्तीपटू ललित अंतिम फेरीत दाखल

**नवी दिल्ली** : २३ वर्षाखालील आशिया अजिंक्यपद विजेता ललित याने किर्गिस्तानच्या बिश्केक येथे सुरू असलेल्या आशिया कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांच्या ५५ किलो वजनगट ग्रीको रोमन प्रकाराच्या अंतिम फेरीत धडक दिली आहे. सुवर्णपदकाच्या समीप पोहोचलेल्या ललितने उपांत्य फेरीत चीनच्या हुओयिंग शी याला पराभूत केले. ही उपांत्य लढत २३ वर्षीय ललितने ११-३ अशी एकतर्फी जिंकली. त्याची अंतिम लढत उझबेकिस्तानच्या इख्तियार बोतिरोव्हविरुद्ध होणार आहे. बोतिरोव्हने दुसऱ्या उपांत्य सामन्यात उलान उलू याला ५-३ असे नमविले. या स्पर्धेतील पहिल्या दिवशी भारतीय पथकाला संमिश्र कामगिरीचा सामना करावा लागला. ग्रीको रोमन प्रकारात अमनला ७७ किलो वजनगटात आणि माजी विजेता सुनील कुमार याला ८७ किलो वजन गटात उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागला. त्यामुळे आता हे दोघे कांस्यपदकासाठी आपले भाग्य आजमावणार आहेत. उपांत्य सामन्यात इराणच्या अली ओस्कूकडून पराभूत झालेला अमन कांस्यपदकाच्या लढतीसाठी दक्षिण कोरियाच्या येओनघुन नोहविरुद्ध झुंजणार आहे. याच स्पर्धेत २०२० साली विजेता ठरलेला सुनील कुमार यालाही इराणच्या गुलामरेजा फारोखिसनजानीकडून पराभवाचा धक्का सहन करावा लागला. तो आता आपले स्पर्धेतील चौथे पदक जिंकण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

### अटीतटीच्या लढतीत स्क्वॅशपटू अभय पराभूत

**नवी दिल्ली** : भारताचा अग्रणी स्क्वॅशपटू अभय सिंह याला इजिप्तच्या के. एल. गौना येथे सुरू असलेल्या पीएसए प्लॅटिनम खुल्या स्क्वॅश स्पर्धेत पुरुष विभागात पाच गेमच्या अटीतटीच्या सामन्यानंतर पराभवाचा सामना करावा लागला. स्थानिक खेळाडू युसुफ इब्राहिम याने अभयविरुद्धची ही लढत जिंकली. जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या अभयने या सामन्यात चांगली सुरुवात केली होती. त्याने जागतिक क्रमवारीत सातवे स्थान असलेल्या इब्राहिमविरुद्ध पहिला आणि तिसरा गेम जिंकला होता. मात्र, त्याला विजयाचे हे सातत्य शेवटपर्यंत कायम ठेवता आले नाही. अखेर इजिप्तच्या स्पर्धेचे सहावे मानांकन असलेल्या इब्राहिमने ही रोमहर्षक लढत ७-११, ११-९, ९-११, ११-५, ११-८ अशी जिंकली.

### चंदीगड, कर्नाटकची घोडदौड कायम

**रांची** : चंदीगड आणि कर्नाटक या संघांनी हॉकी इंडियातर्फे येथे आयोजित सबज्युनियर गट महिलांच्या राष्ट्रीय हॉकी अजिंक्यपद स्पर्धेतील आपली विजयी घोडदौड कायम राखली आहे. या संघांनी ब गटातील आपापले साखळी सामने जिंकले. याशिवाय मिझोराम, हरयाणा, ओडिशा आणि झारखंड संघांनी आपापले साखळी विजय साजरे केले. अन्य एका साखळी सामन्यात दादर नगर हवेली संघाने तामिळनाडू युनिट संघाचा १-० गोलने पराभव केला. दरम्यान, चंदीगडने हॉकी हिमाचलचा ४-१ ने, तर कर्नाटकने गुजरातचा ६-१ असा एकतर्फी पराभव करीत स्पर्धेतील दबदबा कायम राखला. मिझोरामने छत्तीसगडला २-१ असे, तसेच हॉकी हरयाणाने मणिपूर संघाला ४-२ असे नमविले.

### अदिती अशोक संयुक्तपणे २७ व्या स्थानावर समाधानी

**लॉस वेगास** : भारतीय गोल्फपटू अदिती अशोक हिला अरामको अजिंक्यपद गोल्फ स्पर्धेत संयुक्तपणे २७ व्या स्थानावर समाधान मानावे लागले. तीन ओव्हर ७५ च्या स्कोअरमुळे तिला हे २७ वे स्थान मिळाले. अंतिम फेरीत अदितीला चौथ्या, सहाव्या आणि १७ व्या होलमध्ये तीन बोगी मिळाल्या मात्र ती एक बर्डी करू शकली नाही, त्यामुळे तिचा स्कोअर तीन ओव्हर राहिला. अदितीचा एकूण स्कोअर आठ ओव्हर राहिला. भारताच्या अन्य गोल्फपटू प्रणवी उर्सला संयुक्तपणे ६६ वे, तर अवनी प्रशांतला ७३ वे स्थान मिळाले. अमेरिकेची लॉरेस कॉफलिन हिने अंतिम फेरीत ७२ च्या स्कोअरने एकूण सात अंडर स्कोअरसह पाच शॉटच्या फरकाने या स्पर्धेतील विजेतेपद प्राप्त केले.

### भारताच्या युवा फुटबॉलपटू रशियासोबत मैत्री सामने खेळणार

**नवी दिल्ली** : १७ वर्षे गटाचा मुलींचा युवा फुटबॉल संघ लवकरच रशियाच्या दौऱ्यावर जाणार असून तेथे हा संघ यजमान संघाविरुद्ध तीन मैत्री सामने खेळणार आहे. फुटबॉल सामन्यांची ही मित्रता मालिका ११ ते १७ एप्रिलदरम्यान रंगणार आहे. भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षक पामेला कोंटी यांनी या दौऱ्यासाठी २३ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली आहे. हे मैत्री सामने ११, १४ आणि १७ एप्रिल रोजी सोची शहरातील मात्सेस्टा फुटबॉल सेंटरच्या मैदानावर खेळले जाणार आहेत. याच वर्षी चीनमध्ये होणाऱ्या एएफसी १७ वर्षे गट महिलांच्या आशिया चषक स्पर्धेच्या तयारीच्या दृष्टीने ही मित्रता मालिका खेळणारा भारतीय संघ सोमवारी रात्री सोची शहरात दाखल झाला आहे.

# अग्रणी फलंदाजांकडून दिल्लीला चांगल्या कामगिरीची अपेक्षा

### आज गुजरातविरुद्ध लढत



**आजचा सामना**

**दिल्ली कॅपिटल्स वि. गुजरात टायटन्स**
**स्थळ** : फिरोजशाह कोटला, दिल्ली
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

◆ **नवी दिल्ली, ७ एप्रिल**

दिल्ली कॅपिटल्स संघाला सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमिअर लीग (आयपीएल) स्पर्धेत आपली बाजू मजबूत करायची असेल तर उद्या बुधवारी गुजरात टायटन्स विरुद्धच्या सामन्यात केएल राहुलच्या नेतृत्वाखालील अग्रणी फलंदाजांना चांगली कामगिरी करावी लागणार आहे. दुसरीकडे गुजरात टायटन्स संघ आपले अस्तित्व टिकविण्यासाठी धडपड करीत आहे. दिल्ली विरुद्ध गुजरात हा सामना येथील फिरोजशाह कोटला मैदानावर खेळला जाणार आहे.

याआधीच्या सामन्यांमध्ये दिल्ली कॅपिटल्स संघाच्या गोलंदाजांनी लक्षणीय कामगिरी केली आहे, त्यामुळे या संघाला स्पर्धेत विजय मिळविणे साध्य झाले आहेत. फलंदाजीची धुरा २२ वर्षीय समीर रिझवी याने सांभाळली आहे. या युवा फलंदाजाने आपल्या धैर्य आणि कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत आतापर्यंत चांगली कामगिरी बजावली आहे. जर राहुल आणि अग्रणी फळीतील फलंदाजांना सूर गवसला तर दिल्ली कॅपिटल्स संघाची बाजू आणखी मजबूत होणार आहे. राहुल सुरुवातीच्या दोन डावांमध्ये ज्या पद्धतीने बाद झाला त्यासाठी त्याला दोषी ठरवता येणार नाही. कोणत्याही क्षणी मोठा डाव खेळण्यासाठी तो समर्थ आहे. तिसऱ्या क्रमांकावर नितीश राणा अपयशी ठरला आहे. या क्रमांकावर खेळताना त्याच्यावर दडपण येत असावे, असे वाटते. श्रीलंकेचा सलामीचा फलंदाज पथुम निसांका याला याआधीच्या सामन्यात सूर गवसलेला दिसून आला. त्यामुळे त्याचा पावरप्लेमध्ये गुजरात टायटन्सचे वेगवान गोलंदाज कॅगिसो रबाडा आणि मोहम्मद सिराज या जोडीचा सामना करण्यासाठी आत्मविश्वास वाढला आहे. स्पर्धेत सलग अर्धशतकी डाव खेळणारा रिझवी आक्रमक पवित्र्यात दिसत आहे. फिरकी गोलंदाजांना हाणण्याची क्षमता त्याच्यात आधीपासून होती आता तो वेगवान गोलंदाजांचाही यथेच्छ समाचार घेत आहे. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या याआधीच्या सामन्यात आधी संयमी फलंदाजी केली मात्र त्यानंतर त्याने आक्रमक फलंदाजी करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला होता.

दिल्लीकडून गोलंदाजीत मुकेश कुमार याने आतापर्यंत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. तसेच कर्णधार अक्षर पटेल पावरप्ले आणि मधली षटके या दोन्हीत प्रभावी ठरला आहे. लुंगी एनगिडीने दिल्ली संघाच्या गोलंदाजीला मजबुती दिली आहे. त्यात टी. नटराजन आणि फिरकीपटू कुलदीप यादव यांचाही सहभाग आहे.

दुसरीकडे गुजरातचा संघ दोन्ही पातळीवर सूर गवसण्यासाठी धडपड करीत आहे. गुजरात संघाला आपल्या आघाडीच्या फळीतील फलंदाजांकडून मोठ्या अपेक्षा असून त्यांची मधली फळीही फारशी प्रभावी ठरलेली नाही. गुजरात संघाला याआधीच्या सामन्यात राजस्थान रॉयल्सविरुद्ध खेळताना २०५ धावांची लक्ष्य मिळाले होते. मात्र, सलामीचा फलंदाज साई सुदर्शन याने चांगली सुरुवात करून दिल्यानंतरही मधल्या फळीतील फलंदाजांना विजय खेचून आणण्यात यश मिळाले नव्हते. यापुढे गुजरात संघाला आपले अस्तित्व टिकवून ठेवायचे असेल तर ग्लेन फिलिप्स, वॉशिंग्टन सुंदर आणि राहुल तेवतिया या मधल्या फळीतील फलंदाजांना दबावातही चांगली कामगिरी करावी लागणार आहे. कर्णधार शुभमन गिल स्नायू दुखीमुळे याआधीच्या सामन्यात खेळला नव्हता. याही सामन्यात त्याचे खेळणे अनिश्चित आहे. गुजरात संघाला या आधीचे दोन्ही सामने गमवावे लागले आहेत. गोलंदाजीतही या संघाच्या गोलंदाजांना अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. सिराज आणि रबाडा यांनी महागडी गोलंदाजी केली तर प्रसिद्ध कृष्णा आपले सातत्य कायम राखण्यात यशस्वी ठरलेला नाही. (वृत्तसंस्था)



देशातील अनेक भागांमध्ये पावसाने हजेरी लावली आहे. त्याचा फटका खेळ आणि खेळाडूंनाही बसलेला दिसत आहे. देशात सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेतही पावसाने उपस्थिती दर्शविली आहे. त्यामुळे सोमवारच्या कोलकाता येथील कोलकाता-पंजाब सामन्याप्रमाणेच मंगळवारी गुवाहाटी येथील राजस्थान विरुद्ध मुंबई सामनाही पावसाच्या आगमनामुळे खोळंबला होता. पावसामुळे गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट स्टेडियमची खेळपट्टी अशी झाकून ठेवण्यात आली होती. पाऊस आणि विजांच्या कडकडाटामुळे प्रेक्षकांनीही मैदानाकडे पाठ फिरविली होती. हाही सामना पावसाने धुतला गेला तर दोन्ही संघांना समसमान एका गुणावर समाधान मानावे लागेल

## नेमबाज पलक-मुकेशला विश्वविक्रमासह सुवर्णपदक

◆ **ग्रेनाडा, ७ एप्रिल**

भारतीय नेमबाज पलक आणि मुकेश नेलावल्ली या जोडीने १० मीटर एअर पिस्तुल मिश्र सांघिक प्रकारात मंगळवारी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या जोडीने स्पेनच्या ग्रेनाडा शहरात आयोजित रायफल आणि पिस्तुलच्या आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेतील आपल्या या प्रकारात चीनच्या स्पर्धकांना पराभवाचा धक्का देत विश्वविक्रमासह सुवर्णपदक पटकाविले आहे.

पलक आणि मुकेश या जोडीने एकूण ४८७.७ गुणांची नोंद करीत अव्वल स्थान मिळविले. हा एक ज्युनियर गटातील विश्वविक्रम ठरला आहे. भारतीय जोडीने उझबेकिस्तानच्या सैदकुलोवा निगिना आणि कमालोव्ह मुखम्मद यांचा ४८१.३ गुणांचा विश्वविक्रम मोडून काढला. हा विक्रम त्यांनी याच वर्षी फेब्रुवारी महिन्यात दिल्ली येथे केला होता. दरम्यान, कियानसुन याओ आणि काई हू या चीनच्या जोडीला ४८४.८ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. हंगेरीच्या जोडीला कांस्यपदक मिळाले. पलक-मुकेशने पात्रता फेरीत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत ५८१ गुणांसह पदकाच्या शर्यतीत स्थान मिळविले होते. (वृत्तसंस्था)

## मद्य प्राशन करून वाहन चालविणाऱ्या डेव्हिड वॉर्नरला अटक

**सिडनी, ७ एप्रिल**

ऑस्ट्रेलियाचा माजी सलामीचा फलंदाज डेव्हिड वॉर्नर याला मंगळवारी मद्य प्राशन करून वाहन चालविण्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली. नंतर त्याची सुटका करण्यात आल्यानंतर तो पाकिस्तानला गेला आहे. तेथे आयोजित पाकिस्तान सुपर लीग स्पर्धेत तो कराची किंग्ज संघाचे नेतृत्व करीत आहे.

या प्रकारामुळे ऑस्ट्रेलियाचा हा आक्रमक फलंदाज आता कायद्याच्या कचाट्यात अडकला आहे. मद्यप्राशन करून वाहन चालविल्याच्या आरोपावरून ऑस्ट्रेलियातील पोलिसांनी त्याला अटक केली होती. त्याची मद्य प्राशन केल्याची तपासणी केली होती आणि त्यात तो दोषी आढळला होता. पोलिसांनी नंतर त्याची सुटकाही केली. पाकिस्तान सुपर लीग २०२६ मध्ये खेळत असलेला ३९ वर्षीय वॉर्नर स्पर्धेतील आपल्या संघाच्या पुढील सामन्यासाठी जास्त दिवसांची विश्रांती असल्यामुळे ऑस्ट्रेलियाला आपल्या परिवारासोबत काही काळ घालविण्यासाठी परतला होता.



या दरम्यान ही घटना घडली. २ एप्रिलनंतर आता वॉर्नरच्या कराची किंग्ज संघाचा पुढील सामना ९ एप्रिल रोजी खेळला जाणार आहे. ५ एप्रिल रोजी सायंकाळी पोलिसांनी सिडनीच्या मारौबरा येथे ड्रंक ॲण्ड ड्राईव्ह करणाऱ्यांची तपासणी मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेची कुणकुण वॉर्नरला लागल्यामुळे त्याने तपासणी स्थळापासून आधीच आपले वाहन पार्क केले होते. मात्र, पोलिसांना शंका आल्यामुळे त्यांनी तेथे जाऊन त्याची श्वास तपासणी घेतली. त्यात तो पॉझिटिव्ह आढळून आला. त्यामुळे त्याला अटक करून मारौबरा पोलिस ठाण्यात नेण्यात आले. आता त्याची पुढील महिन्यात न्यायालयात सुनावणी होणार आहे. ऑस्ट्रेलियाच्या उत्कृष्ट सलामीच्या फलंदाजांमध्ये गणना होणाऱ्या वॉर्नरने २०२४ साली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. मात्र, त्याने बिग बॅश लीग (बीबीएल) स्पर्धेसह फ्रँच्याईझी क्रिकेट खेळणे सुरू ठेवले आहे. त्याने ११२ कसोटी, १६१ वनडे आणि ११० टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलिया संघाचे प्रतिनिधित्व केले होते.

## सोलापूरच्या क्रीडा क्षेत्राला चालना देणार : जिल्हाधिकारी



**सोलापूर, ६ एप्रिल -**

महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेच्या वतीने राजीव देसाई यांनी नूतन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे स्वागत केले .

या प्रसंगी सोलापूर जिल्हा क्रीडा संकुल येथील सुरू असलेल्या पायाभूत सुविधा खेळाडूंना लवकरात लवकर उपलब्ध होऊन मिळाव्यात अशी मागणी देसाई यांनी केली. याबाबत आवश्यक ती कार्यवाही केली जाईल तसेच भविष्यात सोलापूर जिल्ह्यातील क्रीडा धोरणांबाबत सकारात्मक पावले उचलली जातील, अशी ग्वाही नूतन जिल्हाधिकारी यांनी दिली.

### जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांचे आवाहन

## जिल्हा युवा पुरस्कारासाठी १७ एप्रिलपर्यंत अर्ज करा

**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

राष्ट्र व राज्याच्या उभारणीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून समाजातील विविध क्षेत्रात अनेक युवक व युवा संस्था उल्लेखनीय कार्य करीत आहेत. युवकांमधील सुप्त गुणांना वाव देणे, त्यांच्या कार्याचा गौरव करणे व त्यांना प्रोत्साहन देणे या उद्देशाने राज्य शासनाच्या युवा धोरणांतर्गत शासन निर्णय दि. १२ जानेवारी २०१३ नुसार राज्य व जिल्हा युवा पुरस्कार प्रदान करण्यात येतात. इच्छुक युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांनी परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह १७ एप्रिल, २०२६ पर्यंत कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत असे जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी कळविले आहे.

सन २०२५-२६ या वर्षासाठी सोलापूर जिल्ह्यातील समाजोपयोगी कार्य करणाऱ्या युवकांचा गौरव व्हावा या हेतूने जिल्हास्तरावर १ युवक, १ युवती व १ नोंदणीकृत संस्था यांना जिल्हा युवा पुरस्कार देण्यात येणार आहे. अर्जदारांच्या दि. १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीतील मागील तीन वर्षांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात येईल या पुरस्काराचे स्वरूप व्यक्तींसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम रुपये १० हजार तर संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम रुपये ५० हजार असे आहे.

या पुरस्कारासाठी अर्जदारांनी ग्रामीण व शहरी भागात केलेले सामाजिक कार्य, समाजातील दुर्बल घटकांसाठी केलेले योगदान, अनुसूचित जाती-जमाती व आदिवासी विकास, शिक्षण, प्रौढ शिक्षण, रोजगार निर्मिती, आरोग्य व स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्र, विज्ञान व तंत्रज्ञान, महिला सक्षमीकरण, व्यसनमुक्ती, राष्ट्रीय एकात्मता, नागरी वस्ती सुधारणा, झोपडपट्टी विकास, आपत्ती व्यवस्थापन तसेच स्थानिक समस्यांवर केलेले कार्य यांचा विचार करण्यात येणार आहे.



## शालेय राष्ट्रीय रग्बी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ भुवनेश्वरकडे रवाना

**सोलापूर, दि. ६ एप्रिल -**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय शालेय रग्बी (१४ वर्षाखालील मुले व मुली) स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिराची सांगता झाली. या शिबिरानंतर महाराष्ट्राचे दोन्ही संघ ६९ व्या राष्ट्रीय शालेय रग्बी स्पर्धेसाठी भुवनेश्वरकडे (ओरिसा) रवाना झाले.

हरिभाई देवकरण प्रशालेच्या क्रीडांगणावर २ ते ६ एप्रिल या कालावधीत हे शिबीर पार पडले. या शिबिराचा सांगता समारंभ पार्क स्टेडियम येथील हॉलमध्ये महानगरपालिका क्रीडा अधिकारी नजीर शेख, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, सेवानिवृत्त तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, जिल्हा रग्बी संघटनेचे अध्यक्ष भिमराव बाळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका क्रीडा अधिकारी सचिन रणदिवे यांनी केले. तालुका क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड यांनी आभार मानले. खेळाडूंच्या निवासासाठी सोय उपलब्ध करून देणाऱ्या सोलापूर महानगरपालिका, क्रिकेट संघटना आणि सराव मैदानासाठी सहकार्य करणाऱ्या हरिभाई देवकरण प्रशालेचे जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत आभार मानण्यात आले.

**महाराष्ट्राचा नावलौकिक करा**

जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की, ९ ते १० एप्रिल दरम्यान भुवनेश्वर येथे होणाऱ्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय रग्बी स्पर्धेत महाराष्ट्र संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून सुवर्णपदक पटकावावे आणि राज्याचा नावलौकिक करावा. तसेच नजीर शेख यांनीही मागील वर्षाप्रमाणेच यावर्षीही पदक मिळवण्याचा विश्वास व्यक्त केला.

**साईनाथ मगदूम व अनुष्का कुटे कर्णधार**

महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी साईनाथ मगदूम व अनुष्का कुटे यांची निवड करण्यात आली

**असा आहे महाराष्ट्र संघ :**

**मुले:** वीरधवल साळवी, साईनाथ मगदूम, सिद्धेश माने, प्रथमेश सुरवसे, ज्योतीराम निवाळकर, आर्यन येळवे, नयन हटकर, गगन झा, सत्यजित कोळपटे, ऋतुराज बेनाडे, दीपांशू रोहिदास, सार्थक शिंदे.


**मुली:** शिवक्रांती गायकवाड, पूर्वी खामकर, जानवी पोरजे, श्रुती मांडवे, अनुष्का कुटे, तन्वी वाडिवे, ऋतिका रायकर, सानवी माने, जानवी राऊत, अमृता सावंत, युनिका सांदेकर, श्रेया पाटील.

**प्रशिक्षक:** सोनाली शेलार.


**संघ व्यवस्थापक:** राहुल गायकवाड.

## रॉयल व मॉडर्न संघांची विजयी घौडदौड

### इंडियन मॉडेल स्कूल पेरेंट्स क्रिकेट लीग



महेश आरकाल



अब्दुल कादिर सिपायी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल -**

'इंडियन मॉडेल पेरेंट्स क्रिकेट लीग' सोळाव्या पर्वात रॉयल व मॉडर्न संघांने विजयी घोडदौड कायम ठेवली आहे.

येथील रेल्वे मैदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेता रॉयल संघाने ५ गडी राखून विजय मिळविला. रॉयल' संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारले. फलंदाजीसाठी उतरलेल्या अल्फा' संघाला १२ षटकांत ७ बाद ७२ धावांपर्यंतच मजल मारता आली. ७३ धावांचे लक्ष गाठताना ९.१ षटकांत ५ गडी गमावित गाठले. दुसऱ्या सामन्यात आयएमएस मॉडर्नने अंबर संघावर ४८ धावांनी विजय मिळविला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना हाजी तांबोळीच्या ४० धावांच्या जोरावर मॉडर्न संघाने १२ षटकांत ८ बाद ११५ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरादाखल अंबरचा संघ १२ षटकांत ६ बाद ६७ धावाच करू शकला. महेश आरकाल व अब्दुल कादिर सिपायी हे सामन्याचे मानकरी ठरले

**संक्षिप्त धावफलक:**

**अल्फा:** १२ षटकांत ७ बाद ७२ धावा. (अक्रम मुजावर १७, मोईन शेख ९, अनिल जाधव ८, बसवराज अडगळ २/९, सचिन वांगीकर २/१४, महेश आरकाल १/१२) पराभूत विरुद्ध **रॉयल** : ९.१ षटकांत ५ बाद ७३ (महेश आरकाल ३६, शरणप्पा पालोडी १७, सरफराज शेख १३, मुक्तार शेख २/९, अमर पांचवे १/११).

**मॉडर्न:** १२ षटकांत ८ बाद ११५ धावा. (हाजी तांबोळी ४०, अब्दुल पीरजादे २५, सोनु केसवानी १२, धवण एम. २/९, विकास कदम २/२०) वि. वि. **अंबर:** १२ षटकांत ६ बाद ६७ धावा. (राम कोंडले ३३, प्रशांत सुरवसे १२, अनिल पाटील १०. कादिर सिपायी ४/९).

# पूर्व परवानगीनेच उभारावेत महापुरुषांचे पुतळे

## प्रांताधिकारी सचिन इथापे यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ एप्रिल-**

राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींचे पुतळे उभारण्याबाबत राज्य सरकारने मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली असून, महापुरुषांचे पुतळे उभारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीची मान्यता घ्यावी लागेल. कोणतीही व्यक्ती संघटना संस्था किंवा खाजगी मालकीच्या जागेवर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय पुतळा उभा करू शकणार नाही. पूर्व परवानगी शिवाय पुतळा उभारल्यास संबंधित व्यक्ती, संस्था किंवा समितीवर दंडात्मक कारवाई यासोबतच कायदेशीर कारवाई येणार असल्याचे प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.

राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींचे पुतळे उभारण्याबाबतच्या मार्गदर्शनासाठी पोलीस संकुल पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीस सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, सहा. पोलीस निरिक्षक श्री.गोसावी, योगेश लंगुटे, तसेच तालुक्यातील मंडल अधिकारी, पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी व पदाधिकारी उपस्थित होते.

### पुतळ्याची देखभाल महत्वाची

प्रांताधिकारी इथापे म्हणाले, राष्ट्रपुरुषाचा पुतळा उभारायचा असलेल्या जागेच्या मालकी हक्काबाबत वाद असता कामा नये, सदर जागा अनधिकृत नसावी, पुतळा उभारल्यामुळे संबंधित शहर किंवा गावाच्या सौंदर्याला बाधा येणार नाही याची आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न होणार नाही याची खबरदारी घ्यावी, पुतळ्याच्या देखभालीची आणि पावित्र्य राखण्याचीद जबाबदारी संबंधित संस्थेला घ्यावी लागेल. केवळ परवानगी घेऊनच पुतळा उभारून चालणार नाही तर त्याची देखभाल करणे देखील अत्यंत महत्वाचे आहे. पुतळा उभारणारे संस्थेने पुतळ्याच्या क्ले मॉडेलला कलासंचालनालयाची मान्यता घेऊनच पुतळा तयार करावा. मान्यता केलेल्या मॉडेल प्रमाणेच पुतळा उभारण्याची दक्षता घ्यावी.

### युवा वर्गाचे भविष्य कायमचे खराब होते

चुकीच्या पद्धतीने पुतळा उभारणाऱ्या युवा वर्गावर एकदा गुन्हा दाखल झाला तर युवा वर्गाचे भविष्य कायमचे खराब होते. त्यामुळे पुतळा उभारताना आवश्यक त्या परवानग्या घेऊनच पुतळा उभारावा असे सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी सांगितले.

पुतळे उभारण्याबाबत परवानगी मागणाऱ्या संस्था नोंदणीकृत असणं आवश्यक आहे. पुतळा उभारण्यामुळे गावात कुठल्याही प्रकारचा वाद निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. पुतळा उभारलेल्या जागेचा वापर अन्य कामांसाठी करण्याचा अधिकार पुतळा उभारणाऱ्यांना असणार नाही. उभारण्यात आलेल्या पुतळ्याचे पावित्र्य व सुरक्षितता राखावी असे तहसीलदार लंगुटे यांनी सांगितले. महापुरुषांनी समाज उभा करण्याचे काम केले आहे तसेच समाज व्यवस्था कशी चांगली राहील याची काळजी घेतली. महापुरुषांचे विचार आपण जीवनात रुजवावेत असे गटविकास अधिकारी अमोल जाधव यांनी सांगितले.

## महत्वाचे...



## आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या पेशंटसाठी अनुपम विजन सेंटर सुरू

**अकलूज, दि. ७ एप्रिल-**

अकलूज येथील सुप्रसिद्ध अनुपम आय हॉस्पिटल अँड लेजर सेंटर यांच्यावतीने माळशिरस तालुका मराठी पत्रकार संघ यानी आयोजन केलेल्या पत्रकार व नातेवाईकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन माळशिरस तालुका पंचायत समितीचे सभापती दत्तात्रय रावसाहेब मगर यांचे हस्ते श्री गणेश पूजन करून व दीप प्रज्वलीत करण्यात आले. हॉस्पिटल आणि फाउंडेशनचे सर्वेसर्वा डॉ. महावीर खुशालचंद गांधी, डॉ. निखिल महावीर गांधी, डॉ. राजीव महावीर गांधी मोफत नेत्र तपासणी करून योग्य मार्गदर्शन केले. आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या पेशंटसाठी अनुपम विजन सेंटर सुरू केले आहे. माळशिरस तालुक्यातील सर्व शाळांची नेत्र तपासणी करण्याचे ध्येय असल्याचे डॉ. निखिल गांधी यांनी आवर्जून सांगितले. त्यावेळी मराठी पञकार संघाचे तालुका अध्यक्ष कृष्णा लावंड, भारत मगर, चंद्रकांत कुभार, रामचंद्र मगर, अशोक शिदवाडकर, किरण जाधव, भाग्यवत नायकुडे, शिवाजी पालवे, सचिव मंगेश सोनार यानी शिबिर पार पाडण्यात मदत केली. याप्रसंगी अनुपम हॉस्पिटल स्टाफ राम पाटील, नाजनीन शेख, डॉ. समीक्षा भगत, डॉ. निकिताळे, मॅनेजर आशुतोष देशपांडे, माधवी हरीओम माने, सुनिता गुंड, सारिका पवार, प्रणोती राजेंद्र माने, स्वाती गायकवाड, निकिता हजारे, महेक मुलाणी, शबनम नदाफ, प्रशांत पवार, सनी वायकर, अंकिता अजगिरे आदींचा पत्रकारांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



## भाजपा स्थापना दिनादिवशी नगरसेवक किसन जाधव यांच्याकडून प्रेरणादायी संदेश

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ येथे भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रेल्वे लाईन परिसरातील सोनामाता प्रशालेसमोर असलेल्या नगरसेवक किसन जाधव यांच्या संपर्क कार्यालयासमोर भाजपा ध्वजाचे विधिवत ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव हेडगेवार आणि राष्ट्रीय जनसंघाचे सहसंस्थापक पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमांचे पूजन करून झाली. ४६ वर्षे समर्पणाची, ४६ वर्षे राष्ट्रसेवेची या भावनेतून साजऱ्या करण्यात आलेल्या या कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. नगरसेवक किसन जाधव, नगरसेविका चैत्राली गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, युवा नेते चेतन गायकवाड यांच्या हस्ते मिठाई वाटप करण्यात आले. याप्रसंगी माणिक कांबळे, वसंत कांबळे, फिरोज पठाण, राम शिवप्पा गायकवाड, वैभव प्रचंडे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## रणभूमी कर्मवीर क्रीडा महोत्सव उत्साहात

**पंढरपूर, दि.७ एप्रिल-**

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात 'रणभूमी कर्मवीर क्रीडा महोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाला. १ ते ६ एप्रिल दरम्यान झालेल्या या महोत्सवात सुमारे १ हजार ५०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या क्रीडा महोत्सवामध्ये व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ तसेच ॲथलेटिक्स अशा नऊ स्पर्धांचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली. या स्पर्धेसाठी शिवनेरी, प्रतापगड, अजिंक्यतारा, रायगड, सिंहगड, विजयदुर्ग, तोरणा आणि विशालगड अशी आठ हाऊस तयार करण्यात आली होती. प्रत्येक हाऊससाठी एक पुरुष व एक महिला संघमालक नियुक्त करण्यात आला होता. तसेच प्रत्येक खेळासाठी प्राध्यापक संघ व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. महोत्सवाच्या उद्घाटन सुनेत्राताई पवार, अमरजीत पाटील, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. जे.जी.जाधव, प्राचार्य डॉ. बी.टी.जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. हा महोत्सव दीपक पवार, अंशुमन कदम, हॉटेल भारत भुवन, प्रकाश ढाकणे (एमडी डेव्हलपर्स), वैभव भोसले, महावीर गाताडे, ड. विजय जाधव, एल. जी. फुड्स, ओंकार लेंडवे, ओंकार बेंगलोरकर, पोलीस अधिकारी वामन यलमार, विकास मोरे तसेच साई स्पोर्ट्स पंढरपूरचे दिनेश गावडे यांनी पुरस्कृत केला होता. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. उमेश साळुंखे, प्रा. अनिल परमार, प्रा. मनोज खपाले व प्रा. विठ्ठल फुले यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### भागवत जगताप



**टेंभुर्णी, दि. ७ एप्रिल-**

चव्हाणवाडी-टेंभुर्णी (ता. माढा) येथील भागवत जगताप उर्फ भाऊ (वय ९७) यांचे सोमवार ६ एप्रिल रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास वार्धक्यातील अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. टेंभुर्णी येथील वृत्तपत्र विक्रेते जनसेवा न्युज पेपर एजन्सीचे मालक ज्येष्ठ पत्रकार महादेव जगताप, पत्रकार अनिल जगताप यांचे ते वडील होत.



## आधार प्रतिष्ठानचे कार्य कौतुकास्पद : डॉ. बालगावकर

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ७ एप्रिल -**

आधार प्रतिष्ठान संस्थेने अल्पावधीतच केलेले कार्य कौतुकास्पद असून पर्यावरण क्षेत्रातील वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन स्पर्धा ही काळाची गरज ओळखून हे प्रतिष्ठान कार्य करीत आहे, असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जिल्हाध्यक्षा डॉ. अस्मिता बालगावकर यांनी केले.

आधार प्रतिष्ठान आयोजित जिल्हा निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी त्या बोलत होत्या. विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी निवृत्त सहायक गटविकास अधिकारी मल्हारी बनसोडे, दक्षिण सोलापूरचे शिक्षण विस्तार अधिकारी गुरुबाळा सनके आदी उपस्थित होते.

डॉ बालगावकर म्हणाल्या की, या प्रतिष्ठानने अंधश्रद्धा निर्मूलनासाठीही कार्य करत रहावे. अंनिस ही संस्था मदत करत राहिल.असे सांगून विजेत्यांचे अभिनंदन केले. यावेळी मल्हारी बनसोडे म्हणाले, आधारने प्रत्येक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. समविचारी लोक एकत्र येऊन समाजकार्य करणे हे दुर्मिळ होत चालले आहे. अशावेळी प्रतिष्ठानचे काम वाखाणण्याजोगे आहे.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर नळे यांनी स्वागत केले. प्रास्ताविक सचिव प्रा डॉ जवाहर मोरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश चव्हाण व श्रीपाद नळे यांनी केले तर आभार संचालक पैगंबर तांबोळी यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक कैलास चाबुकस्वार, ऋषिकेश व्हनमाने, संस्थापक राजेंद्र कांबळे, उपाध्यक्ष रजनीकांत कुरनुरकर, सहसचिव चंद्रकांत कुंभार, संचालक विजयकुमार वाघमारे, आप्पासाहेब कोळी, दिनेश कुलकर्णी, शिवराज सारोडे,पुनम हुक्केरी,रोहिणी नळे, जयश्री मराठे, ज्योती कांबळे, आशा चव्हाण व मंजुषा फुलारी आदीनी परिश्रम घेतले.

## जिल्ह्यातील आरोग्य सेवा सक्षम करण्यावर भर देणार

### सभापती केदार-सावंत यांची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असून आरोग्य विभागातील रिक्त पदे भरतीसाठी शासन स्तरावर पत्रव्यवहार करून तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी भरती प्रक्रिया राबवण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती जि.प.चे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.

जिल्हा आरोग्य समितीची बैठकीत त्यांनी ही माहिती दिली. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नंदकिशोर घाडगे आदी उपस्थित होते. डॉ. संतोष नवले यांनी जिल्ह्यातील सर्व आरोग्य योजनांची तसेच सन २०२५-२६ मधील आरोग्य योजनांबाबतची आर्थिक व भौतिक आकडेवारी सादर केली.

### केंद्र सरकारच्या 'आभा' कार्ड योजनेला गती

केंद्र सरकारच्या 'आभा' कार्ड योजनेला गती देण्यासाठी आशा सेविका, आरोग्य कर्मचारी आणि इतर विभागांमध्ये समन्वय वाढवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वाढती लोकसंख्या आणि भौगोलिक गरजा लक्षात घेता नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रुग्णांशी बोलताना सौजन्य, नमता आणि तत्परता ठेवून त्यांना दर्जेदार सेवा देण्याचे आदेश देण्यात आले, जेणेकरून रुग्णांना खासगी दवाखान्यात जाण्याची गरज भासणार नाही.

ग्रामीण भागातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये स्वच्छतेबाबत विशेष मोहीम राबवून परिसर निर्जंतुक ठेवण्यावर भर देण्यात यावा. आशा स्वयंसेविकांना प्रशिक्षण देऊन स्थानिक रुग्णांना किरकोळ आजारांवर जागीच उपचार देण्यासाठी सक्षम केले जाईल. यासाठी त्यांना वैद्यकीय किट वाटप करणे व कायम औषध पुरवठ्यासाठी सेस फंडातून निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. सरकारी रुग्णालयांवरील विश्वास वाढवण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नाविन्यपूर्ण योजना राबवाव्यात असे निर्देश देण्यात आले असल्याचे चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

## मोहिते-पाटील नर्सिंगच्या विद्यार्थ्यांची आरोग्य जनजागृती व तपासणी शिबीर



**अकलूज, दि. ७ एप्रिल-**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र माळीनगर अंतर्गत संग्रामनगर आरोग्य उपकेंद्र येथे विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अँड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट येथील विद्यार्थ्यांनी भेट दिली. समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सायली चंदनशिवे यांनी विद्यार्थ्यांना संतुलित आहाराचे महत्त्व, योग्य जीवनशैली, स्वच्छता व वैयक्तिक आरोग्य याबाबत मार्गदर्शन केले. किशोरवयीन मुला-मुलींमध्ये आढळणाऱ्या समस्येबाबत जनजागृती करून त्यावरील उपाययोजना समजावून सांगण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. तसेच योग्य वैद्यकीय सल्ला देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून शंकांचे निरसन करून घेतले. यावेळी संग्रामनगर आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका विश्रांती पाटील, आरोग्य सेविका मनिषा अडगळे कॉलेजच्या प्राध्यापिका सुरेखा कसाब आदी उपस्थित होते.

## कार्यकर्त्यांच्या जोरावर पक्ष पुन्हा उभारी घेणार

### राष्ट्रवादी शरद पवार गटाचे निरीक्षक नागेश फाटे यांचा विश्वास



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ एप्रिल-**

कार्यकर्ता हेच पक्षाचे खरे बळ असून त्यांच्या जोरावर पक्ष पुन्हा उभारी घेणार असल्याचा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सातारा जिल्हा निरीक्षक नागेश फाटे यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (शरदचंद्र पवार गट) सातारा राष्ट्रवादी भवन येथील बैठकीत त्यांनी हा विश्वास व्यक्त केला. सुरुवातीला. फाटे यांनी जिल्हाध्यक्ष तथा माजी सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांकडून पक्षकार्याचा आढावा घेतला. या बैठकीत जिल्ह्यातील पक्ष, संघटन मजबूत करण्यावर, कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यावर तसेच आगामी निवडणुकांच्या दृष्टीने रणनीती ठरविण्यावर भर देण्यात आला. श्री. फाटे यांनी सर्व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत संघटन वाढीसाठी प्रत्येक गाव-पातळीवर काम करण्याच्या सूचना दिल्या. तसेच कार्यकर्ते हेच पक्षाचे खरे बळ असून त्यांच्याच जोरावर पक्षाला पुन्हा उभारी देता येईल. युवक, महिला आणि विद्यार्थी संघटनांना बळकट करून पक्षाचा विस्तार करण्याचे आवाहन देखील यावेळी त्यांच्याकडून करण्यात आले.

या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे, साहिल शशिकांत शिंदे, परिजात दळवी, नरेश देसाई, सतीश चव्हाण, सुनील गाडेकर, शफिक शेख, विक्रम सिंह, सचिन फडतरे, किरण जाधव, चौधरी गोरखनाथ, नलवडे राजकुमार, पाटील उमेश, देशमुख नंदकुमार, मोरे नितीन, लवंगाडे घनश्याम शिंदे महिला जिल्हाध्यक्ष सौ रंजना जगदाळे, अर्चना देशमुख, समिंदरा जाधव, तेजस्वी केसरकर, उषा जाधव, कुसुमताई, पूजा बनसोडे, सुवर्णताई पाटील आदी उपस्थित होते.

## मंद्रूपमध्ये भाजपाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांना 'अच्छे दिन'

### पंचायत समिती सदस्याच्या विरोधात रणनीती सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

मंद्रूप ग्रामपंचायतीची आगामी निवडणूक नजरेसमोर ठेऊन व मंद्रूपमधील भाजपांतर्गत गटबाजी कमी करण्यासाठी भाजपाच्या ज्येष्ठ नेत्यांना पक्षात 'ॲक्टिव्ह' राहण्याच्या सूचना देण्यात आली आहे. त्यामुळे ज्येष्ठ कार्यकर्त्यांना आगामी काळात 'अच्छे दिन' येणार असल्याची चर्चा सुरू आहे.

मंद्रूप ग्रामपंचायतीवर २०१७ ते २०२२ मध्ये भाजपाची सत्ता असताना आमदार सुभाष देशमुख यांनी कोट्यावधीची विकासकामे केली. मात्र, भाजप सत्तेवर असताना ग्रामपंचायतीमध्ये गौरीशंकर मेंडगुदले व मळसिध्द मुगळे यांच्यामध्ये पॅनलप्रमुख पदावरून वाद निर्माण झाल्याने गटबाजी वाढली. शिवाय विकासकामे करूनही अंतर्गत वादामुळे जनतेपर्यंत विकासकामे पोहोचली नाहीत. त्यामुळे २०२२च्या ग्रामपंचायत निवडणूकीत भाजपाला पराभव पत्करावा लागला. या निवडणूकीत भाजपा नेत्यांमध्ये 'ताळमेळ' नसल्याने सरपंच पदाच्या उमेदवाराचे पराभव झाले. त्यामुळे आमदार देशमुख नाराज आहेत.

### तिसऱ्या आघाडीची निर्मिती

पं.स. सदस्य मुगळे यांनी पक्षनेतृत्वाच्या विरोधात जाऊन निवडणूक लढविल्याने सभापती पदापासुन वंचित राहावे लागले. त्यामुळे मंद्रुपच्या आगामी निवडणूकीत त्यांच्या गटाची सत्ता रोखण्यासाठी ज्येष्ठ कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात आली आहे. त्यानुसार राष्ट्रवादीचे कोरे व मुगळे यांच्या विरोधात भाजपाकडून तिसरी आघाडी राहणार असल्याची चर्चा सुरू आहे.

मेंडगुदले व मुगळे वादावर तोडगा म्हणून भाजपाचे जुने व ज्येष्ठ कार्यकर्त्यांना पुन्हा सक्रीय करण्यात आले आहे. त्यामुळे ज्येष्ठ कार्यकर्तेही पक्ष आदेश मानून निवडणूकीच्या तयारीला लागले आहेत. पक्षामधील अंतर्गत गटबाजी दूर करण्यासाठी आमदारांच्या उपस्थितीत लवकरच बैठक घेण्यात येणार असुन ग्राम पंचायत निवडणूकीची रणनीतीही ठरविण्यात येणार असल्याचे एका ज्येष्ठ कार्यकर्त्यांने सांगितले.

### सत्ताधाऱ्यांमध्ये विस्कळीतपणा

मंद्रूपमधील सत्ताधाऱ्यांमध्ये विस्कळीतपणा दिसून येते. ग्रामपंचायत निवडणूकीत 'काकां'च्या आशीर्वादाने सत्ता मिळाली. मात्र सत्तेवर येताच अनेक जुने सहकारी व पॅनलप्रमुख कोरे गटाबद्दल नाराजी व्यक्त करीत आहेत. त्यामुळे तिसऱ्या आघाडीला ताकद मिळणार आहे. सत्ताधाऱ्यांच्या विस्कळीतपणाचा फायदा घेऊन ग्रामपंचायत सत्ता मिळविण्याची रणनीती आखण्यात येत आहे.

### नाराजी दूर करण्याचे आव्हान

मळसिध्द मुगळे यांनी पंचायत समिती निवडणूकीत यश मिळविला असला तरी स्थानिक निवडणूकीतील मताधिक्याबाबत साशंकता आहे. स्थानिक पातळीवर त्यांच्याबाबत नाराजी आहे. त्यामुळे मंद्रूपमधील मतदारांची नाराजी दूर करण्यासाठी मुगळे यांना मोठ्या प्रमाणात विकासकामे करावी लागणार आहे. तसेच सर्वसमावेशक राजकारण करून मतदारांचा विश्वास संपादन करावे लागणार आहे.

२०१० मध्ये भाजपाचे तालुकाध्यक्ष पद मंद्रूपकडे असताना पक्षवाढ झाली आहे. अनेक ज्येष्ठ मंडळींच्या प्रयत्नामुळेच भाजप मंद्रूप ग्रामपंचायतमध्ये सत्तेवर आला. मात्र, सध्या तरूण पिढीमध्ये 'स्वयंघोषित' नेत्याची भावना अधिक असल्यामुळे पक्षाच्या विचारधारांना तिलांजली दिली जात आहे. त्यामुळे अंतर्गत गटबाजी उफाळुन आली असून याचा प्रत्यय पंचायत समिती निवडणूकीत दिसून आला आहे. आ. देशमुख यांचा विरोध असतानाही मुगळे यांनी उमेदवारी मिळवून स्थानिक नेतृत्वाला आव्हान दिले. त्यामुळे देशमुख गट मुगळे यांच्यावर नाराज आहे. म्हणून मंद्रूपमधील भाजपामध्ये दोन गट तयार झाले आहेत.

यापूर्वी पक्षासाठी निष्ठेने काम केलेल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन मंद्रूप ग्रामपंचायतीवर भाजपाचे कमळ फुलवायचे निश्चित झाले असून त्याची रणनीती तयार असल्याचे सांगण्यात येते. मात्र, या प्रक्रीयेत तरूण कार्यकर्त्यांना दूर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे जुन्या कार्यकर्त्यांच्या अनुभवावर भाजपा मंद्रूपमध्ये सत्तेवर येणार का? हे पाहावे लागणार आहे.

## महत्वाचे....



### ज्ञानगंगा घरोघरी आली, नुमवि शिशु शाळा प्रवेशासाठी सज्ज झाली

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

नू.म .वि .शिशु शाळेत प्रवेश उत्सवास सुरुवात झाली. यावेळी माननीय मुख्याध्यापिका सौ अर्चना कुलकर्णी व सांस्कृतिक प्रमुख अलका ओक, मृणाल देशपांडे, स्नेहा गजेंद्रगडकर, सारिका कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. त्यानंतर सरस्वती पूजन आणि सर्व शालेय कामकाजास उपयुक्त अशा साहित्याचे पूजन व आरती करण्यात आली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्येने पालक उपस्थित होते. यावेळी मुलांसाठी प्रोजेक्टरवर गाणी, गोष्टी दाखवण्यात आल्या.



### महसूल बीट पत्रकार संघाकडून जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांचा सत्कार

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या बदलीनंतर कार्तिकेयन एस. यांची सोलापूर जिल्हाधिकारीपदी शासन नियुक्ती झाली आणि त्यांनी नुकताच पदभारही घेतला. यामुळे नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांचा आज (दि. ०७) जिल्हाधिकारी कार्यालय महसूल बीट संघटनेच्या वतीने एक छोटेखानी सत्कार सोहळा पार पडला. प्रारंभी शहर-जिल्ह्यातील विविध विषयांवर जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी विस्ताराने चर्चा केली. जिल्ह्यातील ११ तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न त्यांनी जाणून घेतले आणि सोलापूर जिल्ह्यासाठी महत्वाचे असलेले त्यांचे काही संकल्पही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. यानंतर महसूल बीटचे अध्यक्ष अविनाश गायकवाड, सचिव मनोज हुलसुरे, विष्णू सुरवसे, विशाल बिराजदार आदींनी संघटनेच्या वतीने सत्कार केला.

# शहर-जिल्ह्याच्या 'एकेक' प्रश्नांची 'हळू-हळू' उकल करणार

- नूतन जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांची ग्वाही
- आयटी पार्क, कॉरिडॉर, आषाढी वारीवर फोकस

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

मागील जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आपल्या २ वर्षे ९ महिन्याच्या कारकीर्दीत शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या नवनव्या योजना, विविध उत्सव, पंढरपूरच्या वारीत व इतर लहान-मोठ्या कार्यक्रमात त्यांच्या सहकारी टीमला घेवून मायक्रोप्लॅनिंग करून कौतुकास्पद कामगिरी बजावली होती. त्याच धर्तीवर आपणही धडाकेबाज कामगिरी करणार असून, सध्या आपला फोकस सोलापूरचे आयटी पार्क, पंढरपूर कॉरिडॉर अन् आषाढी वारीवर आहे. यानंतरही जिल्ह्यातील एकेक प्रश्नांची हळू-हळू उकल करीत राहणार असल्याचा आत्मविश्वास नूतन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दैनिक तरूण भारतशी खास संवाद साधताना व्यक्त केला.

जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर विस्ताराने बोलताना जिल्हाधिकारी कार्तिकेयन पुढे म्हणाले की, मी शासकीय योजना व इतर सार्वजनिक उपक्रम तळागाळात घेवून मायक्रोप्लॅनिंग करणार आहे. पंढरपुरातील कॉरिडॉर हा विषय राज्यातील तमाम वारकऱ्यांसाठी आणि तीर्थक्षेत्र पंढरपूरसाठी अगदी महत्वाचा विषय आहे. यासाठी मी प्रथम श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेचे दर्शन घेवून त्या ठिकाणच्या कॉरिडॉरबाबत पंढरीतील अधिकारी-कर्मचाऱ्यांशी संवाद साधून माहिती घेतली आणि यानंतर जिल्हाधिकारी पदाची सुत्रे हाती घेतली आहेत. म्हणजेच पंढरपूरचे कॉरिडॉर हा विषय आपल्या अजेंड्यावर पहिल्यांदाच असणार आहे. मात्र हा प्रकल्प साकारताना स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनाही तितक्याच विश्वासात आपण घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सोलापुरातील अनेक उच्चशिक्षित मुलांना आयटी पार्क नसल्याने मुंबई, पुणे, कोल्हापूर, बेंगलोर, हैदराबाद आदी ठिकाणी नोकरीसाठी स्थलांतर व्हावे लागत असल्याचीही माहिती मला मिळाली आहे. यासाठी सोलापुरातील आयटी पार्कच्या उर्वरित कामाला आता गती देण्याचे काम आपण सुरू करणार आहोत. सिध्देश्वरांच्या नगरीत आयटी पार्क उभारणी लवकर झाली तर अनेक उच्चशिक्षित युवकांना येथेच नोकरी मिळणार आहे. याचबरोबर अनेक उद्योजक सोलापुरात आल्यानंतर रोजगारवृध्दी होणार आहे. या प्रश्नांबरोबर आता आषाढी वारीचे



नियोजनही आम्ही सुरू केले आहे, वारीत दरवर्षी १० ते १५ लाख भावीक पंढरीत येतात, पालखी मार्ग, वारकऱ्यांना पंढरीत दाखल झाल्यानंतर येथील मंदिर समिती, नगरपालिकांकडून देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा आदींचाही मी अभ्यास सुरू केला आहे. गेल्यावर्षी आषाढी वारीत राहिलेल्या त्रुटींची आपण माहिती घेवून त्या त्रुटी या वारीत कशा सुधारतील? याचाही मी अभ्यास करून यंदाचे नियोजन करणार आहे. यासाठी मी मागील जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचेही मार्गदर्शन घेणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जिल्ह्यातील उजनी जलपर्यटनाचा विषयही तितकाच महत्वाचा आहे. हा विषय मार्गी लागला तर अनेक युवकांना येथेच रोजगार मिळणार आहे. बोरामणी विमानतळाचा विषयही तितकाच महत्वाचा आहे. शहरातील उड्डाणपूल व इतरही अनेक विषय समोर येणार आहेत. यामुळे शहर-जिल्ह्यातील एकेक प्रश्नांची हळू-हळू उकल करणार असल्याचे शेवटीही त्यांनी सांगितले.

# सोलापूर जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी सुनील पेंडसे

**उपाध्यक्षपदी ॲड.मिलिंद कुलकर्णी**



सुनील पेंडसे



मिलिंद कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

सोलापूर जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी सुनील पेंडसे तर उपाध्यक्षपदी ॲड.मिलिंद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. नुकत्याच झालेल्या बँकेच्या संचालकपदाच्या पंचवार्षिक निवडणुकीत परिवार पॅनलचे सर्वच उमेदवार विजयी झाले.

उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा उपनिबंधक तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांच्या उपस्थितीत संचालकांची बैठक घेण्यात आली. तीत अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवड करण्यात आली. या बैठकीत बँकेच्या अध्यक्षपदी सुनील पेंडसे यांची तर उपाध्यक्षपदी ॲड. मिलिंद कुलकर्णी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी सोलापूर जनता बँकेच्या मुख्य कार्यालयातील संचालक मंडळ सभागृहात निवडीची घोषणा केली. यावेळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी सोलापूर जनता सहकारी बँकेचे नूतन अध्यक्ष सुनील पेंडसे आणि उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा उपनिबंधक आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी किरण गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संचालक पुरुषोत्तम उडता, राजेश पवार, सी. ए. गिरीष बोरगावकर, रवींद्र साळे, संचालिका चंद्रिका चौहान, गौरी आमडेकर, संचालक डॉ. हर्षद डंबळ, सी. ए. आनंद करवंदे, सुरेश चिक्कळी, महादेव न्हावकर, प्रमोद भुतडा, विष्णू मोंढे, ॲड. मल्लिनाथ शहाबादे, अमित आपटे, चरणसिंग चौव्हाण, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे उपस्थित होते.

**नूतन पदाधिकारी, संचालक मंडळाचा बँकेतर्फे सत्कार**

सोलापूर जनता सहकारी बँकेचे नूतन अध्यक्ष सुनील पेंडसे आणि उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी तसेच सर्व संचालक मंडळाचा सत्कार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सोलापूर जनता सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे, उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी, देवदत्त पटवर्धन, मकरंद जोशी, सहाय्यक सरव्यवस्थापक रामदास सिद्धूल, तुळशीदास गज्जम, रमेश माम ड्याल, मुख्य कार्यालयातील अधिकारी मदन मोरे, सुहास कमलापूरकर आदी उपस्थित होते.

# अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या समाजसेवेचा महाउपक्रम

- शिखर पहारिया फाउंडेशनच्यावतीने माणुसकीचा महोत्सव
- अन्न, शिक्षण, आरोग्य, पाणी, स्वावलंबन उपक्रमाचा संगम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

प्रसिध्द उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने गुरुवार, दि.९ एप्रिल २०२६ रोजी शहर व जिल्ह्यात तब्बल १४ ठिकाणी विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर शहरातील जुनी मिल कंपाऊंड मैदान येथे ५ हजार गरजू कुटुंबांना अन्नधान्य किट वाटप कार्यक्रमाने या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यानिमित्ताने सोलापुरात समाजसेवेचा महाउपक्रम आणि माणुसकीचा महोत्सव होणार आहे, अशी माहिती फाउंडेशनचे तन्वीर शेख आणि राज सलगर यांनी दिली.



जिल्ह्यातील २०० विद्यार्थिनींना सायकली, १ हजार विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात येणार आहे. अनाथ आश्रमासाठी ५० बेड देण्यात येणार आहे. २०० महिलांना शिलाई मशीनचे वितरण करण्यात आले. विविध १० शाळांमध्ये आरओ फिल्टर प्लांट बसविण्यात येणार आहेत. १० शाळांमध्ये संगणक संच देऊन विद्यार्थ्यांना संगणक साक्षर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत या उद्देशाने ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेण्यात येणार आहे. १०० ठिकाणी जनावरांसाठी पाण्याची सोय करण्यासाठी पाण्याची पात्रे बसविण्यात येणार आहे.

वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या घरांसाठी, मंदिरांसाठी १ हजार पत्र्यांचे वाटप करण्यात येणार आहे. कुंभारी येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगर येथे बोअर मारून सबमर्सिबल पंप बसविण्यात येणार आहे.कुंभारी येथील गेनसिध्द देवालय येथे ५८.५ केव्हीए क्षमतेचा जनरेटर बसविण्यात येणार आहे. गरजू रुग्णांसाठी विविध प्रकारच्या १०० शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. एकाच दिवशी इतक्या व्यापक प्रमाणावर राबविण्यात येणाऱ्या या महाउपक्रमामुळे सोलापूर जिल्ह्यात माणुसकीचा महोत्सव होणार आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी धर्मराज गुंडे, कौशल शिंदे, सूर्या शेट्टीयार, तुषार जोगदनकर, धीरज कारंडे यांनी केले आहे.

# जगात सर्व ठिकाणी अस्थिरता : ह.भ.प.गाडगीळ

**धर्म संकीर्तन ५ वे पुष्प**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि ७ एप्रिल**

रामाची भक्ती करा रामाचे सेवक व्हा ! राम गावा राम घ्यावा राम द्यावा राम सर्वार्थाने आदर्श आहेत. लोकानां विसावा राहिला नाही जगात सर्व ठिकाणी अस्थिरता आहे . मुळ स्वरूपात आल पाहिजे.... स्व स्वरूपात एकरूप झाले पाहिजे.

राम द्यावा, राम घ्यावा, राम जीवाचा विसावा.. यावर पुर्वाधात किर्तनात निरूपण करून रामाची महती ह भ प. गणेशबुवा गाडगीळ (कल्याण) यांनी विशद केली. वटवृक्ष स्वामी महाराज मंदिर येथे समर्थ च्या १४ ८ व्या पुण्यतिथी निमित्य आयोजित धर्म संकीर्तन महोत्सवात ५ वे पुष्प गुंफताना ह.भ.प. गणेशबुवा गाडगीळ यांनी हरिकीर्तनाची सेवा स्वामी चरणी सादर केली. संत सुरदास



संत तुलसीदास यांची कथा पंढरीची महती विशद करताना जेव्हा चराचर नव्हते आधी रचिली पंढरी चे महत्व सांगितले. काया ही पंढरी आत्मा हा 'विठ्ठल' पंढरी चे महत्व विशद केले. छत्र सिंहासनी शोभते आयोध्या चा राजा रामाची महती सांगताना हभप. गाडगीळ यांनी गोंदवलेकर महाराज यांची कथा सांगून जिवनातील रामाच महत्व सांगून रामाची भक्ती करण्याचा संदेश दिला. ह.भ.प. गणेशबुवा गाडगीळ यांचा पुष्पहार घालुन सत्कार वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मंदिर समिती च्या वतीने मनोज जाधव यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी वरवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक महेश इंगळे, सचिव आत्म ाराम घाटगे विश्वत महेश गोगी उज्वलाताई सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, प्रा. शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, श्रीशैल गंवडी, मनोज जाधव, ऋषी लोणारी, स्वामी लोणारी : काशीनाथ इंडे, बाळासाहेब कुलकर्णी राजु भोसले. महादेव तेली, लक्ष्मण पाटील, प्रसाद सोनार, अशोक कडगंची, ओंकार पाठक, अक्षय सरदेशमुख' गिरिष पवार, संजय पवार, रमेश शिंदे' सुनिल पवार, बाळासाहेब एकबोटे, माणिक माशाळ ज्ञानेश्वर भोसले' आदि भक्त गण उपस्थित होते .

# तू गरीब घरची आहेस म्हणत विवाहितेला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

तू गरीब घरची व कमी शिकलेली आहेस. आमच्या खानदानाला शोभत नाही. असे सारखे म्हणून एका विवाहितेला म ारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास सासरच्यांनी दिला आहे.

दि. २९ सप्टेंबर ते आज पर्यंत प्रीती सुयश पुकाळे, वय २६, रा. प्लॉट नंबर ६०३ जानकी क्रिस्टल अपार्टमेंट, केटावून बिल्डिंग जवळ, देहूरोड, पुणे, सध्या राहणार घर नंबर डी / ०५ दुर्गा रेसिडेन्सी, प्रज्ञा हॉटेल शेजारी, अक्कलकोट रोड, सोलापूर ही सासरी नांदत असताना सुरेश पुकाळे (पती), कृपा पुकाळे (सासू), (आज सासरे) उत्तमराव काशिनाथ पुकाळे यांनी प्रीती पुकाळेला तू गरीब घरची व कमी शिकलेली मुलगी आहेस. तू आमच्या खानदानाला शोभत नाही. असे सारखे म्हणून तिला सतत मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास दिला. पती सुरेश पुकाळे यांनी तिला पत्नी सारखी कधीही वागणूक दिली नाही. सारखे टोमणे मारत होते. माझ्यापासून अलिप्त राहून प्रीती पुकाळेला मानसिक त्रास देत होते. याबाबत दि. ७ एप्रिल रोजी तिघा जणांविरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

# ९ ते १४ एप्रिल दरम्यान 'समता सप्ताह'

- १ हजारहून अधिक संविधान उद्देशिकेचे होणार वितरण
- सभापती संस्कृती सातपुते यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

सामाजिक समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांची जनजागृती करण्याच्या उद्देशाने समाजकल्याण विभागाच्या वतीने ९ ते १४ एप्रिल या कालावधीत 'समता सप्ताह'चे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहादरम्यान जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये जनजागृती उपक्रम राबवण्यात येणार असून, नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे, अशी माहिती समाजकल्याण सभापती संस्कृती सातपुते यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.



जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाच्या दालनात या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना सातपुते म्हणाल्या, समता सप्ताहाच्या निमित्ताने शाळा, महाविद्यालये तसेच विविध शासकीय कार्यालयांमध्ये संविधान उद्देशिकेचे वाचन, व्याख्याने, चर्चासत्रे आणि जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, समाजकल्याण विभागाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर संविधान उद्देशिकेचे वितरण केले जाणार आहे. यामुळे नागरिकांना संविधानातील मूलभूत मूल्यांची ओळख होऊन सामाजिक समतेचा संदेश अधिक व्यापक पातळीवर पोहोचेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. सप्ताहा दरम्यान महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याचा प्रचार-प्रसार केला जाणार आहे. सामाजिक सलोखा, बंधुता आणि समानतेचा विचार रुजवण्यासाठी विविध स्पर्धा, रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, यासाठी विशेष उपक्रम राबवले जाणार आहेत.

सभापती संस्कृती सातपुते यांनी सांगितले की, समता सप्ताह हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा एक प्रभावी प्रयत्न आहे. प्रत्येक घटकापर्यंत संविधानाचा संदेश पोहोचवणे ही समाजकल्याण विभागाची जबाबदारी असून, त्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले. समता सप्ताहाच्या माध्यमातून समाजातील घटकांमध्ये एकात्मता, समानता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा प्रसार होऊन अधिक समताधिष्ठित समाज घडवण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. दरम्यान, समाजकल्याण विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व योजनांची माहिती सभापती संस्कृती सातपुते यांनी संबंधित खात्यांच्या अधिकाऱ्यांकडून घेण्याचे कामकाज करत आहेत. त्यामध्ये दिव्यांग कल्याण योजना, आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजना, दलीत वस्ती सुधारणा योजना, यांसारख्या विविध योजनांचा आढावा घेतला आहे. या सर्व योजनांची सद्यस्थितीची माहितीही यावेळी जाणून घेण्यात आली.



# स्वतःपासून आरोग्याची सुरुवात करा; विज्ञानाची साथ घ्या : डॉ. नवले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. विज्ञानाच्या प्रगतीची जोड देत आपण निरोगी भविष्य घडवू शकतो. मात्र एकत्रित प्रयत्न आरोग्यासाठी, विज्ञानाची साथ भविष्यासाठी याघोषवाक्याची अंमलबजावणी प्रत्येकाने स्वतः पासूनच सुरू करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी केले.

जागतिक आरोग्य दिनानिमित्त सोलापूर जिल्हा रुग्णालयात विविध आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. क्षीरसागर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. पी. कुलकर्णी, दंत वैद्यकीय अधिकारी डॉ. वायचळ, जिल्हा लेखा व्यवस्थापक वैशाली थोरात, डॉ. काशेट्टी मीना, डॉ. दळवी, डॉ. ऐश्वर्या सातपुते, डॉ. पल्लवी अंबुरे, डॉ. सुवर्णा राठोड, डॉ. पूजा राठोड, शोभा माने आदी उपस्थित होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. नवले यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी डॉक्टर्स, परिचारिका, रुग्णसेवक उपस्थित होते.

# कामती येथील श्रीकृष्ण गुरुकुलचे उल्लेखनीय कार्य

- 'तरुण भारत'चे मुख्य संपादक प्रशांत माने : प्रमोद आवताडे यांच्या शैक्षणिक 'व्हिजन'चे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ७ एप्रिल-**

कामती (बु) ता. मोहोळ येथील शिक्षण क्षेत्रात आपल्या शिस्तबद्ध आणि प्रगत कार्यपद्धतीने अल्पावधीत नावलौकिक मिळवलेल्या 'श्रीकृष्ण गुरुकुल' शिक्षण संस्थेला मंगळवार, ७ एप्रिल रोजी मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी 'तरुण भारत'चे मुख्य संपादक प्रशांत माने यांचा, श्रीकृष्ण गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद आवताडे यांच्या हस्ते शाल देऊन सत्कार करण्यात आला.

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाचे 'व्हिजन' या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान संस्थापक अध्यक्ष प्रमोद आवताडे यांनी प्रशांत माने यांच्याशी संवाद साधताना गुरुकुलच्या आजवरच्या प्रवासाची आणि भविष्यातील शैक्षणिक प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे आणि त्यांच्यात मूल्यांची रुजवण व्हावी, या ध्येयाने आवताडे यांनी या संस्थेची उभारणी केली आहे. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून त्यांचा शिक्षण क्षेत्रातील दांडगा व्यासंग आणि दूरदृष्टी (व्हिजन) प्रकर्षाने दिसून आली. यावेळी बोलताना प्रशांत माने म्हणाले की, श्रीकृष्ण गुरुकुलचे शिस्तबद्ध वातावरण आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम कौतुकास्पद आहेत. बदलत्या काळातील शैक्षणिक आव्हाने ओळखून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रमोद आवताडे जे प्रयत्न करत आहेत, ते खरोखरच दिशादर्शक आहेत. याप्रसंगी पत्रकार प्रभाकर क्षीरसागर व स्थानिक मान्यवर उपस्थित होते.

या भेटीदरम्यान मान्यवरांनी संस्थेच्या पतसंस्थेलाही भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. प्रमोद आवताडे यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल आणि श्रीकृष्ण गुरुकुलच्या प्रगतीबद्दल या भेटीदरम्यान अतिशय सकारात्मक चर्चा करण्यात आली. तंत्रज्ञान आणि आधुनिक अध्यापन पद्धतींचा वापर करत असतानाच सामाजिक बांधिलकी जपणारे आवताडे सर यांचे नेतृत्व शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी आहे.



**प्रमोद आवताडे सहकार, सामाजिक क्षेत्रात योगदान**

प्रमोद आवताडे यांनी केवळ शाळा न उभारता 'गुरुकुल' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे. ग्रामीण भागातील पाल्यांना शहराकडे न धावता आपल्याच भागात दर्जेदार शिक्षण आणि अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. शिक्षण क्षेत्रासोबतच त्यांनी पतसंस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आर्थिक सक्षमीकरणाचे कामही प्रभावीपणे केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# शांती चौक स्मशानभूमीच्या वादावर अखेर पडदा

## सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीने केला खुलासा

## महापालिकेचा निर्णय मान्य : धर्मराज काडादी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

शहरातील शांती चौक येथील स्मशानभूमीच्या जागेबाबत सुरु असलेल्या वादावर अखेर श्री सिध्देश्वर देवस्थानने स्पष्ट भूमिका मांडत पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर जागा महापालिकेने होटगी मठाला किंवा इतर कोणत्याही संस्थेला दिल्यास त्याबाबत देवस्थानची कोणतीही हरकत नसल्याचे अध्यक्ष श्रीसिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी स्पष्ट केले.



श्रीसिध्देश्वर देवस्थानने महापालिकेकडे कधीही या जागेची मागणी केलेली नाही. मात्र, महापालिका निवडणुकीपूर्वी प्रशासनाच्या कार्यकाळात, लिंगायत समाजासाठी स्मशान भूमीचे व्यवस्थापन देण्याच्या दृष्टीने देवस्थानच्या अनुभवाचा विचार करुन त्यांना सहकार्य करण्याबाबत प्रस्ताव देण्यात आला होता. या प्रस्तावात आ. विजयकुमार देशमुख यांच्या नावाचाही उल्लेख करण्यात आला होता.

यासंदर्भात श्रीसिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीच्या बैठकीत चर्चा होऊन सहकार्याची तयारी दर्शविण्यात आली. महापालिकेला होकार कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर जागा देवस्थानकडे देण्याबाबत ठरावही करण्यात आला होता. मात्र, निवडणुकीनंतर प्रत्यक्ष ताबा घेण्याबाबत कोणतीही पुढील कार्यवाही झालेली नाही, असेही त्यांनी सांगितले.

**खालच्या पातळीवर राजकारण :** महापालिका निवडणुकीनंतर स्मशानभुमीच्या मुद्यावरुन लिंगायत समाजासह समाजातील विविध संस्था आणि व्यक्तींमध्ये मतभेद निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात असल्याचा आरोप श्रीसिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी केला होता. विशेष म्हणजे, गेल्या काही वर्षांपासून देवस्थानच्या विरोधात खालच्या पातळीवर राजकारण सुरु असल्याचेही त्यांनी नमूद केले होते.

**अनावश्यक वादांना आळा :** संबंधित जागेबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार पूर्णतः महानगरपालिकेकडे असून, कोणताही निर्णय घेतल्यास देवस्थान त्यास विरोध करणार नसल्याचे काडादी यांनी सांगितले. त्यामुळे स्मशानभूमीच्या जागेबाबत अनावश्यक वादांना आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सोलापूरला मुंबईशी जोडणारी ‘जीवनवाहिनी’; सिध्देश्वर एक्सप्रेसचे सुवर्ण महोत्सवी वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर विभागच्या वतीने १२११६/१२११५ सोलापूर-मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस सिध्देश्वर सुपरफास्ट एक्सप्रेस ८ एप्रिल १९७६ रोजी सुरु करण्यात आला. सोलापूरला मुंबईशी जोडणारी ‘जीवनवाहिनी’ म्हणून गणल्या जाणाऱ्या सिध्देश्वर एक्सप्रेसची सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. सुरुवातीपासूनच ही प्रतिष्ठित रेल्वेगाडी कनेक्टिव्हिटी, विश्वासार्हता आणि अभिमानाचे प्रतीक म्हणून उभी राहिली आहे.

सोलापूर आणि मुंबई दरम्यान ’रात्रीची सेवा’ उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेली सिध्देश्वर एक्सप्रेस, गेल्या पाच दशकांमध्ये प्रवाशांसाठी सर्वात विश्वासार्ह आणि पसंतीच्या गाड्यांपैकी एक बनली आहे. दररोज हजारो प्रवासी, व्यावसायिक आणि तीर्थयात्रींची सेवा करत, ही गाडी सोलापूर हे वस्त्रोद्योगाचे केंद्र आणि राज्याची राजधानी यांच्यातील सामाजिक-आर्थिक संबंध दृढ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सध्याच्या डब्यांच्या रचनेत २२ आधुनिक LHB डब्यांचा समावेश आहे. यामध्ये C प्रथम श्रेणी, C २-टायर, C ३-टायर, C ३-टायर इकॉनॉमी, स्लीपर क्लास आणि सामान्य अनारक्षित (General Unreserved) डब्यांचा समावेश आहे.

सुमारे ८ तास ५ मिनिटांच्या कालावधीत ४५५ किमीचे अंतर कापत धावणारी सिध्देश्वर सुपरफास्ट एक्सप्रेस ही मोहोळ, माढा, कुर्डुवाडी, जेऊर, दौंड, पुणे, कल्याण, ठाणे आणि दादर यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांना जोडते.

काही निवडक टप्प्यांवर १३० किमी/तास इतक्या कमाल वेगमर्यादेसह धावणारी ही गाडी, एक कौतुकास्पद सरासरी वेग राखते; ज्यामुळे प्रवासाची वेळेवर आणि कार्यक्षम पूर्तता सुनिश्चित होते.




### विचारपूर्वक आखलेले वेळापत्रक

सोलापूरसह लगतच्या परिसरातील लोकांच्या दृष्टीने अत्यंत विचारपूर्वक आखलेले वेळापत्रक प्रवाशांना सोलापूरहून सायंकाळी निघून मुंबईला पहाटे लवकर पोहोचणे आणि परतीच्या प्रवासातही सुलभ ठरते.

### धार्मिक तीर्थक्षेत्रांच्या दृष्टीने महत्वाचा दुवा

सोलापूरची सुप्रसिध्द श्री सिध्देश्वर गड्डा यात्रासह पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर यांसारख्या धार्मिक केंद्रांशी संपर्क साधण्यासाठीही सिध्देश्वर एक्सप्रेस ही रेल्वेगाडी प्रवाशांसाठी दुवा म्हणून काम करते.

## लाकडी बांबू, दगडाने मारहाण

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

कट्ट्यावर बसलेल्या व्यक्तीला सकाळी बोललेल्या गोष्टीचा राग मनात धरून चौघांनी लाकडी बांबूने, दगडाने मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. दि. ५ एप्रिल रोजी सचिन विजयकुमार हक्के, वय ४०, रा. कल्याण नगर भाग - ३ सोलापूर व त्यांचा मित्र रमेश इंगळे असे मिळून कल्याण नगर या ठिकाणी कट्ट्यावर बसले असता सकाळी बोललेल्या गोष्टीचा राग मनात धरून शशी, नागेश, अविनाश, पवन सर्वांचे पूर्ण नाव पत्ता माहीत नाही यांनी सचिन हक्के यांना लाकडी बांबूने, दगडाने मारहाण केली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत दि. ६ एप्रिल रोजी चार जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सांगळे करत आहेत.

### आरोग्य सेवेत आमूलाग्र बदलाची दिशा

# आभा, आरोग्य केंद्रे, भरती, आषाढी वारीसाठी विशेष आराखडा

## जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य समितीची महत्त्वपूर्ण बैठक आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. जिल्ह्यातील आरोग्य सेवांचा दर्जा उंचावणे, सेवा अधिक प्रभावी व लोकाभिमुख करणे आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षातील विविध योजनांची काटेकोर अंमलबजावणी करणे, या उद्देशाने बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. प्रारंभी जिल्हा आरोग्याधिकारी डॉ.संतोष नवले यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील आरोग्य योजनांचा आर्थिक व भौतिक आढावा मांडला.

आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी डिजिटल आरोग्य प्रणालीवर विशेष भर देण्यात आला. ‘आभा’ कार्ड नोंदणी मोहिमेला गती देण्यासाठी आशा सेविकांनी इतर विभागांशी समन्वय साधून काम करावे. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात आवश्यक त्याठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे सुरू करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे ठरले. आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करतानाच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी भरती करण्यासही प्राधान्य देण्यात येणार आहे.


ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमध्ये स्वच्छता व पायाभूत सुविधा सुधारण्यावर विशेष भर देण्यात आला. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये स्वच्छता मोहीम राबवून परिसर निर्जंतुक ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. आशा स्वयंसेविकांना अधिक सक्षम करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देऊन किरकोळ आजारांवर स्थानिक पातळीवर उपचार करता यावेत यासाठी वैद्यकीय किट वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच आवश्यक औषध पुरवठ्यासाठी सेस फंडातून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

सरकारी रुग्णालयांवरील नागरिकांचा विश्वास वाढवण्यासाठी डॉक्टर व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रुग्णांशी सौजन्यपूर्ण, नम्र व तत्परतेने वागून दर्जेदार सेवा द्यावी. नाविन्यपूर्ण योजना राबवून रुग्णांना खासगी दवाखान्यांकडे वळण्याची गरज भासू नये, यावर भर देण्यात यावा. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांसाठी विशेष आरोग्य सेवा, फिरती रुग्णालये, आपत्कालीन सुविधा व वैद्यकीय पथकांचे नियोजन करण्याचेही निर्देश देण्यात आले.

याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

### अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध

जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक परिणामकारक, पारदर्शक आणि नागरिकांभिमुख करण्यासाठी घेतलेले निर्णय आगामी काळात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. यानिमित्ताने सोलापूरकरांना अधिक दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहे, असे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.



## ▶▶ थोडक्यात...

### स्व.बाबू जगजीवनराम यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

मोची समाजाच्या सुपुत्र, भारताचे माजी उपपंतप्रधान स्व.बाबू जगजीवनराम यांच्या ११८ व्या जयंतीनिमित्त सात रस्ता येथील बीएसएनएल ऑफिस येथे जांबमुनी मोची समाजसेवा शहर जिल्हा मंडळाच्या वतीने जिल्हाध्यक्ष सैदप्पा जंगडेकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. जगन्नाथ सज्जन यांनी प्रास्ताविक केले. गायत्री मेट्रे यांनी सूत्रसंचालन केले. संजय मोतेकर यांनी आभार मानले. यावेळी माजी महापौर संजय हेमगड्डी, नगरसेवक प्रा.नरसिंह आसादे, देवेंद्र भंडारे, ऋषिकेश मेट्रो, निर्मला जंगम, बसवराज म्हेत्रे, बाबुराव संगेपाग, अंबादास करगुळे, मोहन जंगम, शाम म्हेत्रे, सिद्राम कामटी, दिनेश म्हेत्रे, नागनाथ कासलोलकर, हणमंतु सायबोळू, बाबुराव म्हेत्रे, बाबु विटे, विजय म्हेत्रे, यल्लप्पा तुपदोळकर, शिवराम जगले, अर्जुन साळवे, ईश्वर म्हेत्रे, सिद्राम कामटी, दिनेश म्हेत्रे, सिद्राम गुदपे, बाळराज करगुळे, प्रेम कोपलवार, नंदकुमार म्हेत्रे उपस्थित होते.



### लष्कर मध्यवर्तीच्या अध्यक्षपदी रमेश कसबे

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

लष्कर मध्यवर्ती भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदी रमेश कसबे यांची निवड करण्यात आली. महामंडळाचे संस्थापक सदस्य शिवाजी बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निवड जाहीर करण्यात आली. इतर पदाधिकारी याप्रमाणे; उपाध्यक्ष-दुर्गादास कोलूर, राजाभाऊ भंडारे, सचिन गोडलालू, सचिव-इंद्रजीत भंडारे, सहसचिव-राहुल जाधव, कार्याध्यक्ष-महेश तेजबिदे, खजिनदार-कुमार नंदा, ऑडिटर-सिद्राम झळकेनूर, प्रसिध्दीप्रमुख-हनुमंतु भंडारे, मिरवणूक प्रमुख-मोहन जंगम, विकास वाघमारे, गोविंद हेम्ब्रेड्डी. यावेळी देवेंद्र भंडारे, विजय मरेड्डी, मारुती मळगे, मारुती देसाई, अंबादास मोतेकर, मच्छिंद्र लोकेकर, अंबादास मरेड्डी, अरुण म्हेत्रे, श्रीनिवास लिंगराज, विश्वजीत लिंगराज, अभिजीत भंडारे, प्रवीण वाडे, लखन गायकवाड, पंकज ढसाळ, विजय म्हेत्रे, दत्ता कोपलवार, संजय मोटेकर उपस्थित होते.



# ‘महालक्ष्मी सरस’मध्ये सोलापूर राज्यात अव्वल

- १४ बचतगटांनी केली विक्रमी ९१ लाखांची विक्री
- ‘उमेद’ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

राज्यस्तरीय ‘महालक्ष्मी सरस’ प्रदर्शन २०२५-२६ मध्ये सोलापूर जिल्ह्याने यंदा अभूतपूर्व यशाची नोंद करत संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे. सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी येथे २३ मार्च ते ५ एप्रिल २०२६ दरम्यान पार पडलेल्या या प्रदर्शनात सोलापूरच्या केवळ १४ स्वयंसहायता समूहांनी तब्बल ९१.१९ लाख रुपयांची विक्री करत राज्यात आपला ठसा उमटवला.




याबाबत बोलताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले की, ग्रामीण महिलांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सोलापूरच्या महिलांनी आपल्या कष्ट, कौशल्य आणि उत्पादनांच्या गुणवत्तेच्या जोरावर हा उद्देश केवळ साध्यच केला नाही, तर विक्रीचा विक्रम प्रस्थापित केला. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत या प्रदर्शनाचे नियोजन करण्यात आले होते. प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे व राहुल जाधव यांच्या समन्वयातून संपूर्ण व्यवस्थापन पार पडले.

नियोजनबद्ध कामकाज, उत्पादनांची निवड आणि सादरीकरणातील आकर्षकता यामुळे सोलापूरचे स्टॉल्स विशेष लक्षवेधी ठरले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पालकमंत्री जयकुमार गोरे, निलेश सागर, निखिलकुमार ओसवाल, दीपक वैद्य, इंद्रजीत पवार, चेतनसिंह केदार सावंत, अमृता वाघे, रामप्पा चिवडशेट्टी, संस्कृती सातपुते यांनी ‘उमेद’ टीमचे अभिनंदन केले.

**‘सोलापुरी स्वाद’ची मुंबईत धूम**

प्रदर्शनादरम्यान सोलापूरच्या स्टॉल्सवर ग्राहकांची प्रचंड गर्दी झाली. पारंपरिक, घरगुती आणि दर्जेदार उत्पादनांनी मुंबईकरांची मने जिंकली. खाद्यपदार्थमध्ये कडक भाकरी, शेंगा चटणी, काळा मसाला, सांडगे, दही मिरची आरोग्यदायी उत्पादनांमध्ये सेंद्रिय ज्वारी, कडधान्ये, गूळ, मिलेट पापड फळे व मिष्टान्न : डाळिंब, पेरू, पेडा, सीताफळ रबडी, मटका कुल्फी इतर वस्तुंमध्ये बांबू ब्रश, आवळा उत्पादने, नॉन-व्हेज राईस प्लेट व बिर्याणी ग्राहकांनी सोलापुरी उत्पादनांना दिलेला प्रतिसाद इतका मोठा होता की, अनेक स्टॉल्सवर काही वस्तूंचा साठा संपल्याची नोंदही करण्यात आली.

**विक्रीत आघाडीवर ठरलेले गट**

| | |
|---|---|
| विठ्ठल-रुक्मिणी समूह (पंढरपूर) | ९.२९ लाख |
| श्री शारदा समूह (पंढरपूर) | ८.६३ लाख |
| तनीष्का समूह (सोलापूर दक्षिण) | ८.२६ लाख |
| जिजाऊ समूह (बार्शी) | ७.७७ लाख |
| उत्कर्ष समूह (अक्कलकोट) | ७.६४ लाख |
| **एकूण १४ गटांनी मिळून ९१.१९ लाखांची उलाढाल** | |




# सोलापूर जनता सहकारी बँकेला २५ कोटी रुपयांचा नफा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

सोलापूर जनता सहकारी बँकेला २०२५ - २६ या आर्थिक वर्षात २४ कोटी ९४ लाख रुपयांचा म्हणजेच सुमारे २५ कोटी रुपयांचा नफा झाला आहे. हीरक महोत्सवी वर्षात बँकेने तब्बल तीन हजार कोटी रूपयांच्या मिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला असून निव्वळ एनपीए शून्य टक्क्यावर आला आहे, अशी माहिती बँकेचे नूतन अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

संपलेल्या आर्थिक वर्षात म्हणजेच २०२५ - २६ मध्ये सोलापूर जनता सहकारी बँकेने उत्तम कामगिरी केली आहे. बँकेकडे १ हजार ८९६ कोटी २१ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. तसेच बँकेकडून १ हजार ११० कोटी ४० लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. सोलापूर जनता सहकारी बँकेचा ग्रॉस एनपीए ८.३१ टक्क्यांवरून वरून ३.३५ टक्क्यावर आला आहे. निव्वळ एनपीए २.५७ टक्क्यांवरून शून्यावर आला आहे. व्यवसायवाढीचे उद्दिष्ट पूर्ण करताना कालसुसंगत नियमाची फेररचना, सीबिल आधारित कर्ज व्याज आकारणी, जिथे शक्य आहे अशा ठिकाणी कमी मार्जिन, विना जामीनदार गृह व वाहन कर्जे असे बदल करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली. त्यामुळे चांगल्या पद्धतीने कर्ज वाढ व नफा वाढही करता आली, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष ॲड.मिलिंद कुलकर्णी, संचालकद्वय पुरुषोत्तम उडता, राजेश पवार, गिरीष बोरगावकर, रवींद्र साळे, चंद्रिका चौहान, गौरी आमडेकर, डॉ. हर्षद डंबळ, आनंद करवंदे, सुरेश चिक्कळी, महादेव न्हावकर, प्रमोद भुतडा, विष्णू मोंढे, ॲड.मल्लिनाथ शहाबादे, अमित आपटे, चरणसिंग चौव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सरव्यवस्थापक प्रदीप बुट्टे, उपसरव्यवस्थापक अंजली कुलकर्णी, मकरंद जोशी, देवदत्त पटवर्धन, सहाय्यक सरव्यवस्थापक रामदास सिध्दूल, तुळशीदास गज्जम, रमेश मामड्याल, मदन मोरे, सुहास कमलापूरकर आदी उपस्थित होते.

# नवीन कोचिंग डेपोमुळे पायाभूत सुविधांना मिळणार चालना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने पहिल्या टप्प्याअंतर्गत टिकेकरवाडी येथे कोचिंग मेंटेनन्स डेपोला मंजुरी देऊन पायाभूत सुविधा अधिक मजबूत करणे आणि कार्यान्वयन कार्यक्षमता वाढवणे सुरु ठेवले आहे. यानिमित्ताने पायाभूत सुविधांना चालना मिळणार असल्याचे सांगण्यात येते.

२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे, जे या विभागातील क्षमता वाढीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. टिकेकरवाडी स्टेशनवरील प्रस्तावित सुविधा सोलापूर विभागाच्या वाढत्या कोचिंग मेंटेनन्सच्या गरजा पूर्ण करण्यासाठी धोरणात्मकदृष्ट्या नियोजित आहे.

सोलापूर स्टेशनपासून अंदाजे ७ किमी अंतरावर असलेल्या टिकेकरवाडी येथे रेल्वेची पुरेशी जमीन उपलब्ध आहे, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी हे एक आदर्श ठिकाण ठरते. हे स्टेशन सोलापूर स्टेशनला पूरक असे एक विस्तारित कार्यान्वयन केंद्र म्हणून काम करण्यास सज्ज आहे.




या सर्वसमावेशक पायाभूत सुविधांच्या सुधारणेमुळे विभागाची कार्यक्षम रेक देखभाल, गाड्यांची जलद फेरबदल आणि प्रवासी सेवांची सुधारित विश्वसनीयता यांसाठीची क्षमता लक्षणीयरीत्या वाढेल. टँडम व्हील लेथसारख्या आधुनिक देखभाल सुविधांच्या समावेशामुळे उच्च सुरक्षा मानके सुनिश्चित होतील आणि रोलिंग स्टॉकचा डाउनटाइम कमी होईल.

| ही आहेत प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये |
|---|
| दोन नवीन वॉशिंग-कम-पिट लाईन्सचे बांधकाम (प्रत्येकी अंदाजे ७०० मीटर) |
| दोन अतिरिक्त वॉशिंग-कम-पिट लाईन्सची तरतूद (प्रत्येकी ७५० मीटर, ६५०-मीटरच्या खड्ड्यांसह) |
| कोच पार्किंग आणि देखभालीसाठी दोन स्टेबलिंग लाईन्सचा विकास (प्रत्येकी ७५० मीटर) |
| अधिक लवचिकतेसाठी विद्यमान यूपी लूप लाईनचे यूपी आणि डीएन कॉमन लाईनमध्ये रूपांतर |
| विद्यमान बॅलास्ट सायडिंगचे डीएन रिसेप्शन-कम-यूपी डिपार्चर लाईनमध्ये रूपांतर |
| शेडसह टँडम व्हील लेथ लाईनची (१३०० मीटर) तरतूद |
| एक समर्पित कोच स्टॉक लाईनची निर्मिती |
| लोकोमोटिव्ह ऑपरेशन्सना सहाय्य करण्यासाठी लोको ट्रिप शेड लाईनची तरतूद |



# ग्रामीण पाणीपुरवठ्याची धुरा प्रसाद काटकरांच्या खांद्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागात नेतृत्वात बदल झाला असून, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी यांच्या सेवानिवृत्तीनंतर उपअभियंता प्रसाद काटकर यांच्याकडे कार्यकारी अभियंत्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

मंगळवेढा तालुक्याचा कार्यभार सांभाळतानाच आता जिल्हा स्तरावरील अतिरिक्त जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे. अक्कलकोटचे उपअभियंता विद्याधर राठोड, वरिष्ठ सहलेखा अधिकारी प्रकाश शेंडगे, कनिष्ठ सहाय्यक गणेश साळुंखे तसेच कॉन्ट्रॅक्टर माऊली पवार, अमोल कोकरे आणि ओम बुरशे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.धनशेट्टी यांनी आपल्या कार्यकाळात ‘जलजीवन मिशन’ योजनेची प्रभावी अंमलबजावणी करत विभागाला नवी दिशा दिली. नवीन कार्यकारी अभियंता म्हणून काटकर यांच्यासमोर ‘जलजीवन मिशन’ अंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण करणे, ठेकेदारांकडील प्रलंबित कामांचा निपटारा करणे ही मोठी आव्हाने उभी आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४०६

**अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये ।**
**परि ते हातवटी चंद्री कीं आहे ।**
**म्हणऊनि वक्ता तो वक्ताचि नोहे । श्रोतेनविण ।।**

माऊलींनी त्यांच्यासमोर बसलेल्या श्रोत्यांना अवधान दया असे म्हटले, आणि लगेच माऊली पुढे स्पष्टीकरण करु लागले आहेत की, आपले अवधान आहेच, तरीपण मी लडिवाळपणाने अवधान दया असे म्हणत आहे. श्रोत्यांचे आपल्या बोलण्याकडे लक्ष कसे आहे हे सांगतांना माऊली कांही उदाहरणे देत आहेत. चांदणे आढीत घालून पिकवावे लागत नाही. कारण ते मुळातच पिकलेले असते. वा-याला कोणी गती देण्याचे कारण नाही, कारण ते मुळातच गतिमान असते, पाण्याला पातळ करावे लागत नाही, कारण ते मुळातच पातळ असते, त्याप्रमाणे आपणाला लक्ष दया म्हणयाची गरज नाही कारण आपले लक्ष माझ्याकडे आहेच. चंद्रापेक्षाही शांत करणारे, अमृतापेक्षाही जीवन देणारे असे जे आपले अवधान आहे, त्याने माझ्या मनोरथांची वृध्दी केली जावी अशी अपेक्षा माऊली करतात. श्रोत्यांच्या कृपादृष्टीचा वर्षात झाला तर माझ्या बुध्दीत सर्व अर्थ पुर्णपणे स्फुरतील आणि श्रोते जर उदास राहिले तर अंकुर दशेला आलेले माझे ज्ञान सुकुन जाईल. वक्त्याच्या वक्तृत्वाला श्रोत्यांचे अवधानरुपी खादय जर प्राप्त झाले तर वक्त्याच्या अक्षरांना सिध्दांताची मोठाली पोटे सावरुन धरता येतील. येथे अर्थ शब्दांची वाट पाहात नाहीत. येथे एक आशयच दुस-या आशयाला जन्म देतो आणि बुध्दीमध्ये विविध अभिप्रायांच्या कल्पना स्फुरु लागतात, असेही माऊली सांगतात.



वक्ता आणि श्रोता यांच्यात संवादाचा अनुकुल वारा वाहू लागला तर हदयरुप आकाश साहित्यरुपी मेघांनी भरुन जाईल आणि श्रोता जर उदास राहिला तर व्याख्यानातील रस सुकुन जाईल वक्ता आणि श्रोत्यांच्या संबंधाबद्यल बोलतांना माऊली म्हणतात, **अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये । परी ते हातवटी चंद्रीं कीं आहे । म्हणऊनि वक्ता तो वक्ताचि नोहे । श्रोतेनविण ।।** अर्थात, चंद्रकांत मणी पाझरतो खरा, पण त्याला पाझरविण्याची ती कला चंद्राजवळ आहे. तद्वत् वक्ता खूप बोलेल, पण त्याला बोलके करण्याची युक्ती श्रोत्यांमध्ये आहे. म्हणून श्रोत्यावाचून वक्ता हा वक्ताच असत नाही. माऊलींनी अतिशय मोठे सत्य पटवून दिले आहे. वक्त्याला जर श्रोत्यांचे महत्व पटले तर त्याच्याकडून होणारे व्याख्यान निश्चितच चांगले होईल. मी आहे म्हणून श्रोता आहे असे जर वक्त्याला वाटले तर त्याच्या व्याख्यानाला अर्थ राहात नाही. वक्त्याला श्रोत्यांची मानसिकता, भावना ओळखता आली पाहिजे. आपल्या बोलण्याकडे श्रोता अवधान देत आहे एे१फ? अवधान देत नसेल तर आपले कुठे चुकते का ? श्रोता आपल्या व्याखानात एकरुप होत नाही त्याला आपणच कारणीभूत आहोत का ? आपण विषय सोडून बोलु लागल्यामुळे श्रोता आपले शब्द ऐकत नाही एे१फ? या प्रश्नाचा शोध वक्त्याला घेता आला पाहिजे. आपल्यामुळे श्रोता नसून श्रोत्यामुळे आपण आहोत याचा विचार वक्त्याने केला पाहिजे. तासन्तास व्याखान देणारे सर्व चांगले वक्ते असतातच असे नाही. आपण खरा वक्ता होण्यासाठी माऊलींची हातोटी शिकायला हवी. माऊलींची हातोटी शिकण्यासाठी आपल्यामध्ये नम्रता, अभ्यासु वृत्ती आली पाहीजे. त्याचबरोबर मीपणा, अहंभाव आपण आपल्यातुन काढुन टाकला पाहीजे.

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. ८ एप्रिल २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - फाल्गुन कृ षष्ठी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- मूळ (अहोरात्र)**
**योग - वारियान (१७.०९)**
**करण - विष्टी (अहोरात्र)**
**राहू काल : बुधवार**
**दु. १२.०० ते १.३०**

**दिनविशेष : १८९४: वंदे मातरम् या राष्ट्रगीताचे कवी बंकिमचंद्र यादावचंद्र चटर्जी यांचे निधन.**
**१९२१: आचार्य विनोबा भावे यांनी पवनार आश्रमाची स्थापना वर्धा येथे केली.**
**१९२४: शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकलीमठ ऊर्फ कुमार गंधर्व यांचा जन्म.**
**१९२८: नामवंत मराठी साहित्यिक, स्वामीकार रणजित देसाई यांचा जन्म.**
**१९५३: उद्योगपती वालचंद हिराचंद दोशी यांचे निधन.**

# जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर 'स्वच्छ करा'

### त्रस्त नागरिकांची मागणी

### रस्ते आणि परिसर स्वच्छतेचा प्रचंड अभाव



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

एका बाजूला प्रशासन 'स्मार्ट सिटी', 'सुशासन' आणि 'सुविधा' यांचे गोडवे गात असताना दुसऱ्या बाजूला सोलापूरच्या जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात नागरिकांची अक्षरशः परवड सुरू आहे. तीन वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालय सात रस्ता येथील नियोजन भवनशेजारील नव्या महसूल भवनात स्थलांतरित झाले, मात्र जुन्या इमारतीत अद्याप अनेक महत्त्वाची कार्यालये सुरूच आहेत. परिणामी, दररोज हजारो नागरिक विविध कामांसाठी या ठिकाणी ये-जा करत असतात. पण त्यांच्या मूलभूत सोयींकडे प्रशासनाने दुर्लक्ष होत असून, हा परिसर स्मार्ट करावा, अशी मागणी शहर-जिल्ह्यातील नागरिकांकडून होत आहे.


जिल्हाधिकारी कार्यालयाबरोबरच अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, महसूल उपजिल्हाधिकारी, सामान्य प्रशासन, पुनर्वसन, नगरपालिका प्रशासन ही महत्त्वाची कार्यालये नवीन ठिकाणी स्थलांतरीत झाली असली तरी जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात अद्यापही प्रांताधिकारी क्रमांक १ व २, जिल्हा निवडणूक शाखा, जिल्हा पुरवठा अधिकारी, पोलीस अधीक्षक कार्यालय, खरेदी-विक्री नोंदणी, भूसंपादन कार्यालये, सेतू केंद्र तसेच भूमि अभिलेख विभागाची कार्यालये, दक्षिण सोलापूर तहसील कार्यालय कार्यरत आहेत. इतक्या महत्त्वाच्या कार्यालयांचा एकत्रित कारभार सुरू असतानाही या भागात नियोजनाचा पूर्णतः अभाव आहे.

वाहनतळाची कोणतीही सक्षम व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना आपली वाहने अक्षरशः रस्त्यावर किंवा मोकळ्या जागेत अस्ताव्यस्त उभी करावी लागत आहेत. यामुळे परिसरात कायमस्वरूपी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. आपत्कालीन सेवांनाही या गोंधळातून मार्ग काढणे अवघड होत असल्याचे चित्र आहे. रस्त्यांची अवस्था तर बिकट झाली आहे. शिवछत्रपती रंगभवन व श्री सिध्देश्वर प्रशालेकडील प्रवेशद्वारातून प्रवेश करणाऱ्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे, उखडलेले रस्ते आणि धूळ नागरिकांसाठी अक्षरशः जीवघेणी ठरत आहे. दुचाकीस्वारांना तर रोजच 'कसरत' करत कार्यालयात पोहोचावे लागत आहे. चारचाकी वाहनधारकांचीही परिस्थिती काही वेगळी नाही. पावसाळा सुरू झाल्यानंतर ही परिस्थिती आणखी भीषण होणार, याची जाणीव असूनही संबंधित विभाग मात्र याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. नागरिकांना या अस्वच्छ वातावरणात तासनतास थांबावे लागते, ही बाब अत्यंत खेदजनक आहे.

विशेष म्हणजे, जुन्या जिल्हाधिकारी कार्यालय इमारतीच्या पाठीमागील बाजूस स्तनदा माता आणि लहान बालकांसाठी उभारण्यात आलेला 'हिरकणी कक्ष' सध्या कुलूपबंद अवस्थेत धूळ खात पडलेला आहे. महिलांच्या मूलभूत गरजांकडेही प्रशासनाने पूर्णतः दुर्लक्ष केल्याचे हे उदाहरण आहे. एकीकडे कोट्यवधींचा निधी विकासकामांसाठी खर्च होत असल्याच्या घोषणा केल्या जातात, पण अशा अत्यावश्यक ठिकाणी साध्या सोयीसुविधाही उपलब्ध करून दिल्या जात नाहीत, ही बाब नागरिकांच्या संतापात भर टाकणारी आहे. आता तरी संबंधित प्रशासनाने या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

# गुरुभक्ती, त्याग आणि सातत्यपूर्ण प्रयत्न या त्रिसूत्रीचा अवलंब करा



''जीवनात केवळ उपलब्धी (निर्माण) महत्त्वाची नाही, तर आत्मिक समाधान (निर्वाण) साधणे अधिक महत्त्वाचे आहे.'' त्यासाठी गुरुभक्ती, त्याग आणि सातत्यपूर्ण प्रयत्न या त्रिसूत्रीचा अवलंब करण्याचे आवाहन परमपूज्य आचार्य श्री विद्यासागरजी महाराज यांचे शिष्य मुनीश्री वीरसागरजी महाराज यांनी केले.

वालचंद शिक्षण समूहाच्या नूतन परिसरात आगमनानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुनीश्री बोलत होते. आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात माहितीची कमतरता नसली, तरी हृदय आणि मेंदू यातील अंतर कमी करण्यासाठी नैतिक व भावनिक विकास अत्यावश्यक आहे. गुरूंच्या चरणी शरण जाऊन त्यांच्या उपदेशानुसार आचरण केल्यास विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल घडते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भक्ताम्बर विधानासंदर्भात बोलताना मुनीश्री म्हणाले, आचार्य मानतुंग यांनी रचलेल्या ४८ कडव्यांमधून जीवनातील संकटांवर मात करण्याची शक्ती प्राप्त होते. भक्ताम्बर उपासनेमुळे मानसिक तणाव कमी होऊन आत्मिक शांती लाभते. ''भक्ताम्बरची उपासना करा, धर्म वृद्धिंगत करा आणि आपले घर स्वर्ग बनवा,'' असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. महिलांच्या योगदानावर प्रकाश टाकताना त्यांनी नमूद केले की, कुटुंबाच्या उन्नतीत स्त्रियांचा मोठा वाटा असतो. त्यामुळे मुलींच्या शिक्षणासोबत त्यांच्या सुरक्षेला आणि संस्कारांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. प्रवचनाच्या समारोपात त्यांनी अधोरेखित केले की, ''उत्तम चारित्र्य, शुद्ध विचार आणि योग्य कृती यांवरच खऱ्या अर्थाने यशस्वी जीवन उभे राहते.''



## महसूल कर्मचारी संघटनेकडून नूतन जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य महसूल चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना शाखा सोलापूर चा वतीने नूतन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी राज्य अध्यक्ष शंतनु गायकवाड, शाखा अध्यक्ष प्रशांत भांडेकर, सचिव नागेश कानडे, शहर अध्यक्ष अनिल पवार, कार्याध्यक्ष अभय गायकवाड, सोमनाथ ताटे, अप्पा खंदाड, बदेनवाज दफेदार, सतीष गुंड, महादेव चिट्टे, कोळेकर, रमेश माळी, काशीनाथ बराडे, जिल्हाधिकारी यांचे पीए शंकर कांबळे आदी उपस्थित होते.

### वळसंग येथे भाजपाचा स्थापना दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे दक्षिण सोलापूर के पंचायत समिती गट नेते बलवान गोतसुर्वे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना लाडू वाटप करण्यात आले.

यावेळी मल्लिनाथ ढब्बे, अनिल बर्वे, मलकाप्पा कोडले, बसवराज मिरजे, विरेश बागलकोटी, महेश खैराटे, सिद्धाराम वाघमारे, विनोद सुरपुरे आदी उपस्थित होते. सर्व प्रथम माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयी यांना पुष्पांजली वाहण्यात आली.

## प्रा. डॉ. सोनल भुंजे यांना अर्थशास्त्र विषयात पी.एचडी प्रदान



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ एप्रिल-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागांतर्गत संशोधिका प्रा. डॉ. सोनल शशिकांत भुंजे यांना नुकतीच पी. एचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे.

त्यांनी पश्चिम महाराष्ट्रातील कृषी निविष्ठांच्या वापराचा कल आणि त्याचा शेती उत्पादकतेवर होणारा परिणाम या विषयावर शोधनिबंध सादर केला होता. त्यांच्या या संशोधनामुळे पश्चिम महाराष्ट्रातील शेती, खते, बियाणे आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा उत्पादकतेवर कसा परिणाम होतो यावर महत्त्वपूर्ण प्रकाश पडला आहे. त्यांनी हे संशोधन डॉ. एस. एन. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. दि.११ मार्च रोजी विद्यापीठात झालेल्या मौखिक परीक्षेत त्यांनी आपल्या प्रबंधाचे यशस्वी सादरीकरण केले. त्यानंतर दि. ६ एप्रिल रोजी त्यांना अधिकृतपणे ही पदवी जाहीर करण्यात आली. हे यश संपादन करण्यासाठी आई-वडील, भाऊ यांचे पाठबळ तसेच सांगोला महाविद्यालय या संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, ता. ना. केदार, सचिव अॅड. उदयबापू घोंगडे, प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, पती ऋषिकेश गुळमिरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले असल्याचे प्रा. डॉ. सोनल भुंजे यांनी सांगितले.

# करिअर बरोबरच आरोग्याची काळजी घ्या

### स्त्रीरोग तज्ञ डॉ. दबडे; जागतिक आरोग्य दिनानिमित्त प्रबोधन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ एप्रिल-**

मुलींनी शिक्षण घेत असताना आपल्या आरोग्याला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. सकस आहार, योग्य विहार, नियमित व्यायाम आणि पुरेशी विश्रांती याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. करिअर करताना योग्य क्षेत्राची निवड करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आजकाल अनेक मुली आरोग्याकडे दुर्लक्ष करून केवळ करिअरच्या मागे धावताना दिसतात; मात्र याचे दुष्परिणाम त्यांना पुढील आयुष्यात भोगावे लागू शकतात. योग्य वयात विवाह आणि वेळेत मातृत्व स्वीकारणे याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे, असे आवाहन स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ डॉ. माधुरी दबडे यांनी केले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा आणि श्री. सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आरोग्य दिनानिमित्त प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर श्री. सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक येथे पार पडले. या प्रसंगी डॉ. माधुरी दबडे प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य गजानन धरणे होते.

कार्यक्रमास फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, श्रीशैल मळेवाडी, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड तसेच कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, मंदाकिनी आबसे, कोमल कांबळे, प्रियांका चन्ना उपस्थित होते. या कार्यक्रमात २५० हून अधिक विद्यार्थिनीं व प्राध्यापक उपस्थित होते. डॉ. श्रीकांत येळेगावकर बोलताना म्हणाले की, बहुतांशी नागरिकांची शारीरिक, मानसिक व सामाजिक तंदुरुस्तीवर देशाची प्रगती अवलंबून असते. सूत्रसंचालन सुचेता चौधरी यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन वीरेंद्र परदेशी यांनी केले.

## बाकलीवाल ट्युटोरियल्समध्ये मोफत डेमो लेक्चर्सची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

विद्यार्थ्यांचा सर्वाधिक विश्वास संपादन केलेले बाकलीवाल ट्युटोरियल्स जेईई व नीट परीक्षांसाठी दर्जेदार मार्गदर्शन देण्यासाठी ओळखले जाते. संस्थेने २०२५मध्ये विक्रमी निकाल देत अनेक विद्यार्थ्यांना प्रतिष्ठित मेडिकल व इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला आहे. आता आगामी शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाचा अनुभव घेण्यासाठी मोफत डेमो लेक्चर्स आयोजित करण्यात आले आहेत. डेमो लेक्चर्स ११ एप्रिलपर्यंत एम्प्लॉयमेंट चौक, जुळे सोलापूर, अशोक चौक या सर्व तीन केंद्रांवर असतील. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यापूर्वी संस्थेची अध्यापन पद्धती, अनुभवी शिक्षकवर्ग आणि शिस्तबद्ध शिक्षण प्रणाली प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी ही उत्तम संधी आहे जेईई-डेमो लेक्चर्सची वेळ : सकाळी ११ ते दुपारी १२:३० नीट -डेमो लेक्चर्सची वेळ: सकाळी ११:०० ते दुपारी १२:५० पंढरपूर शाखेमध्ये डेमो लेक्चर्सची वेळ : जेईई-डेमो लेक्चर्सची वेळ: सकाळी ९:०० ते ९.४५ नीट -डेमो लेक्चर्सची वेळ: सकाळी १०:०० ते दुपारी १०:४५. सर्व शाखांमध्ये नियमित बॅचेस १३ एप्रिलपासून सुरू होणार असून अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या शाखेस भेट द्या, असे आवाहन बाकलीवाल ट्युटोरियल्सतर्फे करण्यात आले आहे.

# सोलापुरात शनिवारी तिसरे राज्यस्तरीय कर्मवीर भाऊराव पाटील साहित्य संमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

बहुजनांच्या साहित्याला एक हक्काचे विचारपीठ निर्माण व्हावे याकरिता कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ, नांदेड यांच्या वतीने शनिवार, दि.११ एप्रिल रोजी सोलापुरातील सात रस्ता परिसरातील उपलप मंगल कार्यालय येथे तिसरे राज्यस्तरीय कर्मवीर भाऊराव पाटील साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष अॅड.बी.आर. कलवले, संयोजक भरतकुमार मोरे, स्वागताध्यक्ष लक्ष्मण कारले यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी विठ्ठल माने, लक्ष्मण कारले, रमेश लोंढे आदी उपस्थित होते.



या साहित्य संमेलनाच्या अनुषंगाने शनिवारी सकाळी ८ वाजता हुतात्मा पुतळ्यापासून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. पार्क चौक, डफरीन चौक, संगमेश्वर महाविद्यालय या मार्गावरुन ही दिंडी मार्गस्थ होऊन उपलप मंगल कार्यालयात ग्रंथदिंडीची सांगता करण्यात येणार आहे. आमदार अमित गोरखे यांच्या हस्ते, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, आ.देवेंद्र कोठे, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, महापौर विनायक कोंड्याल, माजी मंत्री बसवराज पाटील आदींच्या प्रमुख उपस्थितीत संमेलनाचे उद्घाटन होईल.

या संमेलानत उद्योजक डॉ.कुमार करजगी यांना जीवनगौरव पुरस्काराने तर डॉ.ऋत्विक जयकर (वैद्यकीय), ह.भ.प.विठ्ठल माने (धार्मिक), उत्तम माने (सामाजिक) यांचा विशेष गौरव होणार आहे. तसेच दत्तात्रय इंगळे, डॉ.एस.एन. पठाण, विजयकुमार सोनवणे, प्रिया चौधरी, किशोर जाधव यांच्या साहित्यकृतीचे प्रकाशन होणार आहे. दुपारच्या सत्रात कर्मवीर भाऊराव पाटील यांची शैक्षणिक दृष्टी व सध्याचे शैक्षणिक धोरण' या विषयावर डॉ.शिवाजीराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार आहे. यात प्रा. डॉ.अनिता शिंदे, प्रा. डॉ. जयदथ जाधव, प्रा. डॉ.जयदेवी पवार, प्रा.डॉ. विजयकुमार कुमठेकर हे सहभागी होणार आहेत. कवी दत्तात्रय इंगळे यांच्या नेतृत्वाखाली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महाकवी संमेलन होणार आहे.

याप्रसंगी नरेंद्र गुंडेली, दस्तगीर जमादार, भगवान चौगुले, राजश्री जाधव, सुरेश निकंबे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. खा.प्रा.डॉ. ज्योती वाघमारे, माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, माजी आमदारद्वय राम गुंडिले, बब्रुवान खंदाडे, जि.प.चे अध्यक्ष दीपक वैद्य यांच्यासह विलास सिदगीकर, उषा गायकवाड, आनंद चंदनशिवे, किरण गायकवाड, गंगाधर म्हमाणे, आकांक्षा चौगुले, प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांच्या उपस्थितीत दिगंबर ढेपे, राजेंद्र पाराध्ये, नानासाहेब मोरे, देविदास कसबे, अंगद जाधव, कोमल ढोबळे, गोविंद सूर्यवंशी, नागनाथ गायकवाड, उत्तरेश्वर मठपती, किशोर जाधव, डॉ.सिद्धेश्वर करजखेडे, दत्ता वाघमारे यांचा सन्मान आणि संमेलनाचे समारोप करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

### डोक्यात दगड फेकल्याने महिला जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**

बाथरूमचे सांडपाणी दारासमोर येत असून त्याची योग्य ती विल्हेवाट लावा असे सांगत असल्याचा राग मनात धरून दगड फेकून एक महिला त्यात झाली आहे.

यात हकीकत अशी की, दि. ५ एप्रिल रोजी फिर्यादी संगीता विठ्ठल भोसले, वय ६०, रा. भीम नगर, शेगाव सोलापूर हे राहत असलेल्या ठिकाणी, शेजारी राहणारे विनोद बनसोडे, ललिता बनसोडे, अनिता बनसोडे, यांनी बाथरूमचे सांडपाणी दारासमोर येत असून ते त्याची योग्य ती विल्हेवाट लावा असे वारंवार सांगत असल्याचा राग मनात धरून संगीता भोसले यांना हा घराजवळील बाथरूमला जात असताना बनसोडेंनी दगड फेकून त्यातील एक दगड संगीता यांच्या डोक्यात लागून ते जखमी झाले. याबाबत दि. ६ एप्रिल रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तिघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास खरात आहेत.

# 'सिंहगड'मध्ये आयडीई बूटकॅम्पला प्रारंभ

### राष्ट्रीय पातळीवर नोडल सेंटर म्हणून 'सिंहगड'ची निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ एप्रिल-**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे पाच दिवसीय इनोव्हेशन, डिझाईन अँड एंटरप्रेन्योरशिप बूटकॅम्प २०२६ ला उत्साहात प्रारंभ झाला.

दि. ६ ते १० एप्रिल दरम्यान होणारा हा उपक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल यांच्या पुढाकारातून, वाधवानी फाउंडेशन आणि एसबीआय फाउंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे. या बूटकॅम्पसाठी सिंहगड संस्थेची राष्ट्रीय पातळीवर नोडल सेंटर म्हणून निवड झाल्याने नवोपक्रम क्षेत्रातील संस्थेच्या कार्याची दखल घेतली गेली आहे. देशभरातील ३० केंद्रांवर तीन टप्प्यांत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमात सुमारे ६ हजार ५०० विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित असून, सोलापूर केंद्रात २०० ते २५० विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

उद्घाटन कार्यक्रमात एआयसीटीई इनोव्हेशन सेंटरचे रीजनल कन्सल्टंट सौरभ निर्माले यांनी बूटकॅम्पचा उद्देश स्पष्ट करताना, विद्यार्थ्यांनी नवकल्पना विकसित करून त्याचे उत्पादनात रूपांतर करावे आणि स्टार्टअपच्या दिशेने वाटचाल करावी, असे सांगितले. यावेळी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, रिसर्च डायरेक्टर प्रा. एस. एच. पवार तसेच प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रा. पवार यांनी ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा क्षेत्रातील स्टार्टअप्सच्या संधींबाबत माहिती देत संशोधनाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले. लक्ष्मी हायड्रॉलिक्स लि. चे अध्यक्ष निरंजन सिंघवी यांनी नवीन उत्पादन विकास, त्याचे कॉस्टिंग आणि बाजारातील उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन केले.

वाधवानी फाउंडेशनच्या मास्टर ट्रेनर्स पल्लवी बिरादार आणि डॉ. सायरील क्रिस्टो यांची उपस्थिती विशेष ठरली असून ते संपूर्ण बूटकॅम्पदरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रम समन्वयक प्रा. सुनिल शाखापुरे व डॉ. मुदस्सर नाईकवाडी यांचे नियोजन लाभले. सूत्रसंचालन प्रा. मानसी जाधव यांनी केले. या बूटकॅम्पमध्ये प्रत्यक्ष समस्यांवर आधारित कार्यशाळा, तज्ज्ञांचे सत्र, स्टार्टअप संस्थापकांचे मार्गदर्शन आणि टीमवर्कच्या माध्यमातून नवोपक्रमात्मक दृष्टिकोन विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. चौथ्या दिवशी स्थानिक इनोव्हेशन इकोसिस्टम व सांस्कृतिक स्थळांना भेट, तर पाचव्या दिवशी फंडिंग संधी व बौद्धिक संपदा हक्क यावर विशेष सत्र आयोजित करण्यात येणार आहे. अंतिम दिवशी पिचिंग सत्र होऊन उत्कृष्ट संघांचा गौरव करण्यात येणार आहे.

**बूटकॅम्पमधील प्रमुख उपक्रम**

- तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर सत्र
- डिझाईन थिंकिंग व नवोपक्रम कार्यशाळा
- आयडिया जनरेशन व समस्या निराकरण उपक्रम
- स्टार्टअप मेंटरिंग सत्र
- इन्क्युबेशन सेंटर भेट
- आयडिया पिचिंग व मूल्यांकन प्रक्रिया

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### ॲड. अमोल अलाट यांना आदर्श विधीरत्न पुरस्कार प्रदान

**बार्शी, दि. ७ एप्रिल-**
जोशाबा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, चिंचोली व बहुजन समाज परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जोशाबा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ पार पडला. सोहळ्यात विधी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल ॲड. अमोल अलाट यांना जिल्हास्तरीय आदर्श विधीरत्न पुरस्कार २०२६ देऊन गौरवण्यात आले. हभप डॉ. जयंत करंदीकर महाराज यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कै. विठ्ठलराव शिंदे सभागृह, पंचायत समिती कुर्डूवाडी येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप डॉ. जयंत करंदीकर महाराज होते. यावेळी संजय टोणपे, बाळासाहेब देवकुळे, दिलीप देवकुळे उपस्थित होते. ॲड. अमोल अलाट यांनी वकिली व्यवसायात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या याच सामाजिक बांधिलकीची आणि न्यायदानातील योगदानाची दखल घेऊन जोशाबा संस्थेच्यावतीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.




### श्री येडेश्वरी देवी यात्रेत भाविकांना महाप्रसाद वाटप

**बार्शी, दि. ७ एप्रिल-**
बार्शी शहरातील मंगळवार पेठ येथील श्री येडेश्वरी देवी भक्त मंडळाच्यावतीने श्रीक्षेत्र येरमाळा येथे चैत्र पौर्णिमेनिमित्त श्री येडेश्वरी देवी यात्रेत भाविक भक्तांसाठी मोफत दालचा मसाला भात व बुंदीचा लाडू महाप्रसाद म्हणून वाटप करण्यात आला. मंडळाचे हे सातवे वर्ष असून मंडळ प्रत्येक वर्षी मोफत महाप्रसादाचा उपक्रम राबवत असते. समाजातील दानशूर व्यक्तीच्या पुढाकारातून तसेच मंडळातील सदस्य यांच्या वर्गणीच्या माध्यमातून हा महाप्रसादाचा उपक्रम अखंडपणे चालू आहे. श्रीक्षेत्र येरमाळा येथे श्री येडेश्वरी देवीच्या यात्रेत सहभागी होणाऱ्या हजारों भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. या उपक्रमाचे श्री येडेश्वरी देवी भाविक भक्तांनी मंगळवार पेठ श्री येडेश्वरी देवी भक्त मंडळाचे आभार मानत कौतुक केले.

### किरण घाडगे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान



**वेळापूर, दि ७ एप्रिल-**
माळशिरस तालुका पंचायत समिती आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण स्मृती भवन अकलूज येथे संपन्न झाले. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेळापूर मुली या शाळेतील उच्च विद्या विभूषित असलेल्या उपक्रम शिक्षिका किरण घाडगे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर, पंचायत समिती सभापती दत्ता भैया मगर, गटशिक्षणाधिकारी महामुनी तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. वेळापूर मुली शाळेचे नाव एक उपक्रमशील आणि प्रयोगशील शाळा म्हणून संपूर्ण तालुक्यामध्ये घेतले जाते. तालुक्यातील पहिली सायकल बँक योजना सुरू करणारी शाळा म्हणून या शाळेचा उल्लेख केला जातो. लंगडी तसेच लोकनृत्य प्रकारामध्ये ही शाळा तालुक्यात प्रथम क्रमांकाने विजेती आहे. या शाळेमध्ये मुलींना कराटे प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर डिजिटल शिक्षण मुलींना दिले जाते. डीवायएसपी पासून आरोग्य अधिकारी पर्यंत व्यक्तींचे मार्गदर्शन मुलींना घडवून आणले जाते. पुरस्कार मिळाल्याबद्दल माळशिरस तालुक्यातील सर्व शिक्षक, वेळापूर ग्रामपंचायत सदस्य डॉ. स्नेहल जानकर, गटशिक्षणाधिकारी महामुनी, विस्ताराधिकारी असलम इनामदार, केंद्रप्रमुख बापूसाहेब नाईकनवरे, मुख्याध्यापक तांबोळी यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### सिंहगड स्कूलमध्ये शिक्षक स्वागत समारंभ व प्रशिक्षण कार्यशाळा

**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**
नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक स्वागत समारंभ तसेच दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. हा कार्यक्रम सिंहगड शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी शिक्षक व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यानंतर दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेला सुरुवात झाली. या कार्यशाळेत काशीबाई नवले शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कमलापूर (ता. सांगोला) येथील प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, डॉ. एस. व्ही. जगताप, डॉ. एस. पी. कांगडे व प्रा. आर. एन. नदाफ यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान अध्यापन पद्धती, मानसशास्त्रीय सिद्धांत आणि प्रभावी धडा आराखडा या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, उपमुख्याध्यापिका निकहत शेख व सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# हद्दवाढ भागाच्या विकासाकडे मंद्रूपच्या सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष

- **करभरणात आघाडीवर मात्र सोईसुविधांपासून वंचित**
- **सत्ताधारी आणि विरोधकांकडून नागरिकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ७ एप्रिल-**
मंद्रूपमध्ये १९९१ मध्ये हद्दवाढ भाग वाढला. तेव्हापासून हद्दवाढ भागात कोणत्याच सोईसुविधा नसल्याने नागरीकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पाणीपट्टी व घरपट्टीसह इतर कर भरण्यात अग्रेसर असणार्या नागरीकांना सोईसुविधांसाठी अनेक वर्षांपासून संघर्ष करावा लागत आहे. सत्ताधारी व विरोधी गटाच्या सदस्यांचे हद्दवाढ भागातील समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने स्थलांतरीतांच्या प्रमाणात वाढ होत आहे. हद्दवाढ भागात सोईसुविधा




उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी व सिईओ यांचे आदेश असतानाही सत्ताधाऱ्यांकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरीकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मंद्रूपमध्ये विठाई नगर, बाबूलाल नगर, संजय नगर, देशमुख नगर, इंदिरा नगर, समर्थ नगर यासह इतर अनेक नगरांची निर्मिती झाली आहे. या नगरमध्ये सांडपाणी, दिवाबत्ती, मुरूमीकरण, नळ पाणीपुरवठा, खड्डेमय रस्ता, अतिक्रमण, रस्ते बंद अशा अनेक समस्या आहेत. या समस्यांबद्दल ग्रामपंचायतकडे वारंवार पत्र व्यवहार करून व निवेदन देऊनही ग्रामपंचायतीकडून कोणत्याच सोईसुविधा मिळत नाहीत. त्यामुळे नोकरदार नागरीक सोलापूर शहराकडे धाव घेत आहेत. हद्दवाढ भागातील ग्रामपंचायत सदस्य नागरीकांच्या तक्रारीबद्दल मूग गिळून गप्प असल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे आगामी निवडणूकीत याचा फटका बसण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. म्हणून हद्दवाढ भागाच्या समस्या सोडविण्याची मागणी होत आहे.

#### सत्ताधारी व विरोधकांची भूमिका गुऌदस्त्यात

हद्दवाढ भागातील नागरीकांमुळे मोठ्या प्रमाणात कर जमा होते. या करामधून हद्दवाढ भागाच्या समस्या सोडविणे अपेक्षित असताना सत्ताधारी व विरोधक हद्दवाढच्या विकासाकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे हद्दवाढच्या समस्या कधी सुटणार? वारंवार पाठपुरावा करूनही ग्रामपंचायतीकडून दुर्लक्षच होत असल्यामुळे नागरीकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे आगामी निवडणूकीत समस्या सोडविणाऱ्यांनाच साथ देणार आहे.

**- जावीद आवटे,** तालुकाध्यक्ष, अखिल भारतीय किसान सभा

#### उपसरपंचाच्या विधानाबद्दल आश्चर्य

जिल्हा परिषद निवडणूकीत मंद्रूपचे ज्येष्ठ ग्रामपंचायत सदस्य व उपसरपंच भगवान व्हनमाने यांनी कोरे घराण्याशी ६० वर्षे ऐकनिष्ठ असल्याचे सांगत सर्व सोईसुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले होते. मात्र उपसरपंचांच्या वॉर्डातील विठाई नगरमध्येच मोठ्या प्रमाणात समस्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे उपसरपंच यांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कधी होणार? दीड वर्षानंतर ग्रामपंचायत निवडणूक होणार असून यावेळी हद्दवाढ भागातील नागरीकांच्या नाराजीचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.



## बार्शीत ओन्ली संस्थेतर्फे होम मिनिस्टर कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ७ एप्रिल-**
ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी या संस्थेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त व महावीर सारीज बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होम मिनिस्टर अर्थातच खेळ रंगला पैठणीचा हा कार्यक्रम संपन्न झाला.

यासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सोनम जगताप (पोलीस उपनिरीक्षक,बार्शी शहर) तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गझल कटारिया (संचालिका, महावीर सारीज) व सौ. राधिका पंडित (कल्याणी ज्वेलर्स) या उपस्थित होत्या तर संस्थेचे प्रतिनिधी म्हणून प्रा.माधुरी शिंदे, सौ.अदिती तिवारी व शितल उलभगत याही व्यासपीठावर उपस्थित होत्या.

कार्यक्रमांमध्ये संस्थेचे सदस्य अनिल खुडे यांचा मुलगा अजिंक्य खुडे यांची सोलापूर ग्रामीण पोलीस कॉन्स्टेबलपदी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सदर स्पर्धेत बार्शीतील बहुसंख्य महिला स्पर्धकांनी सहभाग घेतला.

स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षीस रुपये पाच हजार किमतीची मानाची पैठणी हे रेश्मा मगर द्वितीय क्रमांकाचे बक्षीस तीन हजार एक किमतीची मानाची पैठणी हे सौ. अश्विनी चव्हाण व तृतीय क्रमांकाचे बक्षीस सोन्याची नथ हे रेणुका ढोबळे यांना मिळाले. त्याचबरोबर कै. रामराव वाणी यांच्या स्मरणार्थ राहुल वाणी अध्यक्ष यांनी २० बक्षिसे या स्पर्धेतील विजेत्यांना दिली. होम मिनिस्टरचे सादरकर्ते म्हणून राहुल झोबांडे यांनी उत्तम प्रकारे सादरीकरण केले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, उपाध्यक्ष संतोष शेळगावकर, सचिव अजय तिवारी, सहसचिव नागनाथ सोनवणे, खजिनदार माणको ताकभाते, सुरेंद्र जंगम, विजय येवारे, दिपक ढोणे, अतुल वाणी प्रा. रतिकांत हमणे, प्रा. हेमंत शिंदे महिला सदस्यामध्ये कोमल वाणी, माधुरी वाणी, सायरा मुल्ला, रागिनी झेंडे, रेखा विधाते, सुजाता अंधारे, अनुसया आगलावे अशादेवी स्वामी, त्रिशाला मिसाळ, अरुणा शेळगावकर, संतोषी शेवते सोनाली घोंगाणे, राधा घोंगाणे या उपस्थित होत्या. सूत्रसंचालन प्रा.डॉ. चंद्रकांत उलभगत यांनी केले.

## अमृत लक्षित गट परिवार सर्वेक्षण अभियान सुरु

### २५ एप्रिलपर्यंत चालणार अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ७ एप्रिल-**
महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेअंतर्गत कार्यरत महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) मार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यभर परिवार सर्वेक्षण अभियान राबविण्यात येणार आहे. दरम्यान, हे सर्वेक्षण दि. ८ एप्रिल २०२६ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार कालावधी वाढविण्यात येऊ शकतो.

अमृत संस्थेच्या लक्षित गटामध्ये सध्या ब्राह्मण, सिंधी, गुजराती, पटेल, राजपूत, कायस्थ, अय्यंगार, नायर, नायडू, पाटीदार, बंगाली, भूमिहार, जाट, वैश्य इत्यादी सुमारे २५ जातींचा समावेश असून, सर्वेक्षणानंतर यामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

संस्थेमार्फत व्यक्तिमत्व विकास औद्योगिक व प्रगत कौशल्य विकास रोजगाराभिमुख प्रशिक्षण उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक आर्थिक सहाय्य स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन उद्योग व्यवसायासाठी व्याज परतावा योजना या प्रमुख योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या सर्वेक्षणाचा उद्देश लक्षित गटातील कुटुंबांची अचूक संख्या निश्चित करणे, त्यांच्या गरजा व अपेक्षा जाणून घेणे, तसेच स्थानिक संसाधने, कौशल्ये व आवडीनुसार नव्या योजनांची आखणी करणे हा आहे.

या अभियानाद्वारे अमृत संस्थेच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती अधिकाधिक कुटुंबांपर्यंत पोहोचविणे, तसेच नागरिकांकडून अभिप्राय घेऊन भविष्यात अधिक परिणामकारक योजना राबविण्याचा मानस आहे.

सदर कालावधीत अमृत संस्थेचे प्रतिनिधी लक्षित गटातील कुटुंबे, संस्था, संघटना व मंडळांशी संपर्क साधणार आहेत. तसेच संबंधितांनी स्वयंस्फूर्तीने जिल्हा व विभागीय कार्यालयांशी संपर्क साधून आपल्या कुटुंबाची किंवा संस्थेची माहिती नोंदवावी, असे आवाहन करण्यात येत आहे. तरी लक्षित गटातील जास्तीत जास्त नागरिकांनी या सर्वेक्षणात सहभागी होऊन अमृत संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधनी (अमृत) विजय जोशी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

## कांदा अनुदान आणि पिकविम्यासाठी शेतकरी संघटना आक्रमक

### शंकर गायकवाड यांनी दिला तीव्र आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ एप्रिल-**
तालुक्यातील खामगाव येथे कांदा अनुदान, ऊस बिले, पिकविमा आदींसह विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नुकताच मेळावा पार पडला. त्यावेळी गायकवाड यांनी मेळाव्यास संबोधित करीत असताना मागणीची पूर्तता न झाल्यास लवकरच तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला. यावेळी बळीराजा शेतकरी संघटनेचे राज्य प्रवक्ते रमेश गणगे व जनहित शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरद भालेकर यांनी शेतकरी संघटनेमध्ये प्रवेश केल्यामुळे गणगे यांची राज्य उपाध्यक्षपदी तर भालेकर यांची युवा आघाडीचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी गायकवाड यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन नियुक्ती करण्यात आली.

नूतन प्रदेश उपाध्यक्ष रमेश गणगे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, शेतकरी संघटनेचे पंढरपूर तालुकाध्यक्ष सुभाष चौगुले, नूतन युवा जिल्हा उपाध्यक्ष शरद भालेकर, जनहित शेतकरी संघटनेचे राज्य प्रवक्ता रामराव काटे आदींनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.



मेळाव्यास शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष महादेव शिंदे, प्रहार संघटनेचे नजीर पठाण, माळशिरसचे सचिन बोरकर, गौडगावचे राहुल भड, मळेगावचे अशोक माळी, रामहरी पेजगुडे, बळीराजा शेतकरी संघटनेचे सचिन आगलावे, समाधान भालेकर, बाळासाहेब माळी, गुलाब लोखंडे, जीवन गावडे, अमोल काटे, अमोल वैद्य, बापूराव नारकर, अण्णासाहेब पेजगुडे, भैरवनाथ खंदारे, धनाजी थिटे, युवराज नारकर, आबासाहेब नलगे, भीमराव झांबरे, सुखदेव वैद्य, बापू खंदारे, तात्या मुठाळ, विनोद खंदारे, अमोल थिटे, अविनाश उघडे, निलेश लोखंडे, रोहित खंदारे, अमोल नाईकनवरे, नितीन नाईकनवरे, नानासाहेब माने, शशिकांत माने, किशोर तोडकर, प्रदीप नाईकनवरे, भाऊसाहेब नाईकनवरे, तानाजी डोके, शरद खंदारे, तानाजी खंदारे, परमेश्वर खंदारे, महादेव खंदारे, बालाजी खंदारे, विनोद नाईकनवरे, राहुल नाईकनवरे, अण्णासाहेब पांगरे, रामेश्वर थिटे, नंदू मुळे, अक्षय नलगे, मनोज थिटे, प्रवीण कात्रे, वैभव वैद्य, मुकिंदा पेजगुडे, बाप्पा पेजगुडे, आण्णा नलगे, बापूसाहेब मडके, गणेश मुठाळ उपस्थित होते.

सूत्रसंचालन सुभाष चौगुले यांनी केले तर आभार रमेश काटे यांनी मानले.

## विसंगती दूर करून डॉल्बी संदर्भात राज्यभरात एकच धोरण जाहीर करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**
विविध जिल्ह्यातील विसंगती दूर करून डॉल्बी संदर्भात राज्यभरात एकच धोरण जाहीर करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सावळा उडाणशिव यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या निमित्ताने सोलापूर जिल्हा आणि पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर भीमअनुयायी संताप व्यक्त केला जात आहे. पुण्यामध्ये डॉल्बीला परवानगी असेल तर सोलापुरात का नाही? हा भेदभाव का असा सवाल उपस्थित करत पुण्याप्रमाणे सोलापुरातही डॉल्बीला परवानगी द्या अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते सावळा उडाणशिव यांनी दिला आहे. भारतीय संविधाना नुसार एक देश एक कायदा राबविला पाहिजे मात्र पुणे जिल्ह्यात एक नियम आणि सोलापुरात एक नियम हा दुजाभाव कशासाठी ? हा दुजाभाव दूर करण्यासाठी पोलीस महासंचालक, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त यांना निवेदन दिले आहे. विसंगती दूर करून डॉल्बी संदर्भात राज्यभरात एकच धोरण जाहीर करावे अशी मागणीही सामाजिक कार्यकर्ते सावळा उडाणशिव यांनी केली आहे. कार्यवाही न झाल्यास जीवन संपवण्याचा इशाराही निवेदनाद्वारे दिला आहे, असे त्यांनी सांगितले.

## चांदवडमध्ये ११, १२ एप्रिलला आदिवासी धनगर साहित्य संमेलन

- **अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर तर आ. गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते होणार उद्घाटन**
- **ग्रंथदिंडी, परिसंवाद, कविसंमेलन, चर्चा सत्रासह मिळणार वैचारिक मेजवानी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ एप्रिल-**
धनगर समाजाच्या साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विचारांना व्यासपीठ देणारे सहावे राष्ट्रीय आदिवासी धनगर साहित्य संमेलन दि. ११ व १२ एप्रिल रोजी होळकर वाडा, चांदवड येथे होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांची निवड झाली तर उद्घाटन आमदार गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती प्रा. देवेंद्र मदने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या संमेलनाचे उद्घाटन आ. गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते होणार असून राज्यभरातील साहित्यिक, समाजसेवक आणि मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. शनिवारी दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होईल. श्रीमंत अमरजीत बारगळ राजे यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून नगराध्यक्ष वैभव बागुल व अभिमन्यू होळकर उपस्थित राहतील. सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत उद्घाटन सोहळा पार पडेल. दीपप्रज्वलन व भंडारा उधळून 'यळकोट यळकोट जय मल्हार'च्या गजरात कार्यक्रमाची सुरुवात होईल. या वेळी विविध साहित्यिकांच्या पुस्तकांचे प्रकाशन तसेच राज्यभरातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान केला जाणार आहे. संमेलनात अनेक मान्यवरांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. यामध्ये संजीवन खांडेकर, सिद्धारूढ बेडूगणुर, रूपाली लंभाते-अवचरे, प्रवीण काकडे, गणेश पुजारी, ॲड. बळवंतराव खोत, पवन थोटे, डॉ. महादेव बनसुडे, गोविंद गोरे, डॉ. आहिल्या वाघमोडे, प्रा. डॉ. महेश चौरे यांचा समावेश आहे. रविवारी विविध विषयांवर चर्चा सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. धनगर समाजाची शैक्षणिक स्थिती, भेंढपाळ व्यवसायाचे भविष्य, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची त्रिजन्मशताब्दी एक आढावा या विषयांवर मार्गदर्शन होणार आहे. दुपारी ३ ते ५ या वेळेत समारोप सोहळा पार पडेल. विविध ठराव मांडले जातील तसेच उर्वरित पुरस्कारांचे वितरण होईल, यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. अभिमन्यू टकले यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सिद्धारुढ बेडगनूर, सदाशिव व्हनमाने, बिसलसिद्ध काळे उपस्थित होते.

#### कवी संमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रम

सायंकाळी ५ ते ७ या वेळेत कवी संमेलन होणार असून राज्यभरातील कवी सहभाग घेणार आहेत. त्यानंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आधारित एकपात्री नाट्यप्रयोग सादर केला जाणार आहे.

#### परिसंवादातून विचारमंथन

दुपारी २ ते ५ या वेळेत विविध विषयांवर परिसंवाद होणार असून चांदवडच्या जडण घडणीत होळकरांचे योगदान, महाराजा यशवंतराव होळकरांचे देशासाठी योगदान आणि धनगर समाजाची राजकीय स्थिती' या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## डॉ. सुनील विभुते यांना राज्यस्तरीय शिवांजली साहित्य पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ७ एप्रिल-**

चाळकवाडी (ता. जुन्नर, जि. पुणे) येथील शिवांजली साहित्यपीठ यांच्यातर्फे प्रतिवर्षी दिला जाणारा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय शिवांजली साहित्य पुरस्कार डॉ. सुनील विभुते यांच्या 'जागतिक दर्जाचे निवडक दहा जीवशास्त्रज्ञ या पुस्तकाला जाहीर झाला आहे. रोख रक्कम, सन्मानपत्र व आकर्षक स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण शनिवार दि २ मे रोजी संत गाडगेबाबा साहित्यनगरी, शिवांजली शैक्षणिक संकुल, चाळकवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या ३३ व्या राज्यस्तरीय मराठी साहित्य महोत्सवामध्ये होणार आहे.



डॉ. सुनील विभुते यांच्या यशाबद्दल प्रसिध्द शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. ज्येष्ठराज जोशी, प्रसिध्द विज्ञान साहित्यिक डॉ. पंडीत विद्यासागर, डॉ. संजय ढोले, डॉ. छाया पाटील, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ बी. वाय. यादव व सर्व पदाधिकारी, बार्शी रेडक्रॉस ब्लड बँकेचे चेअरमन डॉ. विक्रम निमकर, सोलापूर मसापच्या अध्यक्षा डॉ. श्रुती वडगबाळकर, पद्माकर कुलकर्णी यांनी अभिनंदन केले आहे.



### महत्त्वाचे



## स्टेशन मस्जिद पंढरपूर येथे ईदमिलनचा कार्यक्रम उत्साहात

**पंढरपूर, दि.७ एप्रिल -**

येथील स्टेशन मस्जिद येथे हिंदू मुस्लिम बांधवांसाठी ईदमिलन या कार्यक्रम उत्साहात पार पडला. यामध्ये सर्व समाजातील व्यक्तींना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी राज्याचे वक्फ मंडळाचे समीर काझी हे उपस्थित होते. अशा प्रकारच्या सामाजिक ऐक्य जोपासून हिंदू मुस्लिम बंधुभाव वाढवणाऱ्या कार्यक्रमाचे कौतुक करून त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात माढ्याचे आमदार अभिजित पाटील, नगराध्यक्ष डॉ. प्रणिती भालके, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, राजु सर्वगोड, आरपीआयचे जितेंद्र बनसोडे, डॉ.अरुण मेनकुदळे, डॉ.बजरंग धोत्रे, माजी नगराध्यक्ष इब्राहिम बोहरी, निसार शेख, सलीम वडगावकर, बाळू शेख, अलामीन पेशइमाम, सुनील सर्वगोड, अरुण कोळी, ह.भ.प.बाळासाहेब बडवे, डॉ.बी.पी.रोंगे आदी मान्यवर उपस्थित होते. या सर्वांनी या एकतेचे दर्शन घडवून आणणाऱ्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्वांसाठी शीरखुर्माचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नियोजन ॲड. यासीन शेख, आबीद बेळगावकर, आरिफ बेळगावकर, शुकुर बागवान, मोहम्मद लिगाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते. सूत्रसंचालन रफिक शेख व राजूभाई मुलाणी यांनी केले.



## संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष शिरीष जगदाळे यांचा शिवसेनेत प्रवेश

**सोलापूर, दि.७ एप्रिल -**

संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष शिरीष जगदाळे यांनी सोमवारी आपल्या समर्थकांसह शिवसेनेत (शिंदे गट) जाहीर प्रवेश केला. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे व युवकांचे आशास्थान खा. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख खा. धैर्यशील माने यांच्या उपस्थितीत सोलापूर येथे हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी खा. धैर्यशील माने यांनी जगदाळे यांचे भगवा उपरणे घालून स्वागत केले आणि त्यांच्यावर सोलापूर शहरात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी काम करण्यास सांगितले. यावेळी शिवसेनेचे वरिष्ठ नेते सिद्धाराम म्हेत्रे उत्तम प्रकाश खंदारे आरोग्यदूत मंगेश चिवटे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, अमर पाटील, मनीष काजळे उपस्थित होते.

## एटीएम फोडून चोरी करताना चोरट्यास पोलिसांनी केले जेरबंद

**सोलापूर, दि.७ एप्रिल -**

शहरातील एका नामवंत बँकेचे एटीएम मशिन फोडताना रात्रीच्यावेळी गस्तीस असणाऱ्या शहर पोलिसांनी संबंधित चोरट्यास रंगेहाथ पकडून होणारा जबरी चोरीसारखा मोठा गुन्हा घडण्यास प्रतिबंध केला आहे. त्यामुळे शहर पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतूक केले जात आहे. या बाबतची पोलिसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की, शहरातील सरगमचौक भागातील एसबीआय बँकेचे एटीएम सेंटर आहे. दरम्यान सरोजकुमार नारायणकुमार दास (वय, ४१ वर्षे, मुळ रा.ओरिसा सध्या रा. इसबावी,ता.पंढरपूर) हा इसम ०५ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ०३/३० वा.चे सुमारास सरगम चौक पंढरपूर येथील एस.बी.आय बँकेचे ए.टी.एम मशीन फोडताना आढळुन आला.दरम्यान रात्रगस्त पोलीसांनी त्यास रंगे हाथ पकडल्याने पोलीसांचे सतर्कतेमुळे गंभीर स्वरूपाचा होणारा जबरी चोरी सारखा गुन्हा घडण्यास प्रतिबंध लागला आहे. या कामगिरीमुळे पोलीस उपनिरीक्षक नितीन जगताप, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक राजेश गोसावी, सपोफौ शरद कदम, सिरमा गोडसे, सचिन हॅबाडे, सोमनाथ पाटील, पोनासाहिल तांबोळी, कृष्णा पकाले, पोकॉ शहाजी मंडले, दिपक नवले, बजरंग बिचुकले, हर्षद ठाकर यांचे अभिनंदन केले आहे.

## हद्दपार आरोपी बार्शीत आढळल्याने गुन्हा

**बार्शी, दि.७ एप्रिल -**

बार्शी शहरातून हद्दपार करण्यात आलेला आरोपी परवानगीशिवाय शहरात फिरताना आढळून आल्याने त्याच्याविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कॉन्स्टेबल सचिन नितनात हे बार्शी शहर पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण शाखेत कार्यरत असून, दि. ५ एप्रिल रोजी ते सहकाऱ्यासह वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शहरात पेट्रोलिंग करत होते. हद्दपार आरोपी अक्षय उर्फ आकाश नवनाथ सांळुखे (वय ३०, रा. भीमनगर, बार्शी) हा तेलगिरणी चौक, खुरपे बोळ परिसरात फिरत असल्याच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी धाव घेतली असता रात्री सुमारे ८.४५ वाजण्याच्या सुमारास संबंधित इसम आढळून आला. त्याच्याकडे बार्शी शहरात येण्यासाठी आवश्यक परवानगी विचारली असता त्याने कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे सांगितले. त्यासा उपविभागीय दंडाधिकारी, सोलापूर यांनी २ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या आदेशान्वये सोलापूर व धाराशिव जिल्ह्याच्या हद्दीबाहेर सहा महिन्यांसाठी हद्दपार केलेले होते. असे असतानाही त्याने कोणतीही पूर्वपरवानगी न घेता बार्शी शहरात प्रवेश करुन आदेशाचे उल्लंघन केले. याप्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, तपास बार्शी शहर पोलीस करत आहेत.

# पंढरपूर व मंगळवेढ्याच्या विकासासाठी सत्तेसोबत जाण्याशिवाय पर्याय नाही

### कार्यकर्त्यांच्या बैठकीत विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ एप्रिल-**

कुठल्याही वैयक्तीक स्वार्थासाठी तसेच उमेदवारी मिळावी म्हणून सत्ताधारी पक्षासोबत जाणार नाही. कारण २०२९पर्यंत आता कोणतीही निवडणूक नाही. दुसरे म्हणजे मागच्या दाराने जाणे आपणाला कदापीही पसंद नाही. जर गेलोच तर आपण जनतेमधूनच निवडणूक लढवुन विधानसभेत जाणार आहोत. सर्वसामान्य जनतेने नगरपालिकेच्या निवडणूकीत नगराध्यक्षपदी आपला उमेदवार विजयी करुन आपल्यावर पंढरपूर, मंगळवेढा शहराची जी जबाबदारी दिली आहे.

ती चोखपणे पार पाडण्यासाठी सत्ताधारी पक्षात जाण्याशिवाय पर्याय नाही. कारण सत्तेसोबत असल्या शिवाय शहराच्या, तालुक्याच्या विकास कामांसाठी निधी आणू शकत नाही, असे प्रतिपादन विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके यांनी केले.भालके, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे नेते अनिल सावंत यांनी शिवसेना पक्ष प्रवेशाबाबत पंढरपूर शहर आणि तालुक्यातील विठ्ठल परिवारातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी येथील भालके यांच्या निवासस्थानी मंगळवारी बैठकीचे आयोजन केले होते. शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पक्ष प्रवेशाबाबतची आपली भूमिका मांडताना श्री. भालके बोलत होते. यावेळी साईनाथ अभंगराव व दिलीप धोत्रे आदी उपस्थित होते. भालके म्हणाले, सत्ताधारी पक्षातील येथील लोकप्रतिनधी तसेच त्यांचे पदाधिकारी मंडळी विकास कामांच्या निधीबाबत सातत्याने दुजाभाव करीत आपली अडवणूक करीत आहेत. पंढरपूरातील मायबाप जनतेने नगराध्यक्षपदाची जबाबदारी देवून आपल्यावर जो विश्वास दाखविलेला आहे तो पुर्ण करण्याची जबाबदारी आता आपल्यावर आहे. त्यामुळे आता आपणाला मागे हटुन चालणार नाही. शहराच्या विकास कामासंदर्भात मुंबईमध्ये एखाद्या नेत्याला भेटावयाला गेल्यावर विरोधक मंडळी लगेचच संबंधित नेत्यांसोबतचे फोटो काढून या पक्षात प्रवेश, त्या पक्षात प्रवेश अशा प्रकारे अफवा उठवितात. वास्तविक येथील लोकप्रतिनधींनी जर आपणा बरोबर दुजाभाव केला नाही तर मुंबईत जावुन इतर मंडळींची भेट घेण्याचे कारणच पडत नाही. पण येथील नेते मंडळी आमच्या पक्षात या तरच तुम्हाला निधी देतो म्हणून गळ घालतात. त्यांच्या दावणीला बांधण्यासाठी सातत्याने आडवणूक करतात. अनेक वेळा तर सत्ताधारी मंडळींकडून नोकरशाहीच्या माध्यमातून गळचेपी देखील केली जाते.



खोटे गुन्हे दाखल केले जातात. ग्रामीण भागात आपल्या विचाराच्या कार्यकर्त्यांची पिळवणूक,आडवणूक सातत्याने केली जाते. त्यामुळे या गोष्टींचा विचार केला तर आपण देखील सत्तेतील एखाद्या पक्षात सहभागी झाल्याशिवाय आपली आडवणूक थांबणार नाही. त्यामुळे जनतेच्या विश्वासाला तडा जावू नये यासाठी आपण आपली भूमिका आज मायबाप जनतेसमोर मांडत आहोत. त्यामुळेच शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू नये यासाठी मुंबई, पुणे येथे नेते मंडळींच्या भेटीगाठी घ्याव्या लागतात, अशी ठाम भूमिका भालके यांनी यावेळी मांडली. त्यातूनच आपण सत्तेमध्ये सहभागी असलेल्या एखाद्या पक्षात प्रवेश करावयाच्या निर्णयाप्रत आल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### पक्ष प्रवेशादिवशी शंभर कोटींचा निधी आणू

ज्या दिवशी आपण सत्तेतील सहभागी पक्षात प्रवेश करु त्या सोहळ्यात त्या पक्षाच्या नेत्याकडून पंढरपूरसाठी किमान शंभर कोटी रुपये निधीची घोषणा करुन घेऊ, असा विश्वास देखील यावेळी श्री. भालके यांनी व्यक्त केला. येथील रेल्वे मैदानावर १२ एप्रिल रोजी भालके, सावंत यांचा शिवसेना पक्षात प्रवेश होणार आहे. त्यामुळे हा पक्ष प्रवेशाचा सोहळा भव्य, दिव्य असणार असून त्याची जय्यत तयारी सुरु असल्याचे भालकेंच्या निकटवर्तीयांनी सांगितले.



## अकलूज येथे भाजपा स्थापनादिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टीचा ४६ वा स्थापना दिन अकलूज (ता.माळशिरस) जिल्हा सोलापूर येथे भारतीय जनता पार्टी अकलूज शहराच्या वतीने सोलापूर जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत मोटर सायकल रॅलीने स्थापना दिन साजरा करण्यात आला. प्रथम राष्ट्र, सुशासन, विकास, सेवा आणि समर्पण या पंचसूत्रावर उभी राहिलेली विचारधारा म्हणून भारतीय जनता पार्टीची ओळख आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टी अकलूज शहराध्यक्ष महादेवराव कावळे व भाजपच्या सर्व पदाधिकारी यांनी स्थापना दिनानिमित्त मोटरसायकल रॅलीचे आयोजन केलेले होते. मोटरसायकल रॅली अकलूज नगर परिषद कार्यालय येथून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक, सदुभाऊ चौक, गांधी चौक, विजय चौक, शिवापूर पेठ ते मारुती मंदिर या ठिकाणी मोटरसायकल रॅलीची सांगता करण्यात आली. मोटरसायकल रॅलीत महिला पदाधिकारी तरुण कार्यकर्ते यांनी हजारोंच्या संख्येने सहभाग घेतलेला होता. रॅलीच्या सांगता वेळी ॲड. संजय दोशी, बाळासाहेब वावरे यांच्यासह अनेकांचा सन्मान करण्यात आला. समाज कल्याण सभापती सातपुते यांनी मार्गदर्शन करताना म्हणाल्या, भारतीय जनता पार्टीच्या सगळ्या कार्यकर्त्यांनी अतिशय समर्पणेने आणि निष्ठेने काम केले आहे आणि बऱ्याच वर्षांपासून आपण करत आहात.

मी सगळ्या कार्यकर्त्यांचं अभिनंदन करते, कारण तुमच्यासारख्या कार्यकर्त्यांमुळेच भारतीय जनता पार्टी आहे. भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिना निमित्त आपण सगळ्यांनी एक संकल्प करायचा आहे, भारतीय जनता पार्टीचे काम निश्चितपणे उंचीवर नेऊया, असे बोलून त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

## अंबिका रेसिंग क्लब कलढोण मायनीची 'बेला क्वीन' प्रथम

### अर्धनारी नटेश्वरयात्रा निमित्त भव्य श्वान शर्यत उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.७ एप्रिल -**

अर्धनारी नटेश्वर यात्रा वेळापूर कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली भव्य श्वान शर्यतीत अंबिका रेसिंग क्लब कलढोण मायनीची 'बेला क्वीन' प्रथम आली. वेळापूर येथील पालखी मैदानावर ही स्पर्धा शाहीद मुलाणी व दोस्ती ग्रुप निमगाव यांच्या देखरेखीखाली यशस्वीरीत्या पार पडली.

उत्साहात संपन्न झाली. आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. या स्पर्धेत सहभागी झालेल्या एक ते वीस क्रमांकाच्या श्वानांना बक्षिसे व सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. यावेळी रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, धानोरे गावचे माजी सरपंच जीवन जानकर, वेळापूरचे



सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासो मुंगूसकर, धानोरेचे माजी सरपंच नामदेव देवकते, गटनेते संजयआबा मंडले, दीपकआबा राऊत, अमृतराव माने देशमुख, हनुमंत वायदंडे, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, यात्रा कमिटीचे अध्यक्ष काशिनाथ आडत, उपाध्यक्ष ॲड. विठ्ठल मंडले, उपाध्यक्ष रणजीत साठे, कार्याध्यक्ष अमोल मंडलिक, खजिनदार दादा तुपे, सरचिटणीस विनायक भगत, सचिव अभिजीत साठे, सेक्रेटरी विजय पवार, सदस्य मनोहर माने, संजय देशपांडे, माजी ग्रामपंचायत सदस्य अमृतकाका माने देशमुख, शंकर आडत, शिवाजी सावंत, लखन मंडले, अजीत साठे, शिवाजी मंडले, वौभव बनसोडे, धनंजय शिवपूजे उपस्थित होते.

**स्पर्धेचे निकाल याप्रमाणे**

मनोज बुधावले अंबिका रेसिंग क्लब कलढोन मायनी यांची 'बेला क्वीन', गोल्डन ग्रुप महाराष्ट्र यांचा 'डेंजर', लाडू रेसिंग क्लब, शेवते शिराळा यांची 'लाल रॉकेट'.

# ऊसतोड मजूर पुरविण्याच्या नावाखाली वाहन मालकांची वर्षाला दोनशे कोटींची फसवणूक

- स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते कांतिलाल नाईकनवरे यांचा आरोप
- १३ एप्रिलला सोलापुरात अन्नत्याग आंदोलन



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.७ एप्रिल-**

ऊसतोड मजूर पुरविण्याच्या नावाखाली वाहन मालकांची वर्षाला दोनशे कोटी रूपयेहून अधिक फसवणूक होत असून याबाबत पोलीस प्रशासनाकडून गुन्हा दाखल केला जात नाही. तसेच शासनाकडून कोणतीही मदत केली जात नसल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व सावकारग्रस्त शेतकरी समितीचे जिल्हाध्यक्ष कांतिलाल नाईकनवरे यांनी केला आहे. याबाबत प्रशासनास जाग येण्यासाठी दि.१३ एप्रिल रोजी सोलापूर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती नाईकनवरे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

याबाबत नाईकनवरे यांनी विविध समस्या मांडल्या. सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक साखर कारखाने असून ऊसतोडीसाठी कारखानदार वाहन मालकांशी करार करतात. या नंतर वाहनधारक ऊसतोड मजुरासाठी विविध भागातील मुकादमांशी संपर्क साधून नोटरीव्दारे करार करतात. वेळेत मजुर पुरवठा व्हावा यासाठी कामावर येण्यापूर्वीच लाखो रूपयांची उचल वाहन मालक देतात. परंतु अनेकदा सदर मुकादम ऊसतोड कामगारही पुरवत नाहीत व लाखो रूपये लंपास करतात. बऱ्याचवेळा यांचा ठावठिकाण सापडत नाही. तसेच पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यास गेल्यावर टाळाटाळ करणे, वारंवार हेलपाटे मारायला लावणे आदी अनुभव येतात. नोटरी करूनही हे मुकादम आर्थिक फसवणूक करतात. कारण आपल्यावर कोणतीही कारवाई होत नाही हे त्यांना माहित असते.

या पत्रकार परिषदेस बीड येथील श्रीमंत गुरसाळे, महादेव सलगर उपस्थित होते. श्रीमंत गुरसाळे यांची तर आजपर्यंत सहा कोटी रूपयांची ऊसतोड कामगार मुकादम यांनी फसवणूक केली. तर महादेव सलगर यांची ७५ लाख रूपयांची फसवणूक झाली आहे. सलगर यांनी आपली रक्कम वसूलसाठी मुकादमाचा ट्रॅक्टर आणला म्हणून त्यांच्यावर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रामाणिकपणे व्यवसाय करूनही अशी अवस्था असेल तर आम्हाला आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले. याला वाचा फोडण्यासाठी सोलापूर येथे दि.१३ एप्रिल रोजी अन्नत्याग आंदोलन करणार असल्याचे नाईकनवरे यांनी सांगितले.

### मुकादमाचाच शेतकऱ्यावर गुन्हा

पंढरपूर तालुक्यातील पोहरगाव येथील श्याम गायकवाड यांचे नऊ लाख रूपये मुकादमाने घेऊनही कामगार पुरवले नाहीत. यामुळे त्यांनी सदर मुकादमाचा शोध लावून तेथून त्याचा ट्रॅक्टर आणला. मात्र मुकादमाने गायकवाड यांच्यावरच ट्रॅक्टर चोरीचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणात गायकवाड यांना अटक करण्यास बीड जिल्ह्यातून पोलीस आले होते असा अनुभव आहे. तसेच साखर कारखानदार देखील सदर मुकादम, ऊसतोड कामगार यांची कोणतीच जबादारी किंवा हमी घेत नाहीत. याउलट ऊसतोड कामगार वेळेत न पुरविल्यास नोटीस काढणे, घेतलेली उचल न दिल्यास वाहन ओढून आणणे अशी कारवाई केली जात असल्याची खंत व्यक्त केली. तसेच अनेक वाहनचालक आब्रुला घाबरून तक्रार देण्यास पुढे येत नसल्याचे देखील त्यांनी सांगितले.

## बार्शीत अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न

### आरोपीविरुद्ध पोक्सो व ॲट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.७ एप्रिल-**

बार्शी शहरातील एका परिसरात एका १२ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात एका इसमावर पोक्सो आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ४ एप्रिल रोजी दुपारी ही घटना घडली.

फिर्यादी महिला कपडे धुण्यासाठी घराबाहेर गेल्या होत्या, तर त्यांची १२ वर्षे १० महिने वयाची मुलगी घरात एकटीच होती. याचा फायदा घेऊन आरोपी याने पीडित मुलीला आपल्या मोटारसायकलवर बसवून त्याच्या घरी नेले. त्यानंतर, आरोपीने तिच्याशी अश्लील चाळे करून तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

जेव्हा फिर्यादी महिला घरी परतल्या आणि मुलगी घरात दिसली नाही, तेव्हा त्यांनी परिसरात शोध घेतला. यावेळी



आरोपीच्या घराच्या पाठीमागून पीडित मुलगी रडत धावत आल्याचे त्यांनी पाहिले. मुलीने घडलेला सर्व प्रकार आपल्या पालकांना सांगितल्यानंतर त्यांनी तात्काळ बार्शी शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली.

फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरुन याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ७४ लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम कलम, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा कलमप्रमाणे आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस प्रशासनाकडून गांभीर्याने केला जात असून, पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया वेगाने राबवली जात आहे.